॥ १६६२ ॥

वाट पाहें हरि कां नये आझूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥ ध्रु ॥
नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥ २ ॥
नाहीं आलें कळों अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतों ॥ ३ ॥
बहुता दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे देई एकवेळा भेटी ॥ शीतळ हें पोटीं होइल मग ॥ ५ ॥

॥ १६६३ ॥

नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे संघ ष्टणें ।
वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिक चि प्रेम चढे घेतां ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगे जननिये । घेऊनि कडिये बुझाविलें ॥ ३ ॥

॥ १६६४ ॥

आतां न करीं सोस । सेवीन हा ब्रह्मरस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ओह्मां लक्षण अमृत । ब्रह्मपदींचें निश्चित ॥ ध्रु ॥
तुमचा निज ठेवा । आह्मी पाडियेला ठावा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवराया । आतां लेंपालेंती वांयां ॥ ३ ॥

॥ १६६५ ॥

जेथें जेथें जासी । तेथें मज चि तूं पोंहसी ॥ १ ॥

---

१ दे. त. कुवाळिलें —२ दे. सुखें सेवीन अमृत ।०.—३ त. लक्षणें.—४ पं. लेपालेवी.—
५ दे. त. पासी.

॥ ध्रु. ॥ ऐसा पसरोनि भाव । रिता[1] नाहीं कोणी ठाव ॥ ध्रु ॥
चित्त जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पोटीं । देव घालुनि सांगे गोष्टी ॥ ३ ॥

॥ १६६६ ॥

सांपडला हातीं । तरी जाली हे निश्चिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं धांवा[2] घेत मन । इंद्रियांचें समाधान ॥ ध्रु ॥
सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ॥ २ ॥
तुका ह्मणे काम । निरसुनियां घेतों नाम ॥ ३ ॥

॥ १६६७ ॥

मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बैसला गोविंद जडोनियां चित्तीं । आदि[3] ते चि अंतीं अवसानीं[4] ॥ ध्रु ॥
भोग नारायणा देऊनि निराळीं । ओविया मंगळीं तो चि गाती ॥२॥
बळ बुद्धि त्यांची उपकारासाटीं । अमृत तें पोटीं सांटवलें ॥ ३ ॥
दयावंत तरी देवा च सारिखीं । आपुलीं पारखीं नोळखती ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्यांचा जीव तो चि देव । वैकुंठ तो ठाव वसती [5]ते ॥५॥

॥ १६६८ ॥

सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं[6] । वैष्णवां चरणीं[7] होइन जोडा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें जन्म आतां मज देईं देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ॥ध्रु॥
त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीर्त[8] ते शिरीं जाइन मागें ॥ २ ॥

---

१ प. तरी.—२ पं. धांव.—३ पं. आदि तो चि अवसानीं.—४ दे. त. अवसान.—५ दे. पं. तो.—६ पं. चरणीं—७ त. पं. वैष्णवांचे न्हाणी होइन किडा.—८ त. पं. वंदीन.

तुका ह्मणे येथें राहिलासे भाव । सकळ ही वाव जाणोनियां ॥ ३ ॥

॥ १६६९ ॥

क्षेम देयाला[1] हो । स्फुरताती दंड बाहो ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां झडझडां चालें । देईं उचलूं पाउलें ॥ ध्रु ॥

सांडीं[2] हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ॥ २ ॥

तुका ह्मणे आई । श्रीरंगे विठाबाई ॥ ३ ॥

॥ १६७० ॥

जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कंठ कंठा मिळों देईं । माझा वोरस तूं घेईं ॥ ध्रु ॥

नको पीतांबर । सांवरूं हे अळंकार ॥ २ ॥

टाकीं वो भातुकें । लौकिकाचें[3] कवतुकें ॥ ३ ॥

हांतां[4] पायां नको । कांहीं वेगळालें राखों ॥ ४ ॥

तुका ह्मणे यावरी । मग सुखें अळंकारीं ॥ ५ ॥

॥ १६७१ ॥

कृपेचा ओलावा । दिसे वेगळा चि देवा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मी हें इच्छीतसें साचें । न लगे फुकटशाई[5] काचें ॥ ध्रु ॥

जेणें जाय कळसा । पाया उत्तम तो तैसा ॥ २ ॥

तुका ह्मणे घरीं । तुझ्या अवघिया परी ॥ ३ ॥

॥ १६७२ ॥

दावूनियां कोणां कांहीं । ते चि वाहीं चाळविलीं ॥ १ ॥

---

१ "द्यायाला" याबद्दल.—२ पं. सांडीं हे संगती.—३ पं. लौकिकाची.—४ पं. आतां.—५ पं. फुकटसाई काचें.

॥ ध्रु. ॥ तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ॥ ध्रु ॥
रिद्धिसिद्धी[1] ऐसीं आड । येती नाड नागवूं ॥ २ ॥
उदकाऐसी[2] दावुनि ओढी । उर फोडी झळई[3] ॥ ३ ॥
दर्पणींचें दिलें धन । दिसे पण चरफड[4] ॥ ४ ॥
तुका ह्मणे पायांसाटीं । करीं[5] आटी[6] कळों द्या ॥ ५ ॥

॥ १६७३ ॥

काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतीचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी ॥ ध्रु ॥
लावूं धांवे मुख स्तना । नये मना निराळें ॥ २ ॥
भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ॥ ३ ॥
माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ॥ ४ ॥
तुका ह्मणे नारायणा । तुह्मी जाणां बुझावूं ॥ ५ ॥

॥ १६७४ ॥

तरीं आह्मी तुझी धरियेली कास । नाहीं कोणी दास वांयां गेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आगा पंढरीशा[7] उभ्या[8] विटेवरी । येईं लवकरी धांवें[9] नेटें ॥ ध्रु ॥
पालविती[10] तुज उभी करोनि बाहे । कृपावंता पाहें मजकडे ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज बहु कान डोळे । कां[11] हे माझे वेळे ऐसी परी ॥ ३ ॥

॥ १६७५ ॥

करावा कांटाळा नव्हे हें उचित । आधीं च कां प्रीत लाधियेली ॥ १ ॥

---

१ दे. रिद्धिसिद्धी ऐसे आड ।.—२ दे. उदकाऐसे.—३ पं. झळाळी.—४ दे. चरफडी.—५ पं. करितों.—६ दे. आट.—७ दे. पंढरीच्या—८ पं. उभा.—९ त. पं धांव.—१० पं. पाल वितों वरी उभारोनि बाहे.— ११ पं. कांगा माझे०.

॥ ध्रु. ॥ जाणतसां तुह्मीं रूपाचें लाघव । आपुलें तें जीव घेतें ऐसा ॥ ध्रु. ॥
काय ह्मणऊनि आलेती आकारा । आह्मां उजगरा करावया ॥ २ ॥
तुका ह्मणे भीड होती आजिवरी । आतां देवा उरी कोण ठेवी ॥ ३ ॥

॥ १६७६ ॥

धरूनि पालव असुडीन करें । मग काय बरें दिसे लोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तें विचारा ठायींचें आपणां । जो हा नारायणा अवकाश ॥ ध्रु. ॥
अंतर पायांसी तों वरी या गोष्टी । पडिलिया मिठी हालों नेदीं ॥ २ ॥
रुसलेती तरी होइल बुझावणी । तांतडी करूनि साधावें हें ॥ ३ ॥
सांपडलिया आधीं कारणासी ठाव । येथें करूं भाव दृढ आतां ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझे ठाउके बोभाट । मग खटपट चुकली ते ॥ ५ ॥

॥ १६७७ ॥

निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचा चि ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ तूं माझा जनिता तूं माझा जनिता । रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥ ध्रु. ॥
मुळींच्या ठेवण्यां आहे अधिकार । दुरावोनि दूर गेलों होतों ॥ २ ॥
पोटींच्या आठवा पडिला विसर । कांहीं आला भार माथां तेणें ॥ ३ ॥
राखिला हा होता बहु चौघां चार । साक्षीनें व्यवहार निवडिला ॥ ४ ॥
तुका ह्मणे कांहीं बोलणें न लगे । आतां पांडुरंगे तूं मी ऐसें ॥ ५ ॥

॥ १६७८ ॥

सांगतां गोष्टी लागती गोडा । हा तो रोकडा अनुभव ॥ १ ॥

---

१ पं. आपुलाले जीव०.–२ पं. जोडा नारा०.–३ त. पं. ठेवण्या.–४ दे. त. वेव्हार.–
५ पं. " तूं मी " याबद्दल " तुझी."

॥ ध्रु. ॥ सुख जालें सुख जालें । नये बोलें बोलतां ॥ ध्रु ॥
अंतर तें नये दिसों । आतां सोस कासया[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे जतन करूं । हें चि धरूं जीवेंसी ॥ ३ ॥

॥ १६७९ ॥

मजशीं पुरें न पडे वादें । सुख दोहींच्या संवादें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं चि आगळा काशानें । शिर काय पायांविणे ॥ ध्रु ॥
वाहों तुझा भार । दुःख साहोनि अपार ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं भेद । देवा करूं नये वाद ॥ ३ ॥

॥ १६८० ॥

तुज नाहीं शक्ति । काम घेसी आह्मां हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें अनुभवें पाहीं । उरलें बोलिजेसें नाहीं ॥ ध्रु ॥
लपोनियां आड । आह्मां तुझो[2] कैवाड ॥ २ ॥
तुका ह्मणे तुजसाटीं । आह्मां संवसारें[3] तुटी ॥ ३ ॥

॥ १६८१ ॥

तुझ्याठायीं[4] ओस । दोन्ही पुण्य आणि दोष ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ झडलें[5] उरलें किती । आह्मीं धरियेलें चित्तीं ॥ ध्रु ॥
कळलासी नष्टा । यातिक्रियाकर्मभ्रष्टा ॥ २ ॥
तुका ह्मणे बोला । नाहीं ताळा गा विठ्ठला ॥ ३ ॥

॥ १६८२ ॥

भांडावें तों हित । ठायीं पडों[6] तें उचित ॥ १ ॥

---

१ पं कराया.—२ पं. ० तुझा कधी वाड ।.—३ पं. संसार तुटी.—४ दे. त. तुझाठायीं.—
५ पं. झडले किती आह्मी । आह्मों धरि०.—६ पं. पडतें उचित.

॥ धु. ॥ नये खंडों देऊं वाद । आह्मां भांडवलभेद ॥ ध्रु ॥
शब्दसारसें भेटी । नये पडों देऊं तुटी ॥ २ ॥
तुका ह्मणे आळस । तो चि कारणांचा नास ॥ ३ ॥

॥ १६८३ ॥

नव्हीं गांढे आळसी । जो तूं आह्मांपुढें जासी ॥ १ ॥
॥ धु. ॥ अरे दिलें आह्मां हातीं । वर्म वेवादाचें संतीं ॥ ध्रु ॥
धरोनियां वाट । जालों शिरोमणि थोंट ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । वाद करीन खरी सेवा ॥ ३ ॥

॥ १६८४ ॥

तुझा विसर नको माझिया जीवा । क्षण एक केशवा मायबापा ॥ १ ॥
॥ धु. ॥ जाओ राहो देह आतां ये चि घडी । कायसी आवडी याची मज ॥ ध्रु ॥
कुश्चीळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ॥ २ ॥
पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ॥ ३ ॥
पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेकीं लागे ज्याचा त्यासी देणें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ १६८५ ॥

ऐसें सत्य माझें येईल अंतरा । तरि मज करा कृपा देवा ॥ १ ॥
॥ धु. ॥ वचनांसारिखें तळमळी चित्त । बाहेरि तो अंत होइल भाव ॥ ध्रु ॥

---

१ पं. शब्द सरसे.–२ "विवादाचें" याबद्दल.–३ पं. जाला.–४ पं. रे.–५ पं. कुश्चळ.–६ त. करी.–७ त. पं. माझ्या.–८ पं. देईल.

तरि मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणसी दास खरा ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्य निकट सेवकें[1] । तरि च भातुकें प्रेम द्यावें ॥ ३ ॥

॥ १६८६ ॥

आदि वर्तमान जाणसी भविष्य । मार्ग पुढें नीस संचिताचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणां तो विचार करा देवा ॥ ध्रु ॥
आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥ ३ ॥

॥ १६८७ ॥

सुख न मनी अवगुण । दुःख[2] भोगी[3] त्याचें कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें कां ठायींचें न कळे । रातीं करा झांकुनि डोळे ॥ ध्रु ॥
चालोनि आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥ २ ॥
तुका ह्मणे कोणा । बोल ठेवितो शाहाणा ॥ ३ ॥

॥ १६८८ ॥

आह्मी न देखों अवगुणां । पापी पवित्र शाहाणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ॥ ध्रु ॥
मज[4] भक्तीसवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ॥ २ ॥
तुका ह्मणे घोटीं । विष अमृत तुजसाटीं ॥ ३ ॥

॥ १६८९ ॥

मज नाहीं तुझ्या ज्ञानाची[5] ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ॥ १ ॥

---

१ पं. सेवक.—२ पं. दुःख त्याचे भोगी कोण ।.—३ त. भोगील.—४ दे. मज मुक्ती सवें०.—५ त. ज्ञानाची हे चाड. दे. ज्ञानाची चाड.

॥ ध्रु. ॥ नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतों वचनें आवडीनें ॥ ध्रु.॥
भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ २ ॥
तुका ह्मणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ॥ ३॥

॥ १६९० ॥

काय माझी संत पाहाती जाणीव । सर्व माझा भाव त्यांचे पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ॥ध्रु.
बोबडया[1] उत्तरीं ह्मणें हरिहरि । आणीक भीकारी नेणें दुजें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची ॥ ३॥

॥ १६९१ ॥

जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रह्मांड भूषणु नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजांचा निवांत नारायण ॥ध्रु.॥
गोडाचें ही गोड हर्षाचें ही कोड । प्रीतीचा ही लाड नारायण ॥ २॥
भावाचा निज भाव नांवांचा ही[3] नांव । अवघा पंढरिराव अवतरलासे[4] ॥ ३ ॥
तुका[5] ह्मणे जें हें साराचें हें सार । माझा अंगीकार तेणें केला ॥ ४ ॥

॥ १६९२ ॥

आतां मी सर्वथा नव्हें[6] गा दुर्बळ । यातिहीनकुळ दैन्यवाणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥ध्रु.॥
बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ॥ २ ॥
दुष्ट[7] नव्हों आह्मी अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ॥ ३ ॥

---

१ त. कोण.--२ दे. त. बोवडा.--३ दे त. हा.--४ पं. अवतरला.--५ पं. तुका ह्मणे हें साराचे ही सार.--६ पं. नोव्हें.--७ दे. त. पं. दृष्ट

संवसार आह्मां सरला सकळ । ह्मणोनियां काळ ठेला धाकें ॥ ४ ॥
तुका ह्मणे जालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ॥ ५ ॥

॥ १६९३ ॥

केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबग उद्वेग नाहीं चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव चि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ॥ ध्रु ॥
त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ॥ २ ॥
तुका ह्मणे आपओपणां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुह्मां ॥ ३ ॥

॥ १६९४ ॥

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चिंत्तशुद्धि सेवा देवाची हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥ ध्रु ॥
आणीकां अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥ २ ॥
तुका ह्मणे बाण हा चि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥ ३ ॥

॥ १६९५ ॥

हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ॥ ध्रु ॥
ज्यांचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ॥ २ ॥
तुकाँ ह्मणे भावें । जिव्हें प्रेम वोसंडावें ॥ ३ ॥

---

१ दे. उबगें.–२ दे. त. पं. ०आपण्यां.–३ दे. त. चित्त शुद्द –४ दे. नेदावी.–५ त. पं. आवडीनें.–६ त. अंतरीं निर्मत्सर। सबाह्य कोमळ जिव्हार ॥. दे मूळ पाठ कायम ठेवून हा पाठ समासांत दाखविला आहे.–७ पं. तुका ह्मणे जीवें । जिही प्रेम०

॥ १६९६ ॥

हरिची हरिकथा नावडे जया । अधम ह्मणतां तया वेळ लागे ।
मनुष्यदेहीं तया नांट लागलें । अघोर सोविलें कुंभपाक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं ॥
उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परि लाज लंड न धरी कांहीं ॥ ध्रु ॥
ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी ।
देवधर्माविण चांडाळ हा नर । न साहे भूमि भार क्षणभरी ॥ २ ॥
राम ह्मणतां तुझें कांय तें वेचलें । कां हित आपुलें न विचारिसी ।
जन्मोजन्मींचा होईल नरकीं । तुका ह्मणे चुकी जरी यासी ॥ ३ ॥

॥ १६९७ ॥

उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईकिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनियां ॥ ध्रु ॥
माझ्या दोषासाटीं होइल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ॥ २ ॥
तुका ह्मणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ॥ ३ ॥

॥ १६९८ ॥

आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंतें हें मग जालें नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळे ऐशा वाटा रचिल्या सुलभा । दुर्गम या नभाचा ही साक्षी ॥ ध्रु ॥

---

१ प. ०नाट पैं लागला । अघोर साधिला कुंभ०.—२ त. साधिलें.—३ दे. परिलाज न०. पं. परि न धरी लंड लाज कांहीं—४ दे. त. तो हा चांडाळ।.—५ दे. त. काय वेचेल.—६ पं. होसील.—७ पं. जयासी.—८ त. पं. पाठीमोरा.—९ पं. अनंत हीं मग जालीं नामें.

हातें जेवी एक मुखीं मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें ध्यान विटेवरी । तैसी च गोजिरी दिसे मूर्ति ॥ ३ ॥

॥ १६९९ ॥

धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य जालों आतां यासि संदेह नाहीं । न पडों या वाहीं काळा हातीं ॥ ध्रु ॥
ब्रह्मरस करूं भोजन पंगती । संतांचे संगती सर्वकाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पोट धालें चि न धाये । खादलें चि खायें आवडीनें ॥ ३ ॥

॥ १७०० ॥

आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरेसवें गांठी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न पुरे हा जन्म हें सुख सांटितां । पुढती ही आतां हें चि मागों ॥ ध्रु ॥
मारगाची चिंता पालखी बैसतां । नाहीं उसंतितां कोसपेणी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक तान ॥ ३ ॥

॥ १७०१ ॥

नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । ह्मणऊनि मन स्थिरावलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरियेलीं जीवीं पाउलें कोमळीं । केली एकावळी नाममाळा ॥ ध्रु ॥
शीतळ होऊनियां पावलों विश्रांती । न साहे पुढती घाली चित्ता ॥ २ ॥
तुका ह्मणे जाले सकळ सोहळे । पुरविले डोहळे पांडुरंगें ॥ ३ ॥

---

१ दे. माळा.–२ पं. यावा कांहीं.–३ दे. धरे.–४ पं. कोवळी । कंठीं एका०.–५ पं. पांडुरंगा.

॥ १७०२ ॥

मायबापापुढें लाडिकें लेंकरूं । तैसे बोल करूं कवतुकें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपावंता घालीं प्रेमपान्हारस । वोळली वेरेस पांडुरंग ॥ ध्रु ॥
नाहीं धीर खुंटी जवळी हुंबरे । ठायीं च पाखर कवळिते ॥ २ ॥
तुका ह्मणे मज होऊं नेदी सीण । कळों नेदी भिन्न आहे ऐसें ॥ ३ ॥

॥ १७०३ ॥

आठवों नेंदी आवडी आणीक । भरूनियां लोक तिन्ही राहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन धांवे तेथें तिचें चि दुभतें । संपूर्ण आइतें सर्वकाळ ॥ध्रु॥
न लगे वैळावीं[3] इंद्रियें धांवतां । ठाव नाहीं रिता उरों दिला ॥ २ ॥
तुका ह्मणे समपाउलाचा खुंट । केला[4] बळकट हालों नेदी ॥ ३ ॥

॥ १७०४ ॥

उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दुःखी होऊनि तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न बैसे न वजे जवळूनि दुरी । मागें पुढें वारी घातपात ॥ ध्रु॥
नाहीं शंका असो भलतिये ठायीं । मावळले पाहीं द्वैताद्वैत ॥ २ ॥
तुका ह्मणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाह्य रूप ॥ ३ ॥

॥ १७०५ ॥

आह्मां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहों कंठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वांचे नामघोष ॥ ध्रु ॥
आह्मां आणिकांची चाड चि पै नाहीं । सर्व सुखें पायीं विठोबाच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी नेघों[10] चि या मुक्ती । ऐकाविण चित्तीं दुजें नाहीं ॥ ३ ॥

---

१ दे. लाटिकें.—२ दे. वोरसे.—३ दे. त. वोळावीं.—४ पं. जाला.—५ पं. होऊं नेदी.—६ पं. राहो.—७ पं. वाचा.—८ दे. चाड चि नाहीं. पं. चाड चित्तीं नाहीं.—९ पं. त सुख.—१० दे. त. नेघों या.—११ दे. त. एकाविण.

॥ १७०६ ॥

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥ ध्रु. ॥[1]
संतां[2] महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ २ ॥
तें[3] तीर्थांचें माहेर । सर्वसुखाचें भांडार ॥ ३ ॥
जन्म नाहीं रे आणीक । तुका ह्मणे माझी भाक ॥ ४ ॥

॥ १७०७ ॥

पैल घरीं जाली चोरी । देहा करीं[4] बोंब ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हाबा हाबा करिसी काये[5] । फिराऊनि नेघ्यां वांयें ॥ ध्रु. ॥
सांडुनियां शुद्धी । निजलासी गेली बुद्धि ॥ २ ॥
चोरीं तुझा काढिला बुर । वेगळें भावा घातलें दूर ॥ ३ ॥
भलतियासी देसी वाव । लाहेसि तूं एवढा ठाव ॥ ४ ॥
तुका ह्मणे अझुनि तरी । उरलें तें[6] जतन करीं ॥ ५ ॥

॥ १७०८ ॥

किती वेळा खादला दगा । अझून कां गा जागसी ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाज नाहीं हिंडतां गांवें । दुःख नवें नित्य नित्य ॥ ध्रु. ॥
सर्वे चोरा हातीं फांसे । देखतां कैसे न देखसी ॥ २ ॥
तुका ह्मणे सांडिती वाट । तळपट करावया ॥ ३ ॥

॥ १७०९ ॥

मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ॥ १ ॥

---

१ त. " होईल सज्जन । संतजन भेटती ॥ " हें कडवें आढळतें. दे. हें मागून बाहेर घातलें आहे. पं. हें मुळींच नाहीं. याचा अर्थ पुढील कडव्यात आला आहे.--२ दे. पं. यांत हें कडवें आहे; त. नाहीं. पं. संत महंता०.–३ पं. तेथें.–४ पं. देहा बोंब करी.–५ पं. चाये.–६ त. तया.

॥ ध्रु. ॥ आणिकांची कां लाज नाहीं । आळसा जिहीं तजिलें ॥ ध्रु ॥
एके सांते सरिखीं[1] वित्तें । हानि हित वेगळालीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हित धरा । नव्हे पुरा गांवढाळ ॥ ३ ॥

॥ १७१० ॥

निरोप सांमतां । न धरीं भय न करीं चिंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असो ज्याचें त्याचे[2] माथां । आपण करावी ते कथा ॥ ध्रु ॥
उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ॥ २ ॥
तुका ह्मणे वाहे धाक । तया इह ना परलोक ॥ ३ ॥

॥ १७११ ॥

शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला न संडी कैवाड । जीवेंसाटीं तों हे होड[3] ॥ ध्रु ॥
धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥ २ ॥
तुका ह्मणे हरि । दासां रक्षितो[4] निर्धारीं ॥ ३ ॥

॥ १७१२ ॥

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तें[5] ही नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥ ध्रु ॥
हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥ २ ॥
खावें ल्यावें द्यावें । तुका ह्मणे पुरवावें ॥ ३ ॥

॥ १७१३ ॥

दासां सर्व काळ । तेथें सुखाचे[6] कल्लोळ ॥ १ ॥

---

१ पं. सारिखे.–२ दे. " त्याचे " याबद्दल " त्याचे त्याचे ".–३ पं. होड.–४ त. रक्षिता.–५ पं. " तेंही " याबद्दल " परी ".–६ पं. सुखाचा.

॥ ध्रु. ॥ जेथें वसती हरिदास । पुण्य पिके पापा नास ॥ ध्रु ॥

फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ॥ २ ॥

तुका ह्मणे घरीं । होय ह्मणियारा कामारी ॥ ३ ॥

॥१७१४ ॥

आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मायबापाचीं लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ॥ ध्रु ॥

नाहीं निपरादे । कोणां आह्मांमध्यें भेद ॥ २ ॥

तुका ह्मणे मान । अवघें आमचें हें धन ॥ ३ ॥

॥ १७१५ ॥

काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ ध्रु ॥

काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करूनी टाकी ॥२॥

तुका ह्मणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥ ३ ॥

॥ १७१६ ॥

आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत । घेऊं अगणित प्रेमसुख ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ गोप्य धन नये वारा लागों यास । पाहों नेदूं वास दुर्जनासी ॥ ध्रु ॥

झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आपणासी ॥ २ ॥

तुका ह्मणे हें बहु सकुमार । न साहावे भार वचनाचा ॥ ३ ॥

---

१ पं. हरिचे दास.—२ त निपराध. पं. निरपराध.—३ पं. खरासी लेपन.—४ पं. तुका ह्मणे बहु असे सकुमार ।.

॥ १७१७ ॥

मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें । आह्मां जन्म घेणें युगायुगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विटे ऐसें सुख नंव्हे भक्तिरस । पुंडतीपुडती आस सेवावें हें ॥ ध्रु ॥
देवा हातीं रूप धंरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥ २ ॥
तुका म्हणे चित्त निवांत राहिलें । ध्याई तीं पाउलें विटेवरि ॥ ३ ॥

॥ १७१८ ॥

नंको बोलों भांडा । खीळ घालुन बैस तोंडा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐक विठोबाचे गुण । करीं सादर श्रवण ॥ ध्रु ॥
प्रेमसुखा आड । काय वाजतें चाभाड ॥ २ ॥
तुका म्हणे हिता । कां रे नागवसी थीता ॥ ३ ॥

॥ १७१९ ॥

अति जालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न ह्मगावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोल वाव थोरपण ॥ ध्रु ॥
शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आंविर्भाव आणिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे सोंग पोटाचे उपाय । कारण कमाईविण नाहीं ॥ ३ ॥

॥ १७२० ॥

शूरां साजती हतियारें । गांढ्यां हांसतील पोरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय केली विटंबण । मोतीं नासिकावांचून ॥ ध्रु ॥
पतिव्रते रूप साजे । सिंदळ काजळ लेतां लाजे ॥ २ ॥

---

१ पं. नाहीं.—२ प. पुढपुढती आस सेवावी हे ।.—३ पं. धरवूं.—४ पं. नये.—५ दे. वाजातें.—६ दे. त. पं. आयुर्भाव.

दासी पत्नी सुता । नव्हे सरी ऐक पिता ॥ ३ ॥

मान बुद्धिमंतां । थोर न मानिती[3] पिता ॥ ४ ॥

तुका ह्मणे तरी । आंत शुद्ध दंडे[4] वरी ॥ ५ ॥

॥ १७२१ ॥

काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हा तों ठायींचा विचार । आहे यातिवैराकार ॥ ध्रु ॥

श्वापदातें वधी । निरपराधें पारधी ॥ २ ॥

तुका ह्मणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥ ३ ॥

॥ १७२२ ॥

वाइटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ एकाविण एका । कैंचें मोल होतें फुका ॥ ध्रु ॥

विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥ २ ॥

काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ॥ ३ ॥

उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ॥ ४ ॥

तुका ह्मणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ५ ॥

॥ १७२३ ॥

असो खळ ऐसे फार । आह्मां त्यांचे उपकार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ करिती पातकांची धुनी । मोल न घेतां सांबर्णी ॥ ध्रु ॥

फुकाचे मजुर । ओझें वागविती भार ॥ २ ॥

पार उतरून ह्मणे तुका । आह्मां आपण जाती नरका ॥ ३ ॥

---

१ त.एक चि पिता.–२ दे. पं. बुद्धिवंतां.–३ त. ह्मणावा.–४ पं. दंड.–५ पं. दाखविलें.–६ पं. दिवेंस कळों आली राती ।.–७ पं. ऐसे खळ.–८ दे. सावर्नी.

॥ १७२४ ॥

संत पंढरीस जाती । निरोप धाडीं[1] तया हातीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझा न पडावा विसर । तुका विनवितो किंकर ॥ ध्रु ॥

केरसुणी महाद्वारीं । ते मी असें निरंतरीं ॥ २ ॥

तुमचे पायीं पायें[2]तन । मोचे माझे तन मन ॥ ३ ॥

तांबुलांची[3] पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ॥ ४ ॥

तुमची विष्ठां[4] पंढरीराया । ते[5] सारसुबी माझी काया ॥ ५ ॥

लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ॥ ६ ॥

तुका ह्मणे पंढरिनाथा । दुजें न धरावें सर्वथा ॥ ७ ॥

॥ १७२५ ॥

इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकलिलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ यांचा विश्वास तो काई । ऐसें विचारूनि पाहीं ॥ ध्रु ॥

सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले[6] जाणतां ॥ २ ॥

पिंड पाळितां ओसरे । अवघी[7] घेऊनि मागें सरे ॥ ३ ॥

करितां उपचार । कोणां नाहीं उपकार ॥ ४ ॥

अल्प जीवन करीं । तुका ह्मणे साधीं हरी ॥ ५ ॥

॥ १७२६ ॥

यज्ञनिमित्त तें[8] शरिरासी बंधन । कां रे तृष्णा वांयांविण वाढविली ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनीं बंधन केलें तुज ॥ ध्रु ॥

आशा धरूनि फळाची । तीर्थीं व्रतीं मुक्ति कैंची ॥ २ ॥

---

१ पं. धाडिन.–२ दे. त. पाइतन.–३ पं. तांबोल पिकधरणी –४ दे. पं. इष्टा.–५ पं "ते" शब्द नाहीं.–६ पं. फिरला.–७ पं. अवघें.–८ पं. "तें" नाहीं.

तुका ह्मणे सिणसी वांयां । शरण न वजतां पंढरिराया ॥ ३ ॥

॥ १७२७ ॥

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें घडे नाम उच्चारितां ।
न वेचे मोल कांहीं लगती न सायास । तरी कां आळस करिसी झणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें हें सार कां नेघेसी[1] फुकाचें । काय तुझें वेचे मोल तया ॥ ध्रु ॥
पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा ।
अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलूनि परलोका ॥ २ ॥
अंतकाळीं गणिका पक्षियाच्या छंदें । राम राम उच्चारिलें ।
तंव त्या दिनानाथा कृपा आली । त्यानें तियेसि[2] वैकुंठा नेलें ॥ ३ ॥
अवचिता नाम आलिया हे गती । चिंतितां चित्तीं जवळी असे[3] ।
तुका ह्मणे भावें स्मरा[4] राम राम । कोण जाणे तये दशे ॥ ४ ॥

॥ १७२८ ॥

दुष्टाचें चित्त[5] न भिंने[6] अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ।
पालथे घागरी घातलें जीवन । न धरी च जाण[7] तें ही त्याला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जन्मा येउनि तेणें पतन चि साधिलें । तमोगुणें[8] व्यापिलें जया नरा ।
जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥ ध्रु ॥
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो ।
कुचर मुग नेये[9] चि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ॥ २ ॥
तुका ह्मणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्नें[10] कांहीं ।

---

१ पं. न घेसी.–२ दे. तयेसी.–३ त उभा.–४ पं. स्मरता.–५ पं. चिंतन भिन्न तें अंतरीं ।.–६ दे. त. भिन्ने.–७ पं. जाणें.–८ पं. तमोगुण.–९ पं. नये चि हा पाका.–१० दे. त. पं. प्रेत्न.

ह्मणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥ ३ ॥

॥ १७३० ॥

कासियानें पूजा करूं केशीराजा । हा चि संदेह माझा फेडीं आतां ॥१॥
॥ ध्रु. ॥ उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा
॥ ध्रु ॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥ २ ॥
फळदाता तूंच तांबोल अक्षता । तरी काय आतां वाहों तुज ॥ ३ ॥
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण । ब्रह्म तें चि अन्न दुजें काई ॥ ४ ॥
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥ ५ ॥
तुका ह्मणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि ॥ ६ ॥

॥ १७३१ ॥

गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रागें यमधर्म जाचविती तया । तुज दिलें कासया मुख कान
॥ ध्रु ॥
विषयांच्या सुखें अखंड जागसी । न वजे एकादशी जागरणा ॥ २ ॥
वेचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥ ३ ॥
तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्टें लोभें ॥ ४ ॥
तुका ह्मणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥ ५ ॥

॥ १७३२ ॥

तुझें ह्मणवितां काय नास जाला । ऐकें बा विठ्ठला कीर्ति तुझी ॥ १ ॥

---

१ दे. स्वरूप तुझें. त. स्वरूप चि तुझें.–२ पं. वाहूं –३ पं. तरी.–४ पं. पार –५ पं. पुष्टिलोभें.–६ पं. केला मग.

॥ ध्रु. ॥ परी तुज नाहीं आमचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥ ध्रु ॥
समूळीं संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ॥ २ ॥
लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसी नाहीं थार ऐसें केलें ॥ ३ ॥
मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपले ते कोण पर नेणों[1] ॥ ४ ॥
तुका ह्मणे जालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ॥ ५ ॥

॥ १७३३ ॥

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ अंतरीचें शुद्ध कासयानें जालें । भूषण त्वां[2] केलें आपणया ॥ध्रु ॥
वृंदावन[3] फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडे चि ना ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुह्मी ॥ ३ ॥

॥ १७३४ ॥

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येऊनि अंतरीं राहील[4] गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ध्रु॥
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होईल[5] भाव एकविध ॥ ३ ॥

॥ १७३५ ॥

धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरिये ॥ १[6] ॥
॥ ध्रु. ॥ न पवीजे केल्या तपांचिया रासी । तें[7] जनलोकांसी दाखविलें ॥ ध्रु ॥

---

१ पं. नेणें.—२ दे. तों.—३ दे. त. इंद्रावण.—४ त. राहेल.—५ पं. होय.—६ पं. "न करीं आळस आलिया संसारी । पाहें पा पंढरी भूवैकुंठ ॥" हें कडवें जास्त आहे. त. हें समासावर आळीकडे कोणी घातलें आहे; परंतु हें मूळचें येथलें नव्हे असें वाटतें.—७ त. तें हें जन०.

सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनीं हा भाव निवडिला ॥ २ ॥
विष्णुपद गया [1]रामधाम काशी । [2]अवघीं पायांपाशीं विठोबाच्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ [3]यां नास अहंकाराचा ॥४॥

॥ १७३५ ॥

धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य तो हि लोक अवघा दैवांचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥ ध्रु ॥
धन्य ते [4]ही भूमी धन्य तरुवर । [5]धन्य तें सरोवर तीर्थरूप ॥ २ ॥
धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें [6]भवन गर्जतसे ॥ ३ ॥
धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण [7]अवतरला ॥ ४ ॥
तुका ह्मणे धन्य संसारातें आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥ ५ ॥

॥ १७३६ ॥

मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ ध्रु ॥
कर्णद्वारें पुराणिक । भुलवी [8]शब्दें लावी [9]भीक ॥ २ ॥
वैष्णवां संगतीं । हातीं [10]पडलीं नेणों किती ॥ ३ ॥
आह्मा कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ॥ ४ ॥
तुका ह्मणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ॥ ५ ॥

॥ १७३७ ॥

मन माझें चंपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥ १ ॥

---

१ त. पं. रामनाम.—२ पं. अवघें —३ पं. चि.—४ पं. " ही " नाहीं.—५ दे. धन्य ते सुरवर०. पं धन्य सरोवर.—६ प. भुवन.—७ पं. अवतरलासे.—८ पं. शब्द.—९ त. भीके.—१० पं. पडी

॥ ध्रु. ॥ आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥ ध्रु ॥
धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तेंडातोंडी चित्त माझें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥ ३ ॥

॥ १७३८ ॥

मागतियाचे दोनि च कर । अमित भांडार दातियाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं आतां कासयांत भरूं । हा मज विचारु पडियेला ॥ ध्रु ॥
एकें सांटवणें प्रेमें वोसंडलीं । जिव्हा हे भागली करितां माप ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आहे तेथें असो । अंखुनियां बैसों पायांपाशीं ॥ ३ ॥

॥ १७३९ ॥

जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥ ध्रु ॥
सुखाची विश्रांति । उमटे मातेचिये चित्तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे संत । तुह्मी बहु कृपावंत ॥ ३ ॥

॥ १७४० ॥

यावें माहेरास । हे च सर्वकाळ आस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्यावी उच्छिष्टाची धणी । तीर्थ इच्छी पायवणी ॥ ध्रु ॥
भोग उभा आड । आहे तोंवरी च नाड ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । माझें सिद्धी पाववावें ॥ ३ ॥

॥ १७४१ ॥

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥

---

१ पं. धाव—२ दे. तडातडी.—३ दे तयेचा.

॥ ध्रु. ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभेंविण प्रीती ॥ ध्रु ॥
पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्व ही साहे ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ॥ ३ ॥

॥ १७४२ ॥

आह्मां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों पोरटीं निढळें । नाहीं ठाव बुड आळें ॥ ध्रु ॥
आह्मीं जना भ्यावें । तरि कां न लाजिजे देवें ॥ २ ॥
तुका ह्मणे देश । जा[1]ला देवाविण ओस ॥ ३ ॥

॥ १७४३ ॥

तुह्मी पाय संतीं । माझे ठेवियेले चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां बाधूं न सके काळ । जालीं विषम शीतळ ॥ ध्रु ॥
भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भये । आतां स्व[2]प्नीं ही तें नये ॥ ३ ॥

॥ १७४४ ॥

काळाचे ही काळ । आह्मी विठोबाचे लडिवाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूं सत्ता सर्वां ठायीं । वसों निकट[3]वासें पायीं ॥ ध्रु ॥
ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे समोरी ॥ २ ॥
तुका ह्मणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ॥ ३ ॥

॥ १७४५ ॥

जन्मा येऊन. उदार जाला । उद्धार केला वंशाचा ।

---

१ त. देवा विण पडिला ओस ।. पं. जाले देवाविण०.—२ पं. स्वप्नीं वें ही. दे. स्वप्नीं ही नये.—३ त. पं.० वास.

मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ती भोगीतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया ।
धर्म करितां ऐके कानीं । बांधे निजोनि डोकियासी ॥ ध्रु ॥
घरा व्योंही पाहुणा आला । ह्मणे त्याला बरें नाहीं ।
तुमचे गावीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ॥ २ ॥
उजवूं किती होतिल पोरें । मरतां बरें ह्मणे यांसी ।
ह्मणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ॥ ३ ॥
पर्वकाळीं भट घरासी आला । बोंब घाला ह्मणे पोरां ।
तुमचा उणा होईल वांटा । काळ पिठासी आला ॥ ४ ॥
दाढी करितां अडका गेला । घरांत आला बाइलेपें ।
ह्मणे आतां उगवीं मोडी । डोई बोडीं आपुली ॥ ५ ॥
तीर्थ स्वर्मी नेणे गंगा । पूजन लिंगा गांविंचिया ।
आडकुनि दार बैसे दारीं । आल्या घर ह्मणे ओस ॥ ६ ॥
तुका ह्मणे ऐसे आहेत गा हरी । या ही तारीं जीवांसी ।
माझ्या भय वाटे चित्तीं । नरका जाती ह्मणोनि ॥ ७ ॥

॥ १७४६ ॥

जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्यानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो ही कारणांचा दास । देव ह्मणवितां पावे नास ॥ ध्रु ॥
वेची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचें । मुदल गेलें हाटवेचें ॥ ३ ॥

---

१ त. मेळाविलें.—२ त. पाहुणा व्याही.—३ पं. होती.—४ त. येईल.—५ पं. पिठासी पैं आला.—६ पं. द्वार बैसे द्वारीं.

॥ १७४७ ॥

घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मी भांडारी देवाचे । द्यावें घ्यावें माप वाचे ॥ ध्रु ॥

उगवूं जीर्णा मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ॥ २ ॥

तुका ह्मणे पुडी । मोले तैसी खरी कुडी ॥ ३ ॥

॥ १७४८ ॥

सादाविलें एका । सरें अवघियां लोकां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां आवडीचे हातीं । भेद नाहीं ये पंगती ॥ ध्रु ॥

मोकळी च पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ॥ २ ॥

तुका ह्मणे बरा । आहे ढैसाळ वेव्हारा ॥ ३ ॥

॥ १७४९ ॥

तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जेणें खंडे एके खेपे । जाय तेथें लाभें वोपे ॥ ध्रु ॥

दाविल्या सारिखें । मागें नसावें पारिखें ॥ २ ॥

मागें पुढें ऋण । तुका ह्मणे फिटे हीण ॥ ३ ॥

॥ १७५० ॥

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ ध्रु ॥

राहों नेदी बाकी । दांन ज्याचें त्यासी टाकी ॥ २ ॥

होवा वाटे जना । तुका ह्मणे सार्टी गुणां ॥ ३ ॥

---

१ पं. जाणें.—२ पं. मोला तैसी०.—३ त. ढीसाळ.—४ पं. ज्याचें दान.—५ पं. व्हावा.

॥ अनघडसिद्धाच्या शब्देंकरून रामेश्वरभटाच्या शरीरीं दाह जाला तो ज्यानें शमला तो अभंग ॥१॥

॥ १७५१ ॥

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे[1] न खाती सर्प तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विष तें अमृत आघात[2] तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ध्रु॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ २ ॥
आवडेल जीवां जीवाचिये[3] परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ ४ ॥

॥ १७५२ ॥

लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोजुनि[4] झिजलों मापाचिया परी । जाळावी हे[5] थोरी लाभाविण ॥ ध्रु॥
कोमळ कंटक तीक्षण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥ २ ॥
चित्रींचें लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे दिसें वांयां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥ ४ ॥

॥ १७५३ ॥

बोलविसी माझें मुखें[6] । परी या जना वाटे दुःख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जया जयाची आवडी । तया लागीं तें चरफडी ॥ ध्रु ॥
कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥ २ ॥
खाऊं नये तें चि मागे । निवारितां रडों लागे ॥ ३ ॥

१ पं. ही.–२ दे. अघातें हित –३ दे. जीवाचें.–४ दे. त. मजुनि.–५ पं. ते.–६ पं. मुखें.

वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ॥ ४ ॥
नये भिडा सांगों आन । पथ्य औषधा[1] कारण ॥ ५ ॥
धन माया पुत्र दारा । हे तों[2] आवडी नरका थारा ॥ ६ ॥
तुका ह्मणे यांत । आवडे ते करा मात ॥ ५ ॥

॥ १७५४ ॥

पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ॥ ध्रु ॥
सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ॥ २ ॥
शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण ते प्रसंगीं ॥ ३ ॥
शुद्ध सोनें उजळे अगी । हीन काळें धांवे रंगीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तो चि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥ ५ ॥

॥ १७५५ ॥

चालिती आड वाटा । आणिकां दाविती जे नीटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गंव्हार ॥ ध्रु ॥
विष सेवूनि वारी मागें । प्राण जातां जेणें संगें ॥ २ ॥
बुडतां हाक[3] मारी । ठाव नाहीं आणिकां वारी ॥ ३ ॥
तुका ह्मणे न करीं हिका[4] । गुण घेऊन अवगुण[5] टाका ॥ ४ ॥

॥ १७५६ ॥

कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्याचे घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शुद्ध ज्यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ॥ ध्रु ॥

---

१ दे. पं. औषधाकारण.—२ त. "तों" नाहीं.—३ पं. हाका.—४ दे. हिंका.—
५ त. अगुण.

पंढरीस कोणी जाती वारेकरी[1] । होईन त्यांचे घरीं पशुयाति ॥ २ ॥
विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायतन त्याचे पायीं ॥ ३ ॥
तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होइन केरसुणी त्याचे घरीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे हा चि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ॥५॥

॥ १५५७ ॥

अवघिया चाडा कुंटित करूनि । लावीं आपुली च गोडी ।
आशा मनसा तृष्णा कल्पना । करूनियां देशधडी ।
मीतूंपणापासाव गुंतलों । मिथ्या संकल्प तो माझा तोडीं ।
तुझिये चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करूनि दाखवीं पिंडी रे रे[2] ॥ १ ॥
॥ धृ. ॥ माझें साच काय केलें मृगजळ । वर्णा याती कुळ अभिमान ।
कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्यांचें साचपण ॥ ध्रु ॥
वेगळाल्या भावें चिंत्ता[3] तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें ।
गोत वित्त माय बाप बहिणी सुत । बंधुवर्ग माझीं बाळें ।
एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलिया जवळी काळें ।
जाणोनियां त्याग सर्वस्वें केला । सांभाळीं आपुलें जाळें ॥ २ ॥
एकां जवळी धरी आणिकां अंतरीं । [4]तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं ।
एकांचें पाळण एकांसी भांडण । चाड [5]कवणिये काजीं ।
अधिक असे उणें कवण कवण्या गुणें । हे भाव न कळे चि तुझी ।
ह्मणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती । तुका ह्मणे भाक माझी ॥ ३ ॥

॥ १५५८ ॥

आणिकां छळावया जालासी शाहाणा । स्वहिता घातलें खाणें[6] ।

१ पं. वारकरी.–२ पं. पीडि रे रे.–३ पं चिता.–४ पं. "ती" नाही –५ पं. कवणे ये –
६ पं. खाणें. त. खाण.

आडिके पैके करूनि सायास । कृपणें सांचलें धन ।
न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण ।
तारुण्यदशे अधम मातला । दवडी हात पाय कान ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय जालें यांस वांयां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ॥
घेउनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥ ध्रु. ॥
सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखें फळ ।
सिंपि[1]ला मोतीं जन्मलें स्वाती । वरुषलें सर्वत्र जळ ।
कापुस पट नये चि कारणा । तयास पातला काळ ।
तें चि भुजंगें धरिलें कंठीं । मा[2] विष जालें त्याची गरळ ॥ २ ॥
भक्षूनि मिष्टान्न घृतसाकर । सहित सोलुनि केळें ।
घालुनियां घसां अं[3]गोळिया । वांती करूं पाहे बळें ।
कुंथावयाची आवडी वींवां[4] । उन्हवें[5]णी रडवी बाळें ।
तुका ह्मणे जे जैसें करिती । ते पावती तैसीं च फळें ॥ ३ ॥

॥ १७५९ ॥

चंदनाचे गांवीं स[6]र्पांची वसति । भोगिती[7] ते होती द्वीपांतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला ॥ ध्रु. ॥
क्षीरा[8]ची वसति अशुद्ध सेवावें । जवळी तें जावें भोगें दुरी ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसी बुद्धि ज्याची जड । त्याहुनी दगड बरे देवा ॥ ३ ॥

---

१ पं. सिंपिला तों मोती जन्मलें स्वातीचें । वरुषलें०.—२ दे. माविश. त. माविस.—३ दे. अंगोळिया हाते वांत करूं०.—४ पं. देवीं.—५ पं. उन्हवनी.—६ दे. सर्पांच्या.—७ दे. भोगीत वे होतीं०. त. भोगीते वे होती०.—८ पं. क्षीराच्या.

॥ १७६० ॥

तुज दिलें आतां करीं यत्न याचा । जीवभाववाचाकायामन[1] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भागलों दातारासीण जाला भारी । आतां मज तारीं शरणागता

॥ ध्रु ॥

नेणतां सोसिली तयाची आटणी । नव्हतां ही कोणी कांहीं माझीं ॥ २ ॥

वर्म नेणें दिशा हिंडती मोकट[2] । इंद्रियें सुनाट दाही दिशा ॥ ३ ॥

येरझारीफेरा[3] सिणलों सायासीं । आतां ऱ्हषीकेशी अंगिकारीं ॥ ४ ॥

तुका ह्मणे मन इंद्रियांचे सोई । धांवे यासी काई करूं आतां ॥ ५ ॥

॥ १७६१ ॥

स्वयें[4] पाक करी । संशय तो चि धरी ।

संदेहसागरीं आणीक परी बुडती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जाणे विरळा एक । जालें तेथींचें हें[5] सुख ।

देखिले बहुतेक । पुसतां वाट चुकले ॥ ध्रु ॥

तो चि जाणे सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें ।

नाचती पाल्हाळें । जे विटाळें कोंडिले ॥ २ ॥

तो चि साधी संधी । सावध त्रिकाळ जो बुद्धी ।

संदेहाचा संधी । वेठी आणीक[6] धरियेले ॥ ३ ॥

अखंड तें ध्यान । समबुद्धि समाधान ।

सोंग वांयांविण । ते झांकून बैसती ॥ ४ ॥

करणें जयासाटीं । जो नातुडे कवणे आटी ।

---

१ पं.० मनें—२ पं. मोकाट.—३ पं. वेरझारी पोरा. दे. वेरझारी फेरा.—४ पं. स्वयपाक.— ५ पं. ही.—६ दे. आणि करियेले. पं. आणीक धरियेली.

तुका ह्मणे साटी । चित्तवित्तेंवांचूनि ॥ ५ ॥

॥ १७६२ ॥

माझिया संचिता । दृढ देखोनि बळिवंता ।
पळसी पंढरिनाथा । भेणें आतां तयाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि मज कळलासी । नव्हतां भेटी जाणीवेसी ।
एक संपादिसी । मान करिसी लोकांत ॥ ध्रु ॥
तरि हें प्रारब्ध जी गाढें । कांहीं न चले तयापुढें ।
काय तुज म्यां कोडें । रे[1] सांकडें घालावें ॥ २ ॥
भोगेंधीपति[2] क्रियमाण । तें तुज नांगवे आझून ।
तरि का वांयांविण । तुज म्यां सीण करावा ॥ ३ ॥
तुज नव्हतां माझें कांहीं । परि मी न संडीं भक्तिसोई ।
हो का भलत्या ठायीं । कुळीं जन्म भलतैसा ॥ ४ ॥
तूं भितोसि माझिया दोषा । कांहीं मागणें ते आशा ।
तुका ह्मणे ऐसा । कांहीं न धरीं[3] संकोच ॥ ५ ॥

॥ १७६३ ॥

लोकमान देहसुख । संपत्तिउपभोग[4] अनेक ।
विटंबना दुःख । तुझिये भेटीवांचूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट ।
थोरें[5] पुण्यें वीट । तुज दैवें चि लाधली ॥ ध्रु ॥
काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें । रितें मांवेचें[6] मापाडें ।

---

१ पं. सांकडे रे.–२ पं. भोगाधिपति.–३ पं. धरणें.–४ पं. संपत्तिभोग.–५ पं. थोर पुण्य वीट । तुज दैव चि लाधली. ॥–६ त. मापाचें.

भेटीविण कुडें । तुझिये अवघें मज वाटे ॥ २ ॥
आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उद्धार ।
न देखतां धीर । चतुर्भुज मज नाहीं ॥ ३ ॥
रिद्धिसिद्धी काय करूं । अथवा [1]अगम्य विचारु ।
भेटीविण भारु । तुझिये वाटे मज यांचा ॥ ४ ॥
तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें ।
तुका ह्मणे द्यावें । दरुषण पायांचें ॥ ५ ॥

॥ १७६४ ॥

तुझा ह्मणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि मज कवणाचा आधार । करोनियां राहों धीर ॥ ध्रु ॥
काय [2]शब्दीं चि ऐकिला । भेटी [3]नव्हंतां गा विठला ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । अभय देई पंढरिनाथा ॥ ३ ॥

॥ १७६५ ॥

उद्धवअक्रूरासी । आणीक व्यासआंबऋषी ।
[4]रुक्मांगदप्र[5]ल्हादासी । दाविलें तें दाखवीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि मी पाहेन पाहेन । तुझे श्रीमुखचरण ।
उताविळ मन । तयाकारणें तेथें ॥ ध्रु ॥
जनकश्रुतदेवा करीं । कैसा शोभलासी हरी ।
विदुराच्या घरीं । कण्या धरी कवतुकें ॥ २ ॥
पांडवां अकांतीं । तेथें [6]पांवसी स्मरती ।

---

१ पं. आगम.—२ पं. शब्द.—३ पं. नसतां.—४ दे. रुक्मांगदा.—५ पं. प्रल्हादासी.—६ पं. पावती.

घातलें द्रौपदी । यागीं बिरडें चोळीचें ॥ ३ ॥
करी गोपीचें कवतुक । गाईगोपाळांसी सुख ।
दावीं तें चि मुख । दृष्टी माझ्या आपुलें ॥ ४ ॥
तरि तूं अनाथाचा दाता । मागतियां शरणागतां ।
तुका ह्मणे आतां । कोड पुरवीं हें[2] माझें ॥ ५ ॥

॥ १७६६ ॥

मागता भिकारी जालों तुझे द्वारीं । देई मज हरी कृपादान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचरावें ह्र्दयामाजी ॥ ध्रु. ॥
सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजी एक ॥ २ ॥
[3]तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥ ३ ॥
संबंधीं जन[4]वाद पीडलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां तुझा शरणागत । करावें सनाथ मायबापा ॥ ५ ॥

॥ १७६७ ॥

भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भार्सा ॥ ध्रु. ॥
नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करघाई ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शअंग ॥ ३ ॥

॥ १७६८ ॥

दिनदिन शंका वाटे । आयुष्य नेणवतां गाढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसीं भुललीं बापुडीं । दं[5]भेंविषयांचे सांकडीं ॥ ध्रु. ॥

१ पं. चोळीस.—२ पं. "हें" नाहीं.—३ पं. तापत्रयीं.—४ पं. जनवादी.—५ दे. दंभ०. त. वंद०.

विसरलीं[1] मरण । त्याची नाहीं आठवण ॥ २ ॥
देखत देखत पाहीं । तुका ह्मणे आठव नाहीं ॥ ३ ॥

॥ १७६९ ॥

माझें मज आतां न देखें निरसतां । ह्मणऊन आधार केला ।
संसाराची आस सांडुनि लौकिक । जीव भाव तुज दिला ।
नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा । अर्थ मोहों[2] सांडवला ।
तारीं मारीं करीं भलतें दातारा । होऊन तुझा[3] आतां ठेलों[4] रे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असो माझें कोडें तुज हें सांकडें । मी असेन निवाडें सुखरूप ।
बाळकासी चिंता काय पोटवेथा । जया शिरीं मायबाप ॥ ध्रु ॥
पापपुण्यें श्रुति आटिल्या । शास्त्रांस न लगे चि ठाव ।
विधिनिषेधें गोविलीं पुराणें । वेदांसी तो अहंभाव ।
ओंकाराचें मूळ व्यापिलें माया । तेथें न धरे[5] च भाव ।
ह्मणऊन काबाड सांडिलें उपसतां । धरिलें तुझें चि नांव ॥ २ ॥
तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों । सर्व आशा तुझे पायीं ।
तप तीर्थ दान करवूं कवणा । हातीं अधीन तें मज काई ।
आहिक्यें परत्रें चाड नाहीं सर्वथा । जन्म सदा मज देई[6] ।
मायामोहपाश करीं विष तैसें । तुका ह्मणे माझ्याठायीं ॥ ३ ॥

॥ १७७० ॥

तुझें नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळ ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥ ध्रु ॥
आणिकां रसें मरण गांठीं । येणें तुटी संसारें ॥ २ ॥

---

१ दे. विसरला.—२ पं. मोहें सांडला.—३ पं. आतां तुझा.—४ त. ठेला रे.—५ पं. धरवे.—६ दे. देहीं.—७ पं. "तुझें" नाहीं.—८ पं. संसारा.

तुका ह्मणे आहार जाला । हा विठ्ठला आह्मांसी ॥ ३ ॥

॥ १७७१ ॥

धालों सुखें ढेकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी ॥ १ ॥

॥ धु. ॥ क्रीडा करूं निरंजनीं । न पुरे धणी हरिसवें ॥ ध्रु ॥

अवघे खेळों अवघ्यामधीं । डाई न पडों ऐसी बुद्धि ॥ २ ॥

तुका ह्मणे वांचैवितां आह्मां सत्ता समर्थ ॥ ३ ॥

॥ १७७२ ॥

एकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग ह्मणऊनि ॥ १ ॥

॥ धु. ॥ उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना ॥ ध्रु ॥

दुसरा परी एक ऐसा । न वजे रिसा निकुरें ही ॥ २ ॥

तुका ह्मणे कळत्यां कळे । येरें खेळे खेळ ह्मूण ॥ ३ ॥

॥ १७७३ ॥

बोलविलें जेणें । तो चि याचें गुह्य जाणे ॥ १ ॥

॥ धु. ॥ मी तों काबाडाचा धनी । जेवूं मागावें थिकोनि ॥ ध्रु ॥

मजुराच्या हातें । माप जालें गेलें रितें ॥ २ ॥

जाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥ ३ ॥

मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥ ४ ॥

जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ॥ ५ ॥

त्याच्या साच गाई ह्मैसी । येणें खेळावें मातीशीं ॥ ६ ॥

तुका ह्मणे बोल । माझा बोलतो विठ्ठल ॥ ७ ॥

---

१ त. पं. विठ्ठल –२ दे. त. पं. निराजनी –३ दे. वाचवीत.–४ पं. एकल्यानें नव्हे खे-ळ चांग । धरी॰संग०.– ५ त. कळे त्या कळे ।. पं. कळत्या काळें ।.– ६ पं. येरा खेळे॰. त. येरां खेळ खेळ०.–७ पं. त्याचें.–८ पं. माप केलें जालें रितें.

॥ १७७४ ॥

कां हो तुह्मी माझी वदविली वाणी । नेदा हे[2] निवडूनि पांडुरंगा ॥१॥
॥ ध्रु. ॥ आणीक म्यां कोणां पुसावा विचार । मुळीं[3] संवसार दुराविला ॥ ध्रु ॥
स्वामिसेवा ह्मूण घेतली पदरीं । सांगितलें करीं कारण तें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ॥ ३ ॥

॥ १७७५ ॥

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी[4] हा प्राण जाय त्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं[5] टळों नये ॥ ध्रु ॥
समय सांभाळूनि आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तयापरी ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी ह्मणवावें सेवक । खादलें तें अन्न[6] हक होय ॥ ३ ॥

॥ १७७६ ॥

नये पुसों आज्ञा केली एकसरें । आह्मांसी दुसरें आतां[7] नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्याचे[8] तो बळिवंत सर्व निवारिता । आह्मां काय चिंता करणें लागे ॥ ध्रु ॥
बुद्धीचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ॥ २ ॥
तुका ह्मणे मज होईल वारिता । तरी काय सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥

---

१ पं. माझी तुह्मी.—२ पं. "हे" नाहीं.—३ पं. समुळीं०.—४ पं. तोंवरी.—५ त. निरोपावां-चूनि.०.—६ दे. त. हाक अन्न.—७ पं. नाहीं आतां—८ पं. ज्याचा. दे. ज्याचें.

॥ १७७७ ॥

बळिवंत आह्मी समर्थाचे दास । घातली या कास कळिकाळासी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तेथें मानसाचा[1] कोण आला पाड । उलंघोनि जड गेलों आह्मीं ॥ ध्रु ॥

संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षड्वर्ग ॥ २ ॥

तुका ह्मणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ॥ ३ ॥

॥ १७७८ ॥

एका गावें आह्मीं विठोबाचें नाम । आणिकांपें काम नाहीं आतां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मोडूनियां वाटा सूक्षम[2] सगर । केला राज्यभार चाले ऐसा ॥ ध्रु ॥

लावूनि मृदंग[3] टाळश्रुतिघोष[4] । सेवूं ब्रह्मरस आवडीनें ॥ २ ॥

तुका ह्मणे महापातकी पतित । ऐसियांचें हित हेळामात्रें ॥ ३ ॥

॥ १७७९ ॥

वाचेच्या चापल्यें[5] बहु जालों कुशळ । नाहीं बीजमूळ हाता आलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणोनि पंढरिराया दुखी होतें मन । अंतरींचें कोण जाणे माझें ॥ ध्रु ॥

पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ॥ २ ॥

तुका ह्मणे खूण न[6] कळे चि निरुती । सांपडलों हातीं अहंकाराचे ॥ ३ ॥

॥ १७८० ॥

आतां काढाकाढी करीं बा पंढरिराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा[7] धर्म घ्यावे प्राण हा चि ॥ ध्रु ॥

---

१ पं. माणसाचा.—२ पं. सूक्ष्म.—३ दे. त मृदांग.— ४ पं. श्रुतिटाळघोष.— ५ दे. त. वाचाचापल्ये.—६ पं. न कळे निरुती —७ पं. तिचा तो स्वभाव प्राण घ्यावा.

मनाचा स्वभाव इंद्रियांचे ओढी। पैतनाचे जोडी वरी हांव ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली अंधळ्याची परी। आतां मज हरी वाट दावीं ॥ ३ ॥

॥ १७८१ ॥

सज्जन तो शब्द सत्य जो मानी। छळी दुर्जन आणिकांसी ॥ १॥
॥ ध्रु. ॥ एक गुण तो केलाँ दोंटार्यी। ज्याचा त्यास पाँहीं जैसा तैसा ॥ ध्रु ॥
भाँविक शब्द बोले वाणीचा। लटिका वाचा वाचाळ तो ॥ २ ॥
परउपकार घँडे तो भला। नाठयाळ तया दया नाहीं ॥ ३ ॥
जाणीवंत तोँ पायरी जाणे। अधम तो नेणे खुंट जैसा ॥ ४ ॥
हित तें अनहित केलें कैसें। तुका ह्मणे पिसें लागलें यासँ ॥ ५ ॥

॥ १७८२ ॥

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी। जिव्हा ते चि घडी झडो माझी ॥१॥
॥ ध्रु. ॥ हें मज देईं हें मज देईं। आणिक दुजें कांहीं न मगें तुज ॥ध्रु॥
बहिर कान तुझी कीर्ती नाइकतां। पाय न देखतां जात डोळे ॥ २ ॥
मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ। धिग तें चांडाळ जळो जळो ॥ ३ ॥
हातपाय तेणें पंथें न चॅलतां। जांवे ते अनंता गळोनियां ॥ ४ ॥
तुजविण जिणें नाहीं मज चाड। तुका ह्मणे गोड नाम तुझें ॥ ५ ॥

॥ १७८३ ॥

म्हणसी होऊनी निश्चिंता। हरूनियां अवघी चिंता।

---

१ पं. इंद्रियाची.–२ पं. पतनाची –३ पं. केलासे दोटायीं.–४ पं पाहिंजे.–५ पं. भाविक तो शब्द.–६ पं. पडे तो चि भला.–७ पं. तो चि पायरी०.–८ पं. त्या.–९ त. पं. चालतां.–१० त. जावो तें. पं. जावो ते.–११ पं. निश्चिता.

मग जाऊं एकांता । भजन करूं ।
संसारसंभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवा साटी होईल तुझ्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सेकीं नाडसील नाडसील ॥ विषयसंगें अवघा नाडसील ।
मागुता पडसील भवडोहीं ॥ ध्रु० ॥
शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कधीं[1] अराणूक ।
करिती तडातोडी अंत बाह्यात्कारीं[2] । ऐसे जाती चारी दिवस वेगीं ॥२॥
मोलाची घडी जाते वांयांविण । न मिळे मोल धन देतां कोडी ।
जागा होई करीं हिताचा उपाय । तुका ह्मणे हाय करिसी मग ॥ ३ ॥

॥ १७८४ ॥

कनवाळू कृपाळू भक्तांलागीं मोही ।
गजेंद्राचा धांवा तुवां केला विठाई[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंगे ये[4] वो पांडुरंगे ।
जीवाचे जिवलगे ये[4] वो पांडुरंगे ॥ ध्रु० ॥
भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले ।
आंबऋषीकारणें जन्म दाहा घेतले ॥ २ ॥
प्रल्हादाकारणें[5] स्तंभीं अवतार केला ।
विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ॥ ३ ॥
उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं ।
पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥ ४ ॥
कौरवीं[6] पांचाळी सभेमाजी आणिली ।

---

१ त. पं. कदा.—२ पं. अंतर्बाह्यात्कारीं.—३ पं. विठाबाई.—४ पं. येई वो. हे. येबो ('येईवो' याबद्दल आहे ह्मणून).—५ पं. प्रल्हादाकारणें.—६ त. कौरवें.

वस्त्रहरणीं[1] वस्त्रें कैसी जाली माउली ॥ ५ ॥
दुर्वास पातला धर्मा[2] छळावया वनीं ।
धांवसी लवलाहीं शाखादेठ[3] घेऊनि ॥ ६ ॥
कृपाळू माउली भुक्तिमुक्तिभांडार ।
करीं माझा अंगीकार तुका ह्मणे विठ्ठले[4] ॥ ७ ॥

॥ १७८५ ॥

कवणा पाषाणासी धरूनि भाव । कवणावरी पाव ठेवूं आतां ।
ह्मणऊनि निश्चित राहिलों मनीं । तूं चि सर्वां खाणीं देखोनियां ॥१॥
॥ ध्रु. ॥ कवणाचें कारण न लगे चि कांहीं । सर्वां[5] सर्वां ठायीं तूं मज एक ।
कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं । आतां उरलें काइ न दिसे देवा ॥ध्रु॥
जळें जळ काय धोविलें[6] एक । कवण ते पातक हरलें तेथें ।
पापपुण्य हे[7] वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ॥ २ ॥
पितरस्वरूपी तूं चि जनार्दन । सव्य तें कवण अपसव्य ।
तुका ह्मणे जीत पिंड तुह्मां हातीं । देऊनि निश्चिंती मानियेली ॥ ३ ॥

॥ १७८६ ॥

सिणलों दातारा करितां वेरझारा । आतां सोडवीं संसारापासोनियां ॥१॥
॥ ध्रु. ॥ न सुटे चि बाकी नव्हे झाडापाडा । घातलोंसें खोडा हाडां-
चिया ॥ ध्रु ॥
मायबापें[8] माझीं जीवाचीं सांगातीं । तीं[9] देतील हातीं काळाचिया ॥२॥
पडताळूनि सुरी बैसली सेजारीं । यमफासा करीं घेऊनियां ॥ ३ ॥

---

१ त. पं. वस्त्राहरणीं.—२ पं. धर्म.—३ पं. शाखापत्र.—४ पं. विठ्ठल.—५ दे. त. सर्वांठायीं तूं एक.—६ पं. धोवियेलें.—७ त. हें.—८ पं. मायबाप.—९ पं. ते.

पाठी पोटीं एकें लागलीं सरसीं । नेती नरकापाशीं ओढूनियां ॥ ४ ॥
जन साह्यभूत असे या सकळां । मी एक निराळा परदेशी ॥ ५ ॥
कोणां काकुलती नाहीं कोणे परी । तुजविण हरी कृपाळुवा ॥ ६ ॥
तुका ह्मणे मज तुझाची भरवसा । ह्मणऊनि आशा मोकलिली ॥ ७ ॥

॥ १७८७ ॥

देवाचा भक्त तो देवासी गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ।
कवणाचा सोइरा नव्हे च सांगाती । अवघियां हातीं अंतरला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निष्काम वेडें ह्मणती बापुडें । अवघियां सांकडें जाला कैसा ।
माझें ऐसें तया न ह्मणती कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ॥ ध्रु ॥
प्रातःस्नान करी विभूतिचर्चन । देखोनियां जन निंदा करी ।
कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । ह्मणती या चांडाळा काय जालें ॥ २ ॥
गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आई बाप भाऊ ।
घरीं बाइल ह्मणे कोठें व्याली रांड । बरें होतें षंढ मरता तरी ॥ ३ ॥
जन्मोनि जाला अवघियां वेगळा । ह्मणोनि गोपाळा दुर्लभ तो ।
तुका ह्मणे जो संसारा रुसला । तेणें चि टाकिला सिद्धपंथ ॥ ४ ॥

॥ १७८८ ॥

कस्तुरी भिनली जये मृत्तिके । तयेसी आणिके कैसी सरी ॥ १ ॥
लोखंडाचे अंगीं लागला परिस । तया आणिकास कैसी सरी ॥ २ ॥
तुका ह्मणे मी न वर्जं यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवांसी ॥ ३ ॥

१ दे. त. सोहेभूत.— २ त. देवभक्त.—३ पं. देवासी च.—४ दे. ह्मणतील.—५ पं. अवघी.—६ दे. त. ह्मणत.—७ दे. त. रांड. पं. षंड.—८ पं. जन्मोनियां.—९ पं. जो या संसारा.

॥ १७८९ ॥

अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं । राम नाहीं तोंडीं कैसा तरे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकळां जीवांमाजी देव आहे खरा । देखिल्या दुसरा विण न तरे ॥ ध्रु ॥
ज्ञान सकळांमाजी आहे हें साच । भक्तीविण तें च ब्रह्म नव्हे ॥ २ ॥
काय मुद्रा कळल्या कराव्या सांगतां । दीप न लगतां उन्मनीचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नका पिंडाचें पाळण । स्छापूं नारायण आतुडेना ॥ ३ ॥

॥ १७९० ॥

नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनविर्तो कोपाल संत ह्मणी ॥१॥
॥ ध्रु.॥ नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगेसंगें व्यापूनियां ॥ध्रु॥
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥ २ ॥
राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारि । बोंबड्या उत्तरीं हें चि ध्यान ॥ ३ ॥
तुका ह्मणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥ ४ ॥

॥ १७९१ ॥

देवासी लागे सकळांसी पोसावें । आह्मां न लगे खावें काय चिंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवा विचारावें लागे पापपुण्य । आह्मासी हें जन अवघें भलें ॥ध्रु॥
देवासी उत्पत्ति लागला संहार । आह्मां नाहीं फार थोडें कांहीं ॥ २ ॥
देवासी काम लागला धंदा । आह्मासी ते सदा रिकामीक ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ॥ ४ ॥

---

१ पं. लागतां.—२ त. पं. अगसंग.—३ दे. त. बोबडा.—४ पं. सकळां.—५ पं. आह्मां काय खावें न लगे चिंता.—६ पं. देवासी —७ पं. लागला हा धंदा.

॥ १७९२ ॥

घेईन मी जन्म याजसाटीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ध्रु॥
आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःखें[1] नाहीं चाड आह्मां ॥ २ ॥
आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥३॥
मोक्ष आह्मां घरीं कामारी तें दासी । होय सांगों तैसी तुका ह्मणे ॥४॥

॥ १७९३ ॥

देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी साच मी पतित । तूं च खोटा दिनानाथ ।
ग्वाही साधुसंत[2] जन । करूनि अंगीं लावीन ॥ ध्रु ॥
आह्मी धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ॥ २ ॥
न चले तुझें कांहीं त्यास । आह्मी बळकाविले दोष ॥ ३ ॥
दिशा भरल्या माझ्या मनें । लपालासी त्याच्या भेणें ॥ ४ ॥
तुका ह्मणे चित्त । करी तुझी माझी नीत ॥ ५ ॥

॥ १७९४ ॥

लापनिकशब्दें[3] नातुडे हा देव । मनिंचे[4] गुह्य भाव शुद्ध बोला ॥ १ ॥
अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जैयासी[5] संवाद करणें लागे ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी आपुलें स्वहितें । तरी करीं चित्त शुद्धभावें ॥ ३ ॥

॥ १७९५ ॥

नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां[6] सिद्ध । जंव हा[7] आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ १ ॥

---

१. दे. पं. सुखदुःख.—२ दे. त. साधुसंत.—३ पं. त. लापणीक०.—४ पं. मनिचा.—५ पं. वपासी.—६ त. पं. बोलतां हें सिद्ध.—७ त. पं. "हा" नाहीं.

॥ ध्रु. ॥ काय करिसी वांयां लटिका चि पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ ध्रु ॥

मी च देव ऐसें[1] सांगसी[2] या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनियां ॥२॥

अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनियां ॥ ३ ॥

तुका ह्मणे जरि राहील तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदित ॥ ४ ॥

॥१७९६ ॥

गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ॥ १ ॥

॥ ध्रु.॥ रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिकां तिमिरां ना[3]श तेणें ॥ ध्रु ॥

कर्पूरकांडणी काय कोंडा कणी । सिंधू मिळवणी काय चाले ॥ २ ॥

परिस चिंतामणि आणिकांचा गुणी । पालटे लागोनि नव्हे तैसा ॥ ३ ॥

तुका ह्मणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥ ४ ॥

॥ १७९७ ॥

परिस[4] काय धातु परिस काय धातु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ॥ १ ॥

[5]काय तयाहूनि जालासी बापुडें । फेडितां सांकडें माझें एक ॥ ध्रु ॥

कल्पतरू कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥ २ ॥

चंदनांच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाती ॥ ३ ॥

काय त्याचें उणें जालें त्यासी देतां । विचारीं अनंता तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १७९८ ॥

तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती । बाभळा राखती करूनि सार ॥ १ ॥

---

१ पं. ऐसा.–२ त. सांगसील.–३ दे. नासे –४ दे. "परिस काय धातु" इतकें एकदांच आहे. पं. परिस काय धातु सोनें करितु ॥ फेडी निभ्रांतु०.–५ पं. काय वे तयाहूनि.

॥ ध्रु. ॥ कोण हित[1] तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ॥ ध्रु ॥

धान्यें[2] बीजें जेणें जाळिलीं सकळें । पेरितो काळें जिरें बीज ॥ २ ॥

मोडोनियां वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ॥ ३ ॥

विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रह्महत्या ॥ ४ ॥

तुका ह्मणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ॥ ५ ॥

॥ १७९९ ॥

संसाराच्या भेगें । पळों न लाहेसें कलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जेथें तेथें आपण आहे । आह्मीं करावें तें काये ॥ ध्रु ॥

ऐकांतीसी[3] ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ॥ २ ॥

गांवा जातों ऐसें । न लगे ह्मणावें तें कैसें ॥ ३ ॥

स्वप्नाचे परी । जागा पाहे तंव घरीं ॥ ४ ॥

तुका ह्मणे काये । तुझें घेतलें म्यां आहे ॥ ५ ॥

॥ १८०० ॥

आण[4] काय सादर । विशीं आह्मां कां निष्ठुर ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ केलें भक्त तैसें देई । तुझें प्रेम माझ्याठायीं ॥ ध्रु ॥

काय पंगतीस कोंडा । एकांतासी साकरमांडा ॥ २ ॥

काय एकपण । पोतां घालूनि गांठी खूण ॥ ३ ॥

काय द्यावें ऐसें[6] । तया आपण अनारिसें ॥ ४ ॥

तुका ह्मणे मधीं[7] । आतां तोडूं भेद बुद्धी ॥ ५ ॥

---

१ त. हित.—२ पं. धान्यबीज जेणें जाळिलें सकळ. । पेरितो कारळे जिरें०. त. पेरि-तो वें काळें.—३ पं. एकांतासी.—४ पं. आपण.—५ पं. धन.—६ पं. वैसें.—७ पं. संधी.

॥ १८०१ ॥

चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि जालों उतराई ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ परि तूं खोटा केशीराजा । अंतपार न कळे तुझा ॥ ध्रु ॥

आह्मी सर्वस्वें उदार । तुज देऊनियां[1] धीर ॥ २ ॥

इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ॥ ३ ॥

न पडे विसर । तुझा आह्मां निरंतर ॥ ४ ॥

प्रेम एकासाटीं । तुका ह्मणे न वेचे[2] गांठी ॥ ५ ॥

॥ १८०२ ॥

आह्मी पतित ह्मणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं ॥

नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुज चित्तीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मां न तारावें तुह्मी काय करावें । सांगिजोजी[3] भावें नारायणा ॥ ध्रु ॥

अन्याय एकाचा अंगीकार करणें । तया हातीं देणें लाज ते चि ।

काय तें शूरत्व मिरवूनि बोलणें । जनामाजी दावणें बळरया ॥ २ ॥

पोह्या अन्नछत्र[4] घालूनियां घरीं । दंडितो बाहेरी आलियासी ।

नव्हे कीर्त[5] कांहीं न माने[6] लोकां । काय विटंबणा तैसी[7] ॥ ३ ॥

प्रत्यक्षासी काय द्यावें हें प्रमाण[8] । पाहातां दर्पण साक्ष काई ।

तुका ह्मणे तरी आह्मां कां न कळे । तरलों[9] किंवा आह्मी नाहीं ॥ ४ ॥

॥ १८०३ ॥

काग बग रिठा मारिले बाळपणीं । अवघी दैत्यखाणी बुडविली ॥ १ ॥

---

१ पं. देऊनि वेव्हार.—२ पं. वजे.—३ सांगिजे जी.—४ पं. ०अन्नसत्र० दंडी जो बाहेरी०.—५ पं. कीर्ति.—६ पं. माने चि लोकां.—७ पं. तैसी तैसी.—८ त. द्यावें तें प्रमाण. पं. द्यावें गा प्रमाण.—९ पं. तरलों अथवा किंवा आह्मी नाहीं.

॥ ध्रु. ॥ तो मज दावा तो मज दावा । नंदानंदन जीवा [1]आवडे तो ॥ ध्रु.॥
गोवर्धन गिरी उचलिला करीं । [2]गोकुळ भीतरी राखियेलें ॥ २ ॥
वधुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ॥ ३ ॥
पांडव जोहरीं राखिले कुसरीं । विवराभीतरीं चालविले ॥ ४ ॥
तुका ह्मणे हा भक्तांचा कृपाळ । दुष्टजना काळ नारायण ॥ ५ ॥

॥ १८०४ ॥

तुजविण देवा । कोणा ह्मणे माझी जिव्हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि हे हो कां शतखंड । पडो झडोनियां रांड ॥ ध्रु. ॥
कांहीं इच्छेसाटीं । [3]करिल वळवळ करंटी ॥ २ ॥
तुका ह्मणे कर । कटीं तयाचा विसर ॥ ३ ॥

॥ १८०५ ॥

आह्मां [4]सर्वभावें हें चि काम । न विसंभावें तुझें नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां ॥ ध्रु. ॥
आसनीं [5]भोजनीं शयनीं । दुजें नाहीं ध्यानीं मनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ॥ ३ ॥

॥ १८०६ ॥

नव्हे कांहीं कवणाचा । भाव जाणवला साचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि तुझ्या पायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ ध्रु. ॥
शरीर जायाचें कोंपट । याची काय खटपट ॥ २ ॥
तुका ह्मणे वांयांविण । देवा कळों आला सीण ॥ ३ ॥

---

१ त. पं. आवडको.—२ त. गोकुळा.—३ त. करी.—४ पं. "सर्वभावें" याबद्दल "सर्व".—
५ पं. "भोजनीं" नाहीं

॥ १८०७ ॥

रज्जु धरूनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं ।
कळों येतां चित्तों । दोरी दोघां सारिखी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांआह्मांमध्यें हरी । जाली होती तैसी[1] परी ।
मृगजळाच्या पुरीं । ठाव पाहों तरावया ॥ ध्रु ॥
सरी चिंताक[2] भोंवरी । अळंकाराचिया परी ।
नामें जालीं दुरी । एक सोनें आटितां ॥ २ ॥
पिसांचीं पारवीं । करोनि बाजागिरी दावी ।
तुका ह्मणे तेवीं । मज नको चाळवूं ॥ ३ ॥

॥ १८०८ ॥

नेघें तुझें नाम । न करीं सांगितलें काम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांढे[3] वचनें वचन । दोष उच्चारितां गुण ॥ ध्रु ॥
आतां तुझ्या घरा । कोण करी येरझारा ॥ २ ॥
तुका ह्मणे ठायीं । मजपाशीं काय नाहीं ॥ ३ ॥

॥ १८०९ ॥

व्यवहार तो खोटा । आतां न वजों तुझ्या वाटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका नामा नाहीं ताळें[4] । केली सहस्रांची माळें[5] ॥ ध्रु ॥
पाहों जातां घाई । खेळसी[6] लंपडाई ॥ २ ॥
तुका ह्मणे चार । बहु करितोसी फार ॥ ३ ॥

---

१ त. ऐसी.—२ त. चितांक.—३ पं. वाटे.—४ पं. ताळा.—५ पं. माळा.—६ पं. खेळसील त. "खेळसी तूं."

॥ १८१० ॥

लटिका चि केला । सोंग पसारा दाविला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा बुडालासी ऋणें । बहुतांचें देणें[1] घेणें ॥ ध्रु ॥
लोंवियेलीं चाळा । बहु दावूनि .पुतळा ॥ २ ॥
तुका ह्मणे हात । आली अवरिली मात ॥ ३ ॥

॥ १८११ ॥

दाखवूनि आस । केला बहुतांचा नास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ थोंटा झोडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ॥ ध्रु ॥
सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ॥ २ ॥
तुका ह्मणे काय । तुझें घ्यावें उरे हाय ॥ ३ ॥

॥ १८१२ ॥

लाज ना विचार । बाजारी तूं[3] भांडखोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें ज्याणें व्हावें । त्याची गांठी तुजसवें ॥ ध्रु ॥
फेडिसी[4] लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ॥ २ ॥
तुका ह्मणे चोरा । तुला आप ना दुसरा ॥ ३ ॥

॥ १८१३ ॥

ठाव नाहीं बुड । घरें वसेविसी[5] कुड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भलते ठायीं तुझा वास । सदा एरवी उदास ॥ ध्रु ॥
जागा नां[6] निजेला । धाला ना भुकेला ॥ २ ॥
न पुसतां भलें । तुका ह्मणे बुझें बोलें ॥ ३ ॥

---

१ प घेणे देणें.—२ पं. "लावियेलीं" येथपासून तों पुढील अभंगांत "भेटलासी नागवणी" येथपर्यंत ग्रंथ मुळींच नाहीं.—३ पं. तो.—४ पं. फेडी.—५ पं. बसविली.—६ पं. [illegible].

॥ १८१४ ॥

श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ॥ ध्रु ॥
जेवितां जवळी । येऊनियां पुच्छ घोळी ॥ २ ॥
[2]कोपेल तो धनी । तुका ह्मणे नेणें मनीं ॥ ३ ॥

॥ १८१५ ॥

वटवट केली । न विचारितां मना आली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ॥ ध्रु ॥
उचित न कळे । जिव्हा भलतें चि वरळे ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ॥ ३ ॥

॥ १८१६ ॥

जीवें व्हावें साटी । पडे संवसारें तुटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशीं बोलिलों वचनें । सर्वें घेउनि नारायण ॥ ध्रु ॥[3]
नाहीं जन्मा आलों । करील ऐसें नेदीं बोलों ॥ २ ॥
ठाव पुसी सेणें[4] । तुका ह्मणे खुंटी येणें ॥ ३ ॥

॥ १८१७ ॥

आतां पंढरीराया । माझ्या निरसावें भया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ॥ ध्रु ॥
ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥ २ ॥
तुका ह्मणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें ॥ ३ ॥

१.—दे. त. पुंस.—२ पं. तुका ह्मणे धणी । कोपले हें मना नाणी ।.—३ पं. "येणें नाहीं जाणें । केलें कोणा न मागणें ॥" हें कडवें जास्त आहे.—४ पं. येणें.—५ त. पं. स्वामी भयाची

॥ १८१८ ॥

कवतुकवाणें । बोलों बोबड्या वचनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें तों नसावें अंतरीं । आह्मां धरायाचें दुरी ॥ ध्रु ॥
स्तुति तैसी निंदा । माना सेम[2] चि गोविंदा ॥ २ ॥
तुका ह्मणे बोलें । मज तुह्मी शिकविलें ॥ ३ ॥

॥ १८१९ ॥

असो मागें जालें । पुढें गोड तें चांगलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ॥ ध्रु ॥
नेदीं अवसान । करितां[3] नामाचें चिंतन ॥ २ ॥
तुका ह्मणे बोलें । तुज आधीं च गोविलें ॥ ३ ॥

॥ १८२० ॥

मातेविण बाळा । आणीक न माने सोहळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें जालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ॥ ध्रु ॥
वाट पाहे मेघा बिंदु । नेघे चातक सरिता सिंधू ॥ २ ॥
सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥ ३ ॥
जीवनाविण[4] मत्स्य । जैसें धेनूलागीं वत्स ॥ ४ ॥
पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्त्तमानें ॥ ५ ॥
कृपणाचें धन । लोभालागीं जैसें मन ॥ ६ ॥
तुका ह्मणे काय । तुजविण प्राण राहे ॥ ७ ॥

---

१ पं. आतां.—२ पं. "सम चि" याबद्दल "समान".—३ पं. करीं.—४ पं. जीवनालागीं.

॥ १८२१ ॥

तुजऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । न मागतां त्यांस अढळ देसी॥
॥ ध्रु ॥
बांवसी आडणी ऐकोनियां धांवा । कइवारें देवा भक्तांचिया ॥ २ ॥
दोष त्यांचे जाळी कल्पकोटिवरी । नामासाटीं हरि आपुलिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ॥ ४ ॥

॥ १८२२ ॥

काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजी आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जनन हें माझें करूनि संचित । दिलें अवचित आणूनियां ।
॥ ध्रु ॥
बहुव्या दोषांचे न घली च भरी । आली यास थोरी कृपा देवा ॥ २ ॥
नव्हतें ठाउकें आइकिलें नाहीं । न मगतां पाहीं दान दिलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे याच्या उपकारासाटीं । नाहीं माझे गांठी कांहीं एक ॥ ४ ॥

॥ १८२३ ॥

बाळूनियां जन सांडी मज दुरी । करिसील हरी ऐसें कधीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाहीं डोळां ॥
॥ ध्रु ॥
नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसी धरितों वासना । होईं नारायणा साह्य मज ॥ ३ ॥

---

१ पं. धांवसील.--२ पं. दोषांची.--३ पं. मागतां.

॥ १८२४ ॥

सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरी टेंके चांडाळ हें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि पाहे तरतें बुडतें । न लोहे पुरतें बळ करूं ॥ ध्रु ॥
काय तें संचित न कळे पाहातां । मतिमंदचिंता उपजतें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें बळ नाहीं अंगीं । पाहोनियां वेगीं पार टाकीं ॥ ३ ॥

॥ १८२५ ॥

आतां नको चुकों आपुल्या उचिता । उदारा या कांता रखुमाईच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आचरावे दोष हें आह्मां विहित । तारावे पतित तुमचें तें ॥ ध्रु ॥
आह्मी तों आपुलें केलेंसें जतन । घडो तुह्मांकून घडेल तें ॥ २ ॥
तुका ह्मणे विठो चतुराच्या राया। आहे तें कासया मोडों देसी ॥ ३ ॥

॥ १८२६ ॥

मुखें बोलावें तें जीविंचें जाणसी । विदित पायांपाशीं सर्व आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हें चि भलें भाकावी करुणा। विनियोग तो जाणां तुह्मी त्याचा ॥ ध्रु ॥
आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं । साधनाच्या वांहीं पडों नये ॥ २ ॥
तुका ह्मणे देह दिला पिंडदान । वेळोवेळां कोण चिंता करी ॥ ३ ॥

॥ १८२७ ॥

कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नवल हे लीळा करित्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ॥ ध्रु ॥

---

१ पं. तें.—२ दे. त. व्हावे.—३ पं. चिंता.—४ पं. तुह्मांकडून .—५ पं. याचा.—६ दे. त. साधनाचा.—७ पं. तृणवत्.—८ दे. करात्याचें. पं. करत्याचें.

लोभालोभ एका धनाचिये ठायीं। आणिकांची सोई चाड नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भूक न विचारी प्रकार । योजे [1]तें चि सार यथाकाळें ॥ ३ ॥

॥ १८२८ ॥

बांधे सोडी हें तों धन्याचिये हातीं । हेंकडें गोविती आपणां बळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ॥ ध्रु ॥
घरांत रिघावें दाराचिये सोई । भिंतीसवें डोई घेऊनि फोडी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यांसी ॥ ३ ॥

॥ १८२९ ॥

कवण जन्मता कवण जन्मविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कवण हा दाता कवण हा मागता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ ध्रु ॥
[2]कवण भोगिता कवण भोगविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ २ ॥
कवण तें रूप कवण अरूपता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ ३ ॥
सर्वां ठायीं तूं चि सर्व हीं जालासी । तुका ह्मणे यासी दुजें नव्हे ॥ ४ ॥

॥ १८३० ॥

जेथें देखें तेथें तुझीं च पाउलें । विश्व अवघें कोंदाटलें ।
रूप गुण नाम अवघा मेघश्याम । वेगळें तें काय उरलें ।
[3]जातां लोटांगणीं अवघी च मेदिनी । सकळ देव पाट जालें ।
सदा पर्वकाळ सुदिन सुवेळ । चित्त प्रेमें असे धालें ॥ १ ॥

१ पं. "तें चि" याबद्दल "तें तें".—२ पं. कवण भोगविता कवण भोगता ।—३ पं. जावों.

॥ ध्रु. ॥ अवघा आह्मां तूं च जालासी देवा । संसार हेवा कामधंदा ।
न लगे जाणें कोठें कांहीं च करणें । मुखीं नाम ध्यान सदा ॥ ध्रु ॥
वाचा बोले ते तुझे चि गुणवाद । मंत्रजप कथा स्तुति ।
भोजन सारूं ठायीं फल तांबोल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ।
चालतां प्रदक्षिण[1] निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रति ।
देखोन दृष्टी परस्परें गोष्टी । अवघ्या तुझ्या मूर्ति ॥ २ ॥
जाल्या तीर्थरूप बावी नदी कूप । अवघें गंगाजळ जालें ।
महाल मंदिरें माड्या तनघरें । झोपड्या अवघीं देव देवाइलें ।
ऐकें कानीं त्या हरिनामध्वनी । नाना शब्द होतें[2] जाले ।
तुका ह्मणे[3] या विठोबाचे दास । सदा प्रेमसुखें धालें[4] ॥ ३ ॥

॥ १८३१ ॥

जे दोष घडले न फिटे करितां कांहीं । सरते तुझ्या पायीं जाले तैसे ।
॥ध्रु.॥ माझा कां हो करूं नये अंगीकार ।जालेती निष्ठुर पांडुरंगा ॥ध्रु॥
यातिहीन नये ऐकों ज्यां वेद । तयां दिलें पद वैकुंठींचें ॥ २ ॥
तुका ह्मणे कां रे एकांचा आभार । घेसी माथां भार वाहोनियां ॥ ३ ॥

॥ १८३२ ॥

हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे ॥ ध्रु ॥
निर्लज्ज भोजें नाचत[5] रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे विकलें देवें । आपण भावें सर्वसाटी[6] ॥ ३ ॥

---

१ दे. पं. प्रदक्षणा.–२ पं. होते.–३ पं. ह्मणे आह्मी या०.–४ पं. धालों.–५ पं. नाचे.
–६ पं. समसाटीं.

॥ १८३३ ॥

साधन संपत्ति हें चि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळी च नीट सुखरूप ॥ ध्रु॥
वैष्णवांचा संग रामनाम गाणें[1] । मंडित भूषणें[2] अळंकार ॥ २ ॥
भवनदी आड नव्हतीसी जाली । कोरडी[3] च चाली जावें पायीं ॥ ३ ॥
मायबाप[4] दोघें पाहातील वाट । ठेवूनियां कटीं कर उभीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ॥ ५ ॥

॥ १८३४ ॥

यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ।
वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणीं धांडोळितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां मज क्षमा करावें[5] देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥ ध्रु॥
सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदां श्रुतीं ।
तों[6] आम्ही भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥ २ ॥
सहस्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रह्मां ठेला ।
तेथें माझी देहबुद्धि तें काई । थोर मी अन्यायी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १८३५ ॥

कृष्ण[7] गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । ते ही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । ह्मणारे भोगिता[8] नारायण ॥ ध्रु॥
ओंवियें दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥ २ ॥
नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें ऐका[9] प्रीती नारायणा ॥ ३ ॥

---

१ दे. रामगाणें।.—२ दे. भूषण.—३ पं. कोरडे.—४ पं. मायबापें.—५ पं. करावें तें देवा । सलगी केशवा०.—६ पं. केलासी लहान तो तूं आह्मा भावें.—७ पं. कृष्णध्यातां चित्तीं कृष्ण गातां गीतीं ।—८ पं. भोक्ता.—९ त. एका प्रति.

तुका ह्मणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥ ४ ॥

॥ १८३६ ॥

डोळियां पाझर[1] कंठ माझा दाटे । येऊं देईं भेटे[2] पांडुरंगे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बहु दिस टाकिलें निरास कां केलें । कोठें वो गुंतलें चित्त तुझें ॥ ध्रु ॥

बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ॥ २ ॥

पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ॥ ३ ॥

तुजविण कोण सांवा धांवा करी । ये वो झडकरी पांडुरंगे[3] ॥ ४ ॥

काय तुझी वाट पाहों कोठवरी । कृपाळु[4] कांपरी विसरलासी ॥ ५ ॥

एक वेळ[5] माझा धरूनि आठव । तुका ह्मणे ये वो न्यावयासी ॥ ६ ॥

॥ १८३७ ॥

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय करूं या मना आतां । कां विसरतें[6] पंढरिनाथा । करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥ ध्रु ॥

भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥ २ ॥

बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥ ३ ॥

किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ[7] ॥ ४ ॥

मज राखें आतां । तुका ह्मणे पंढरिनाथा ॥ ५ ॥

॥ १८३८ ॥

कंथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ॥ १ ॥

---

१ पं. दाटी.—२ पं. भेटी.—३ पं. पांडुरंगा.—४ पं. कृपाळुवा हरी विसरलासी. त. कृपाळुवा परी.०—५ पं. वेळे.—६ दे. त. विसरातें.—७, दे. वेळे.

॥ ध्रु. ॥ करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ॥ ध्रु ॥

देऊळ नव्हे घर । प्रपंच परउपकार ॥ २ ॥

विधिसेवन काम । नव्हे शब्द रामराम ॥ ३ ॥

हत्या क्षत्रेधर्म[1] । नव्हे निष्काम तें कर्म ॥ ४ ॥

तुका ह्मणे संतीं । करूनि ठेविली आइती ॥ ५ ॥

॥ १८३९ ॥

पडोनियां राहीं । उगा च संतांचिये पायीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ न लगे पुसणें[2] सांगावें । चित्त शुद्ध करीं भावें ॥ ध्रु ॥

सहज तें स्थिति । उपदेश परयुक्ति[3] ॥ २ ॥

तुका ह्मणे भाव । जवळी धरूनि आणी देव ॥ ३ ॥

॥ १८४० ॥

देवाचे घरीं देवें केली चोरी । देवें देव नागवूनि केला भिकारी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ धांवणियां धांवा धावंणियां धांवा । माग चि नाहीं जावें कवणिया गांवा ॥ ध्रु ॥

सवें चि होता चोर घरिंचिया घरीं । फावलियावरी केलें अवघें वाटोळें ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें कोणी च नाहीं । नागवलें कोण गेलें कोणाचें काई ॥ ३ ॥

॥ १८४१ ॥

अवघे[4] चि निजों नका अवघिये ठायीं ।
वेळ अवेळ तरी सांभाळावी कांहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जतन करा रे जतन करा ।
घालूं पाहे घरावरी घाला चोरटें ॥ ध्रु ॥

---

१ त. क्षेत्रधर्म.—२ त. पुसावें.—३ दे. परवृत्ति.—४ पं. "अवघे० कांहीं" ह्या दोन ओळी "जतन० चोरटें" ह्या दोन ओळींच्या पुढें आहेत.

सीतरिलीं[1] फार खाती भोंवताले फेरे ।
गेलें नये हातां सेकीं[2] तळमळ उरे ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी करूं आपलें जतन ।
न लगे कांहीं कोणां द्यावें उघडा रे कान ॥ ३ ॥

॥ १८४२ ॥

काळोखी खाऊन कैवाड केला धीर ।
आपुलिया हितें जाले[3] जनामध्यें शूर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे तुह्मी नेणां कां रे तुह्मी नेणां ।
अल्पसुखासाटीं पडशी विपत्तीचे घाणां ॥ ध्रु ॥
नाहीं ऐसी लाज काय तयांपें आगळें ।
काय नव्हे केलें आपुलिया बळें ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी सुख अवघें चि बरें ।
जतन करून हीं[4] आपुलालीं ढोरें ॥ ३ ॥

॥ १८४३ ॥

जाय परतें काय आणिला कांटाळा । बोला एक वेळा ऐसें तरी ॥१॥
॥ ध्रु. ॥ कां हो केलें[5] तुह्मी निष्ठुर देवा । मानेना हे सेवा करितां ते ॥ ध्रु ॥
भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी। तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ॥ २॥[6]
तुका ह्मणे तुह्मापासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥ ३ ॥

---

१ पं. सींतरीलीं० भोंवताली.–२ पं. सेखी.–३ पं. जालों.–४ दे. हें आपुलालीं०. पं. हे आपुलीं०.–५ पं. कां हो तुह्मीं केली निष्ठुरता देवा. त. कां हो केलें तुह्मी निष्ठुर हे देवा.–६ पं. "तुज ऐसा स्वामी असोनि मस्तकीं । होतसे या चुकी संचिताची ॥" हें कडवें जास्त आहे.

॥ १८४४ ॥

अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुह्मांवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥ ध्रु ॥
अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । ह्मणोनि अंतर तुझ्या पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे काय करूं नेणें वर्म[1] । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥ ३ ॥

॥ १८४५ ॥

तुजकरितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां नये कैवार करूं अंगीकार । माझा बहु भार जडे[2] जाला ॥ ध्रु ॥
चुकलासी ह्मणों तरी जीवांचा ही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें[3] काय सत्ताबळ । माझें[4] परी कृपाळ आहां तुह्मी ॥ ३ ॥

॥ १८४६ ॥

फळ देंठींहून झडे । मग मागुतें[5] न जोडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि तांतडी[6] खोटी । कारण उचिताचे पोटीं ॥ ध्रु ॥
पुढें चढे हात । त्याग मागिलां उचित ॥ २ ॥
तुका ह्मणे रणीं । नये पाहों परतोनि ॥ ३ ॥

॥ १८४७ ॥

अगी देखोनियां सती । अंगीं रोमांच उठती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा तो नव्हे उपदेश । सुख अंतरीं उल्हांस[7] ॥ ध्रु ॥
वित्तगोतांकडे । चित्त न घाली न रडे ॥ २ ॥
आठवूनि एका । उडी घाली म्हणे तुका ॥ ३ ॥

---

१ पं. वर्म.—२ दे. चड.—३ पं. काय ऐसें.—४ दे. पं. माझे.—५ पं. मागुती न जडे.—
६ पं. तातटी.—७ दे. त. उल्हासे.

॥ १८४८ ॥

फळ पिके देटीं[1] । निमित्य वारियाची भेटी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हा तों अनुभव रोकडा ॥ कळों येतो खरा कुडा ॥ ध्रु ॥

तोंडिलिया बळें । वांयां जाती काचीं फळें ॥ २ ॥

तुका म्हणे मन । तेथें आपुलें कारण ॥ ३ ॥

॥ १८४९ ॥

हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मग तयाच्या आधारें । करणें[3] अवघें चि बरें ॥ ध्रु ॥

सुख दुःख साहे । हर्षामर्षीं[4] भंगा नये ॥ २ ॥

तुका म्हणे जीवें । आधीं मरोनि राहावें ॥ ३ ॥

॥ १८५० ॥

धांवे माते सोई । बाळ न विचारितां[5] कांहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मग त्याचें जाणें निकें । अंग वोडवी कौतुकें ॥ ध्रु ॥

नेणे सर्प दोरी । अगी भलतें हातीं धरी ॥ २ ॥

[6]तीविणें तें नेणे । आणीक कांहीं तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ १८५१ ॥

भोग द्यावे देवा । त्याग भोगीं च बरवा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आपण व्हावें एकीकडे । देव कळेवरी जोडे ॥ ध्रु ॥

योजे यथाकाळें । उत्तम पाला कंदें[7] मूळें ॥ २ ॥

वंचक[8] त्यासि दोष । तुका ह्मणे मिथ्या सोस ॥ ३ ॥

---

१ पं. देटीं ? निमित्य वारियाचे०.—२ पं. सकळ.—३ पं. करणें तें अवघें बरें.—४ पं. हर्षामर्ष.—५ पं. विचारी.—६ दे. तीविन. त. तींविण.—७. पं. कंदमुळें.—८ पं. वंचकासी, दोष.

॥ १८५२ ॥

पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ॥ ध्रु ॥
नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ॥ २ ॥
तुमचे कृपेचें पोषणें । जन्मोजन्मीं तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १८५३ ॥

जायांचें अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥ १ ॥
घुसळितां ताक कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥ ३ ॥

॥ १८५४ ॥

न बोलावें परी पडिला प्रसंग । हाकलितें जग तुझ्या नामें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लटिकें चि सोंग मांडिला पसारा । भिकारी तूं खरा कळों आलें ॥ ध्रु ॥
निलाजिरीं आह्मी करोनियां धीर । राहिलों आधार धरूनियां ॥ २ ॥
कैसा नेणों आतां करिसी शेवट । केली कटकट त्याची पुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं न बोलसी देवा । उचित हे सेवा घेसी माझी ॥ ४ ॥

॥ १८५५ ॥

नाहीं जालें मोल कळे देतां काळीं । कोण पाहों बळी दोघांमध्यें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी तरी जालों जीवासी उदार । कैंचा हा धीर तुजपाशीं ॥ ध्रु ॥
बहु चाळविलें मागें आजिवरी । आतां पुढें हरी जाऊं नेदीं ॥ २ ॥

---

१ दे. पं. पोसणें.—२ पं. लेव.—३ दे. गुसळितां.—४ पं. कांडितां पै भूस.—५ पं. नेणें.

नव्हती जों भेटी नामाची ओळखी । ह्मणऊनि दुःखी बहु जालों[1] ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं राहों नेदीं बाकी । एकवेळा चुकी जाली आतां ॥ ४ ॥

॥ १८५६ ॥

कैसा कृपाळु हें[2] न कळसी देवा । न बोलसी सेवा घेसी माझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय ऐसें बळ आहे तुजपाशीं । पाहों[3] हा [4]रिघसी कोण आड ॥ ध्रु. ॥
पाडियेला ठायीं तुझा थारा मारा । अवघा दातारा लपसी तो ॥ २ ॥
आतां तुह्मां आह्मां उरी तों चि बरें । काय [5]हीं उत्तरें वाढवूनि ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज साह्य जाले संत । ह्मणऊनि मात फावली हे ॥ ४ ॥

॥ १८५७ ॥

चुकलिया आह्मां करितसां दंड । हाकासी कां खंड पांडुरंगा ॥ १ ॥
चाळविलीं[6] एकें रिद्धिसिद्धीवरी । तैसा मी भिकारी नव्हें देवा ॥ ध्रु. ॥
कां मी येथें गुंतों मांडूनि पसारा । मागुता दातारा दंभासाटीं ॥ २ ॥
केलें म्यां जतन आपुलें वचन । ठायींचें धरून होतों पोटीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे ताळा घातला आंडाखीं[7] । ठावें होतें सेकीं आडविसी ॥ ४ ॥

॥ १८५८ ॥

कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ती स्तुती करूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते ॥ ध्रु. ॥
अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा संचिता[8] सर्वोतमा ॥ २ ॥

---

१. दे. जालें.—२ पं. "हें" नाहीं.—३ पं. पाहों हरी घेसी कोण आड.—४ दे. रिघेंसी.—५ दे. हें पं. तें.—६ पं. चाळविले एक रिद्धी वारी.—७ दे. आडांखीं.—८ पं. संचिदा नारायणा. दे. त. सचिता.

चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लाहान भक्तिकाजा[1] ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥ ४ ॥

॥ १८५९ ॥

आतां तुझा भाव कळों आला देवा। ठकूनियां[2] सेवा घेसी माझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतावरी भार ॥ध्रु॥
स्तुती करवूनि पिटिला डांगोरा । तें[3] कोण दातारा साच करी ॥ २ ॥
जातीचें वाणी मी[4] पोटींचें कुडें । नका मजपुढें ठकाठकी ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं आलें अनुभवा । आधीं च मी देवा कैसें[5] नाचों ॥ ४ ॥

॥ १८६० ॥

जन पूजी याचा मज कां आभार । हा तुह्मी विचार जाणां देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पत्र कोण मानी वंदितील सिक्का। गौरव सेवका त्यां[6] चि मुळें ॥ ध्रु ॥
मी मीपणें होतों जनामधीं आधीं । कोणें दिलें कधीं काय तेव्हां ॥ २ ॥
आतां तूं भोगिता सर्व नारायणा । नको आह्मां दीनां पीडा करूं ॥ ३ ॥
आपुलिया हातें देसील मुशारा । तुका ह्मणे खरा तो चि आह्मां ॥ ४ ॥

॥ १८६१ ॥

आमची कां नये तुह्मासी करुणा । किती नारायणा आळवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जाणां तुह्मी दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया ॥ ध्रु. ॥
देतीं घेतीं करिती खटपटा आणिकें । निराळा कौतुकें पाहोनियां ॥ २ ॥

---

१ त. भक्तिकाजीं.–२ पं. करूनियां.–३ पं. तो.–४ पं. असें.–५ पं. कैसा.–६. पं. या.

दिवस बोटीं आह्मीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आह्मी ॥ ४ ॥

॥ १८६२ ॥

तुह्मां[1] आह्मां तुटी होईल यावरी । ऐसें मज हरी दिसतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वचनाचा कांहीं न देखों आधार । करावा हा धीर कोठवरी ॥ ध्रु ॥
सारिलें संचित होतें गांठी कांहीं । पुढें ऋण तें ही नेदी कोणी ॥ २ ॥
जावें चि न लगे कोणांचिया घरा । उडाला पातेरा तुझ्या संगें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां हा चि लाभ जाला । मनुष्यधर्म गेला पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १८६३ ॥

देव मजुर देव मजुर । नाहीं उजुर सेवेपुढें ॥ १ ॥
देव गांद्याळ देव गांढ्याळ । देखोनियां बळ लपतसे[2] ॥ २ ॥
देव तर काई देव तर काई । तुका ह्मणे राई तरी[3] मोटी ॥ ३ ॥

॥ १८६४ ॥

देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा ॥ १ ॥
देव उदार देव उदार । थोड्यासाटीं[4] फार देऊं जाणे ॥ २ ॥
देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥ ३ ॥

॥ १८६५ ॥

देव बासर देव बासर । असे निरंतर जेथें तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा म्हूण कोंडी ॥ ध्रु ॥

---

१ पं. आह्मा तुह्मा.–२ दे. तपतसे.–३ पं. तर.–४ पं. थोड्यासी.

देव लागट[1] देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ॥ २ ॥

देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडी ॥ ३ ॥

देव न व्हावा देव न व्हावा । तुका ह्मणे गोवा करी कामीं ॥ ४ ॥

॥ १८६६ ॥

देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी ॥ १ ॥

देव अंकुळी[2] देव अंकुळी । भलते ठायीं[3] सोयरीक ॥ २ ॥

देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका[4] ह्मणे भाड्या दंभें[5] ठकी ॥ ३ ॥

॥ १८६७ ॥

देव बराडी देव बराडी । घाली दंठासाटीं उडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देव भ्याड देव भ्याड । राखे बळीचें कवाड ॥ ध्रु ॥

देवं[6] भाविक भाविक । होय दासांचा[7] सेवक ॥ २ ॥

देव होया देव होया । जैसा ह्मणे तैसा तया ॥ ३ ॥

देवं[8] लाहान लाहान । तुका ह्मणे अनुरेण ॥ ४ ॥

॥ १८६८ ॥

देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देवं[9] उदार उदार । देतां नाहीं थोडें फार ॥ ध्रु ॥

देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥ २ ॥

देव व्हावा देव व्हावा । आंवडे[10] तो सर्वां जीवां ॥ ३ ॥

देवं[11] चांगला चांगला । तुका चरणीं लागला ॥ ४ ॥

---

१ पं. लगट.–२ त. पं. आकुळी.–३ पं. स्थळीं.–४ पं. तुका भाड्या दंभ टाकी.–५ त. शंडें –६ पं. देव भाविक देव भाविक.–७ दे. दासाचें.–८ पं. देव लहान देव लहान.–९ पं. देव उदार देव उदार.–१० त. आवडतो सर्वां०.–११ पं देव चांगला देव चांगला । तुका चरणासी लागला ॥.

॥ १८६९ ॥

देव पाहों देव पाहों । उंचे ठायीं उभे राहों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवें देखिला देखिला । तो नाहीं कोणी भ्याला ॥ ध्रु ॥
देवां काहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ॥ २ ॥
देव जाणे देव जाणे । पुरवी मनींचिये खुणे ॥ ३ ॥
देवें कातर कातर । तुका ह्मणे अभ्यंतर ॥ ४ ॥

॥ १८७० ॥

देवें आमचा आमचा । जीव सकळ जीवांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव आहे देव आहे । जवळी आह्मां अंतरबाहे ॥ ध्रु ॥
देव गोड देव गोड । पुरवी कोडाचें ही कोड ॥ २ ॥
देव आह्मां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥ ३ ॥
देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥ ४ ॥

॥ १८७१ ॥

जाऊं देवाचिया गांवां । देव देईल विसांवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ॥ ध्रु ॥
घालूं देवासी च भार । देव सुखाचा सागर ॥ २ ॥
राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥ ४ ॥

॥ १८७२ ॥

प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ॥ १ ॥

---

१ पं. देव देखिला देव देखिला ।.–२ पं. देवासी.–३ त. अंतरींचे.–४ पं. देव कातर देव कातर ।.–५ पं. देव अमुचा देव आमुचा ।–६ पं. अंतर्बाह्य.

॥ ध्रु. ॥ प्रेमें[1] यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ॥ ध्रु ॥
प्रेमें[2] पाठीं लागे बळें । भक्त देखोनियां भोळे[3] ॥ २ ॥
प्रेम न वजे दवडितां । शिरे बळें जेथें कथा ॥ ३ ॥
तुका ह्मणे थोर आशा । प्रेमा घरीं[4] विष्णुदासां ॥ ४ ॥

॥ १८७३ ॥

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥ ध्रु ॥
गोविलों थोरिवां[5] । दुःख वाटतसे जीवा ॥ २ ॥
तुका ह्मणे माया । अवरा हे पंढरिराया ॥ ३ ॥

॥ १८७४ ॥

नाहीं तुह्मी केला । अंगीकार तो विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोंगें[6] न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ॥ ध्रु ॥
प्रेम नाहीं अंगीं । भले ह्मणविलें जगीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । मज वांचां कां चाळवा ॥ ३ ॥

॥ १८७५ ॥

आतां चक्रधरा । झणी आह्मांस अव्हेरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचीं ह्मणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ॥ ध्रु ॥
काळ आह्मां खाय । तरी तुझें नांव जाय ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥ ३ ॥

---

१ दे. तं. प्रेम.—२ दे. प्रेमें.—३ त. भोळें. दे. " भोळें " असतां " भोळे" केलें आहे.—४ पं. धरी.—५ दे. थोरिवां.—६ पं. सांगें.

॥ १८७६ ॥

मज ऐसें कोण उद्धरिलें सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हातींच्या कांकणां[1] कायसा आरिसा । उरलों मी जैसा तैसा आहें ॥ ध्रु ॥

धन्वंतरी[2] हरी रोग्याचिये वेथे । तें तों कांहीं येथें न देखिजे ॥ २ ॥

तुका ह्मणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ॥ ३ ॥

॥ १८७७ ॥

काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय जालीं[3] बळें शक्तिहीन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझिया संचितें आणिलासी हरी । जालें तुजवरी वरिष्ठ तें ॥ ध्रु ॥

काय गमाविली सुदर्शन गदा । नो[4] बोला गोविंदा लाजतसां ॥ २ ॥

तुका ह्मणे काय ब्रिदाचें तें काम । सांडो[5] परतें नाम दिनानाथ ॥ ३ ॥

॥ १८७८ ॥

बळ बुद्धी वेचुनियां शक्ती । उदकें[6] चालवावें युक्ती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं चळण तया अंगीं । धांवे लवणामागें[7] वेगीं ॥ ध्रु ॥

पाट मोट कळा । भरित पखाला[8] सागळा[9] ॥ २ ॥

बीजा ज्यासी द्यावें । तुका ह्मणे तैसें व्हावें ॥ ३ ॥

॥ १८७९ ॥

न ह्मणे साना थोर । दुष्ट[10] पापी अथवा चोर ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सकळा द्यावी ऐकी[11] चवी । तान हरूनि निववी ॥ ध्रु ॥

न ह्मणे दिवस राती । सर्व काळ सर्वां भूतीं ॥ २ ॥

–१ पं. काय तो आरसा.–२ दे. त. धनमंत्री. पं. धनवंत्री.–३ पं. जाले.–४ पं. त्याभेणें गोविंदा०.–५ पं. सांडीं० दिनानाथा॥.–६ पं. उदका.–७ त. लवनामागें.–८ दे. पखाळा.–९ पं. सगळा.–१० दे. त. पं. दुष्ट.–११ पं. एक.

तुका ह्मणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ॥ ३ ॥

॥ १८८० ॥

इच्छा चाड नाहीं । न धरी संकोच ही कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज व्हावें ॥ ध्रु ॥
मोहरी[1] कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ॥ ३ ॥

॥ १८८१ ॥

तरले ते मार्गे आपुलिया सत्ता । कमाई अनंता करूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उसणें फेडितां धर्म तेथें कोण । ते तुज अनन्य[2] तुह्मी त्यांसी ॥ ध्रु ॥
मज ऐसा कोण सांगा[3] वांयां गेला । तो तुह्मी तारिला पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे नांवासारिखी[4] करणी । न देखें हें[5] मनीं समजावें ॥ ३ ॥

॥ १८८२ ॥

कवणांशीं भांडों कोण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरिलें उदास दुरदुरांतरें[6] । सांडी एकसरें केली माझी ॥ ध्रु ॥
आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळ बुंथी घेसी ॥ २ ॥
तुका ह्मणे एके गांवींची वसती । ह्मणऊनि खंती वाटे देवा ॥ ३ ॥

॥ १८८३ ॥

आळवितां कंठ शोकला भीतरें[7] । आयुष्य वेचे धीरें[8] नाहीं मना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दिनाच्या माहेरा पांडुरंगा ॥ ध्रु ॥

---

१ दे. मुहरि. प. मुहुरी.—२ दे. अनन्ये—३ प. सागा वया गेला.—४ प. नामासारिखी.—५ पं. "हें" नाहीं.—६ "दूरदूर अंतरें" असावें?—७ दे. त. भीतरु.—८ त. धीरु.

धन दिसे डोळा दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष जालें ॥ २ ॥
चुकलों काय तें मज क्षमा करीं । आलिंगूनि हरी प्रेम द्यावें ॥ ३ ॥
अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरी सर्व काळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥ ५ ॥

॥ शिवाजी राजे यांनीं स्वामींस अबदागिरी, घोडा, कारकून असे न्यावयास पाठविले ते अभंग ॥ १४ ॥

॥ १८८४ ॥

दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ॥ ध्रु ॥
मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्टा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । माझे सोडववणे धांवा ॥ ३ ॥

॥ १८८५ ॥

नावडे जें चित्ता । तें चि होसी पुरविता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवेसाटीं ॥ ध्रु ॥
न करावा संग । वाटे दुरावावें जग ॥ १ ॥
सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥ ३ ॥
जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥ ४ ॥
तुका ह्मणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥ ५ ॥

॥ १८८६ ॥

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ति ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥ ध्रु॥
ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनियां लेख पत्रिकेचे ॥ २ ॥
शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ३ ॥
व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनि मोकळा जालासी तूं ॥ ४ ॥
हेहेता लागला आमुचिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हे चि थोर ॥ ५ ॥
याचें हें उत्तर ऐक गा भूपती । लिहिली विनंती हेताची हे ॥ ६ ॥
अरण्यवासी आह्मी फिरों उदासीन । दर्शन ही हीन अमंगळ ॥ ७ ॥
वस्त्राविण काया जालीसे मळीन । अन्नरहित हीन फळाहारी ॥ ८ ॥
रोडके हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ ९ ॥
तुका ह्मणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ॥ १० ॥

॥ १८८७ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करुणा आहे ह्रदयस्थाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नहों कीविलवाणें नाहीं आह्मी दीन । सर्वदा शरण पांडुरंगीं ॥ ध्रु ॥
पांडुरंग आह्मां पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय तेथें ॥ २ ॥
तुझी भेट घेणें काय हें मागणें । आशेचें हें शून्य केलें आह्मीं ॥ ३ ॥
निराशेचा गांव दिधला आह्मांसी । प्रवृत्तिभागासी सांडियेलें ॥ ४ ॥
पतिव्रतेचें हे मन पति भेटो । तैसे आह्मी विठोमाजी नांदों ॥ ५ ॥
विश्व हें विठ्ठल नाहीं दुजें कांहीं । देखणें तुझें ही तयामाजी ॥ ६ ॥
तुज ही विठ्ठल ऐसें चि वाटलें । परि एक आलें आडवें हें ॥ ७ ॥

सद्गुरुश्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मन चळों नको ॥ ८ ॥
बहुतां ठायीं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे कैसें ॥ ९ ॥
तुका ह्मणे बापा चातुर्यसागरा । भक्तिभाव तारा भाविकांसी ॥ १० ॥

॥ १८८८ ॥

तुह्मांपाशीं आह्मी येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे [1]थार चिंध्या बिदी ॥ ध्रु ॥
निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥ २ ॥
तेथें काय करणें कवणाची आस । वांयां होय नाश आयुष्याचा ॥ ३ ॥
राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ॥ ४ ॥
रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥ ५ ॥
देखोनियां वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥ ६ ॥
ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आह्मां हरि उपेक्षीना ॥ ७ ॥
आतां हें चि तुह्मा सांगणें कौतुक । भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ॥ ८ ॥
तपव्रतयाग महा भले जन । आशाबद्ध हीन वर्ततातीं ॥ ९ ॥
तुका ह्मणे तुह्मी श्रीमंत मानाचे । पूर्वीं च दैवांचे हरिभक्त ॥ १० ॥

॥ १८८९ ॥

आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें योगें तुह्मां घडों पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥ ध्रु ॥
निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ती चित्तीं आणूं नका ॥ २ ॥

---

१ दे. "हे" नाहीं.—२ त. सामान्य.

परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥ ३ ॥
सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥ ४ ॥
हें चि ऐकोनियां चित्त समाधान । आणीक दर्शनें चाड नाहीं ॥ ५ ॥
घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ६ ॥
एकदोनी कर्मे जाणोनियां वर्मे[1] । आपुलिया भ्रमें राहूं आतां ॥ ७ ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥ ८ ॥
आत्मारामीं मन ठेवूनियां राहें । रामदासीं पाहें आपणेयां ॥ ९ ॥
तुका ह्मणे राया धन्य जन्म क्षिती । त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥ १० ॥

॥ १८९० ॥

आतां हे विनवणी प्रधानअष्टक[2] । प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुह्मांपाशीं ॥ ध्रु ॥
मजुमुचे धणी लेखनकारक । पत्रींचा विवेक समजावा ॥ २ ॥
पेशवे सुरनिस चिटनिस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापति ॥ ३ ॥
भूषण पंडितराय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असे ॥ ४ ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनि । विवंचोनि श्रवणीं घाला तैया[3] ॥५॥
सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ॥ ६ ॥
यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पाहा वांयां जाऊं नेदा ॥ ७ ॥
भिडेसाटीं बोला गाळूनि अर्थातें । अनर्थकारी तुमतें होइल तेणें ॥ ८ ॥
तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां । सांगणें तें राया पत्र माझें ॥ ९ ॥

॥ १८९१ ॥

जाणोनि अंतर । टाळिसील करकर ॥ १ ॥

---

१ दे. वर्म.–२ त. अष्टका । प्रभूसी विवेका०.–३ त. राया.

॥ ध्रु. ॥ तुज लागली हे खोडी । पाडुरंगा बहु कुडी ॥ ध्रु ॥
उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ॥ २ ॥
तुका ह्मणे पाये । कैसे सोडीन ते पाहें ॥ ३ ॥

॥ १८९२ ॥

नाहीं विचारीत । मेघ [1]हागणदारी सेत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारगार्वे चित्त ॥ ध्रु ॥
वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥ २ ॥
तुका ह्मणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥ ३ ॥

॥ १८९३ ॥

काय दिला ठेवा । आह्मां विठ्ठल चि [2]व्हावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी कळलेनी उदार । साटीं परिसाची गार ॥ ध्रु ॥
जीव [3]दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥ २ ॥
तुका ह्मणे धन । आह्मां गोमासासमान ॥ ३ ॥

॥ १८९४ ॥

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥ ध्रु ॥
खोलीं पडे ओली बीज । [4]तरीं च हातीं लागे निज ॥ २ ॥
तुका ह्मणे धनी । विठ्ठल [5]अक्षरें हीं तिन्ही ॥ ३ ॥

॥ १८९५ ॥

मुंगी आणि रांव । आह्मां सारखाची जीव ॥ १ ॥

---

१ दे. हागनदारी.—२ पं. आह्मी.—३ पं०. देतां तरी । वचना नये एकासरी ॥२॥ गोमासासमान । तुका ह्मणे आह्मां धन ॥ ३ ॥—४ पं. तरी हाता लागे०.—५ दे. अक्षरी हीं०. पं. अक्षरे हे०.

॥ ध्रु. ॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ ध्रु ॥
सोनें आणि माती । आह्मां समान हें चित्तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥ ३ ॥

॥ १८९६ ॥

तिहीं त्रिभुवनीं । आह्मी वैभवाचे धनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ ध्रु ॥
काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता । अवघी आमुची च आतां ॥ ३ ॥

॥ १८९७ ॥

आह्मी तेणें सुखी । ह्मणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥ ध्रु ॥
कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥ २ ॥
ह्मणवा हरिचे दास । तुका ह्मणे मज हे आस ॥ ३ ॥

॥ १८९८ ॥ ॥ १४ ॥

नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमेरा[2] सुमन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ ध्रु ॥
पदरीं घालीं पिळा । बाप निर्बळ साटीं बाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे भावें । भेणें देवें[3] आकारावें ॥ ३ ॥

॥ १८९९ ॥

भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ ॥ १ ॥

---

१ पं. सावळें.–२ पं. भ्रमरापासून.–३ दे. देवा.

॥ ध्रु. ॥ करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ॥ ध्रु ॥
बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥ ३ ॥

॥ १९०० ॥

भावाचिया बळें । आह्मी निर्भर दुर्बळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ॥ ध्रु ॥
तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥ २ ॥
एकछत्री राज[3] । तुक्या पांडुरंगीं काज ॥ ३ ॥

॥ १९०१ ॥

सत्तावर्त्ते[4] मन । पाळीं[5] विठ्ठलाची आंन[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आज्ञा वाहोनियां शिरीं । सांगितलें तें चि करीं ॥ ध्रु ॥
सरलीसे धांव । न लगे वाढवावी हांवें ॥ २ ॥
आहे नाहीं त्याचें । तुका ह्मणे कळे साचें ॥ ३ ॥

॥ १९०२ ॥

खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां चुकली खटपट । झाड्या पाड्याचा बोभाट ॥ ध्रु ॥
आहे नाहीं त्याचें । आह्मां काम सांगायाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे चिंता । भार वाहे तुझ्या माथां ॥ ३ ॥

॥ १९०३ ॥

आंतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ॥ १ ॥

---

१ पं. भावाक्रेया.—२ पं. निर्बळ.—३ पं. राज्य.—४ दे. सत्तावृतें (सत्ताव्रतें?).—५ पाळीं?.—६ पं. ल. आण.—७ पं. वाह.—८ पं. त्याचे.

॥ ध्रु. ॥ चुकली हे मरमर । भार माथांचे डोंगर ॥ ध्रु ॥
नसतां कांहीं जोडी । करिती बहुतें तडातोडी ॥ २ ॥
जाला झाडापाडा । तुका ह्मणे गेली पीडा ॥ ३ ॥

॥ १९०४ ॥

संचित[1] चि खावें । पुढें कोणाचें न घ्यावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पुरे हे चाकरी । राहों बैसोनियां घरीं ॥ ध्रु ॥
नाहीं काम हातीं । आरागूक दिवसराती[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता । पुरे[3] पराधीन आतां ॥ ३ ॥

॥ १९०५ ॥

ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी च जोडिलें तें[4] भोगे । कांहीं आघात न लगे[5] ॥ ध्रु ॥
वाढवावी थोरी । मुखें[6] ह्मणे तुझे हरी ॥ २ ॥
तुका ह्मणे हे गोमटी । दासा न घालावी[7] तुटी ॥ ३ ॥

॥ १९०६ ॥

माझा तुह्मी देवा केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहे तैसा ॥ ध्रु ॥
लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दुःखाचा हा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥ ३ ॥

॥ १९०७ ॥

तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें । जीव येरयेरें[8] वंचिजे ना ॥ १ ॥

---

१ दे. त. संचितें.–२ दे. दिसगातां.–३ पं. आतां पुरे पराधीनता.–४ पं. "तें" नाहीं.
५ पं लागे.–६ पं. सुखें०. त. मुखें ह्मणे तुझें०.–७ दे. घलावी.–८ पं. येरयेरें.

॥ ध्रु. ॥ हें तुह्मां सांगणें काय उगवूनि । जावें समजोनि पांडुरंगा ॥ ध्रु ॥
जेवित्याची खूण वाढित्या अंतरीं । प्रीतीनें हे धरी चाली तेथें ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु परीचे आदर । अत्यंत वेव्हारसंपादणी ॥ ३ ॥

॥ १९०८ ॥

न पालटे एक । भोळा भक्त चि भाविक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येरां नास आहे पुढें । पुण्य सरतां उघडें ॥ ध्रु ॥
नेणे गर्भवास । एक विष्णूचा चि दास ॥ २ ॥
तुका ह्मणे खरें । नाम विठोबाचें बरें ॥ ३ ॥

॥ स्वामींनीं पत्र पंढरीनाथास पंढरीस पाठविलें ते अभंग ॥ ३६ ॥

॥ १९०९ ॥

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चालें तुज पंढरिनाथ बोलावितो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ ध्रु ॥
निरांजलें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥ २ ॥
तुका ह्मणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ ३ ॥

॥ १९१० ॥

कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ ध्रु ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥ २ ॥

---

१ प. नाश.–२ दे. चाल पंढरिनाथ. "तुज" खोडलें आहे.–३ दे. निरांजिरें. ब. निरांजळें.–४ पं. करी.–५ पं. डोळां.–६ पं. न करावी ते चिंता ऐसे कांहीं ।.

तुका ह्मणे एक वेचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ३ ॥

॥ १९११ ॥

कांहीं माझे कळों आले गुणदोष । ह्मणऊनि उदास धरिलें ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥ ध्रु ॥
कळावें तें मना आपुलिया सर्वे । ठायींचें हें घ्यावें विचारूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें[1] बुद्धीचिया ॥ ३ ॥

॥ १९१२ ॥

नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरीं कोप येऊ सुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ॥ ध्रु ॥
नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥ ३ ॥

॥ १९१३ ॥

आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं आतां न गमेसें[2] जालें । बहुत सोसिलें बहु[3] दिस ॥ ध्रु ॥
घर लागे पाठी चित्ता उभे वारे । आपुलें तें झुरे पाहावया ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव गेला तरी जावें[4] । धरिला तो देव भाव सिद्धी[5] ॥ ३॥

॥ १९१४ ॥

विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥ १ ॥

---

१ पं. कर्तव्य बुद्धीचिया.–२ दे. नमगेसें.–३ पं. बहुत.–४ पं. जावो.–५ पं. शुद्ध.

॥ ध्रु. ॥ धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणे थोडी मति माझी ॥ ध्रु ॥
जेथें देवा तुझा न कळे चि पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥ २ ॥
जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥ ३ ॥
तुका ह्मणे विटेवरि जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥ ४ ॥

॥ १९१५ ॥

देवांच्या ही देवा गोपिकांच्या पती । उदार हे ख्याती त्रिभुवनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्में महा दोष ॥ ध्रु ॥
सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्तिचारी ॥ २ ॥
इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीतें[1] गातां छंद वातां[2] टाळी ॥ ३ ॥
तुका ह्मणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जिवन पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १९१६ ॥

काय जालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु दिस पाहें वचनाची वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ ध्रु ॥
नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों उतर निष्ठुर न पाहिजे ॥ २ ॥
पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनि गोविंदा जरूरसा ॥ ३ ॥
तुका ह्मणे आलें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तो ही धाक ॥ ४ ॥

॥ १९१७ ॥

एवढा संकोच तरि कां व्यालासी । आह्मी कोणांपाशीं तोंड वासूं ॥ १ ॥

---

१ पं. गीति.–२ त. वाहातां.

॥ ध्रु. ॥ कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुह्मीं देवा
॥ ध्रु. ॥

कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥ २ ॥

कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील[2] कोडें संकटाचें ॥ ३ ॥

तुका म्हणे तुह्मी देखिली निश्चिंती[3] । काय माझे[4] चित्तीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १९१८ ॥

देई डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुज बुडवानें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥ ध्रु. ॥

फार थोडें कांहीं करूनि पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ॥ २ ॥

आहे माझी ते चि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥ ३ ॥

तुका ह्मणे आह्मां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥ ४ ॥

॥ १९१९ ॥

सीण भाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ इंद्रियांची धांव होईल कुंटित । पावेल हें चित्त समाधान ॥ ध्रु. ॥

माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥ २ ॥

आस नाहीं परी उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥ ३ ॥

तुका ह्मणे माझी अविट आवडी । खंडणं[6] तांतडी होऊं नेदीं ॥ ४ ॥

॥ १९२० ॥

धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ ध्रु. ॥

---

१ पं. वास.–२ पं. उगविलें.–३ पं. निश्चिती.–४ पं माझी.–५ त. " उत्तरी " असें मागून केलें आहे.–६ पं. खंडणा.

प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥ २ ॥
जातीं तळा येतां मागुताला वरी[1] । वोळशाचे फेरी सांपडलों ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु करितां विचार । उतरें डोंगर एक चढे ॥ ४ ॥

॥ १९२१ ॥

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥ १ ॥
॥ धु. ॥ पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ ध्रु ॥
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेमे[2] कां हस्तक न पवती ॥ २ ॥
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥ ३ ॥
तुका ह्मणे कई जाऊनि मोटळें[3] । पडेन[4] हा लोळें महाद्वारीं ॥ ४ ॥

॥ १९२२ ॥

काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ॥ १ ॥
॥ धु. ॥ ह्मणऊनि केली सांडी । घांस घेऊं नें[5] ल्हां तोंडीं ॥ ध्रु ॥
करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं ॥ २ ॥
तुका ह्मणे टांचें । घरीं जोलेंसेवरोचें[6] ॥ ३ ॥

॥ १९२३ ॥

कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ॥ १ ॥
॥ धु. ॥ तरी हा पडिला विसर । माझा तुह्मां जाला भार ॥ ध्रु ॥
आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ॥ २ ॥
तुका ह्मणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥ ३ ॥

---

१ पं. मागुता लौकरी. दे. "मागुता लौकरी" याचें "मागुताला वरी" केलें आहे.–२ पं. क्षम.–३ पं. मोटाळें.– ४ पं. पडेना हा.– ५ पं. न ल्हाये.–६ त. जालेंसेवरोचे. अर्थ बरोबर समजत नाहीं सबब पदच्छेद केला नाहीं.

॥ १९२४ ॥

निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ॥ १ ॥
परी हें [1]नेघेवे चि यश । भेओं नको सुखी आस ॥ ध्रु ॥
सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥ २ ॥
न लगे निरोपासी मोल । तुका ह्मणे वेचे बोल ॥ ३ ॥

॥ १९२५ ॥

जोडीच्या हव्यासें । लागे [2]धेनांचें चि पिसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ ध्रु ॥
पाहे रूक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । तुला बहुत चि हेवा ॥ ३ ॥

॥ १९२६ ॥

मविलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि तूं धाला चि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥ ध्रु ॥
अवघ्यां [3]अवघा काळ । वाटा [4]पाहाती सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । अराणूक तुज कांहीं ॥ ३ ॥

॥ १९२७ ॥

न बैससी खालीं । [5]सम उभा च पाउलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे जाले [6]बहुत दिस । जालीं युगें अठ्ठाविस ॥ ध्रु ॥
नाहीं भाग सीण । अरागूक एक क्षण ॥ २ ॥
तुका ह्मणे किती । मापें केलीं देती घेती ॥ ३ ॥

---

१ पं. न घेवे.–२ पं. धन्याचें.–३ पं. अवघ्या.–४ पं. वाहाती.–५ पं. उभा सम चि०.–
६ पं. वहु.

॥ १९२८ ॥

जोडी[1] कोणांसाटीं । एवढी करितोसी आटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरी हें आह्मां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ॥ ध्रु ॥
करूनि जतन । कोणा देसील हें[2] धन ॥ २ ॥
आमचे तळमळे । तुझें[3] होईल वाटोळें ॥ ३ ॥
घेसील हा श्राप । माझा होऊनियां बाप ॥ ४ ॥
तुका ह्मणे उरी । आतां न ठेवीं यावरी ॥ ५ ॥

॥ १९२९ ॥

करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस ॥ ध्रु ॥
येथें न करीं काम । मुखें नेघें तुझें नाम ॥ २ ॥
तुका ह्मणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥ ३ ॥

॥ १९३० ॥

समर्थाचे पोटीं । आह्मी जन्मलों करंटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी जाली जगीं कीर्ति । तुझ्या[4] नामाची फजिती ॥ ध्रु ॥
येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥ २ ॥
तुका ह्मणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥ ३ ॥

॥ १९३१ ॥

पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज सांगोनियां धाडीं । वाट पाहातों बराडी ॥ ध्रु ॥

---

१ त. जोडी केली कोणा० —२ पं. "हें" नाहीं.—३ पं. तुमचें.—४ पं. माझ्या.

कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥ २ ॥

तुका ह्मणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥ ३ ॥

॥ १९३२ ॥

कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥ १ ॥

॥ धृ. ॥ जें या मनासी आवरूं । आंतें पोटीं वाव धरूं ॥ ध्रु ॥

कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥ २ ॥

तुका ह्मणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥ ३ ॥

॥ १९३३ ॥

[2]समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥

॥ धृ. ॥ [3]आतां भावें करूनि साचा । पायां पडिलों विठोबाच्या ॥ ध्रु ॥

न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥ २ ॥

तुका ह्मणे विनंती । वि[4]नविली धरा चित्तीं ॥ ३ ॥

॥ १९३४ ॥

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥ १ ॥

॥ धृ. ॥ घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ ध्रु ॥

पत्र हातीं दिलें । [5]जैया जेथें पाठविलें ॥ २ ॥

तुका ह्मणे येती । जाइन सामोरा पुढती ॥ ३ ॥

॥ १९३५ ॥

[6]रूळे महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥ १ ॥

॥ धृ. ॥ तैसें माझें दंडवत । नि[7]रोप सांगतील संत ॥ ध्रु ॥

---

१ त. आतां.—२ त. आतां समर्पक.—३ त. आतां पाया पडिलों पायां पडिलों ।. देहूच्या प्रतींत याप्रमाणें च होतें, पण मागून वर छापल्या प्रमाणें केलें आहे.—४ त. विनविलें. ५ पं. तया तेथें पाठाविलें ।.—६ दे. रुळें.—७ दे. सांगा निरोप हा संत.

पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥ २ ॥
तुका ह्मणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ३ ॥

॥ १९३६ ॥

तुह्मी संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ ध्रु ॥
भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥ २ ॥
न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ३ ॥

॥ १९३७ ॥

होइल कृपादान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ ध्रु ॥
रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ २ ॥
तुका ह्मणे ताप । हरती देखोनियां बाप ॥ ३ ॥

॥ १९३८ ॥

परिसोनि उत्तर । जाब देईजे सत्वर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरी तूं होसी कृपावंत । तरि हा बोलावीं पतित ॥ ध्रु ॥
नाणीं कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥ ३ ॥

॥ १९३९ ॥

ऐकोनियां कीर्ती । ऐसी वाटती विश्रांती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मातें सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ ध्रु ॥

---

१ त. पं. करा.—२ पं. कीव माझी.

बोलतां[1] ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥ २ ॥
तुका ह्मणे धांवे । वासना[2] ते रस घ्यावे ॥ ३ ॥

॥ १९४० ॥

किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ ध्रु ॥
पुण्य होतें[3] गांठी । तरि कां लागती हे आटी ॥ २ ॥
तुका ह्मणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ३ ॥

॥ १९४१ ॥

करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ ध्रु ॥
घरीं लागे कळ्ह[4] । नाहीं जात तो शीतळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥ ३ ॥

॥ १९४२ ॥

आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणसी कोणा तरी काळें । आहेतसीं माझीं बाळें ॥ ध्रु ॥
दुरी दूरांतर । तरी घेसी समाचार ॥ २ ॥
नेसी कधीं तरी । तुका ह्मणे लाज हरी ॥ ३ ॥

॥ १९४३ ॥

आतां हे सेवटीं । माझी आइकावी गोष्टी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां द्यावा वचनाचा । जाब कळे[6] तैसा याचा ॥ ध्रु ॥

---

१ पं. बोलतां एकाचे ।–२ त वासना हे रस०.– पं. रसना ते रस०.–३ पं. होतीं.–
४ पं. कळ हे. दे. त. कळ्हे.–५ पं. धरीं.–६ पं. कळेल.

आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥ २ ॥
तुका ह्मणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥ ३ ॥

॥ १९४४ ॥

बोलिलों तें आतां । कांहीं जाणतां नेणतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षमा करावे[2] अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥ ध्रु ॥
स्तुती निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥ २ ॥
तुका ह्मणे लाड । दिला तैसें[3] पुरवा कोड ॥ ३ ॥ ॥ ३६ ॥

॥ १९४५ ॥

माहेरिंचा काय येईल निरोप । ह्मणऊनि झोंप नाहीं डोळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निडळा हे ठेवीं वरी बाहे ॥ ध्रु ॥
बोटवरी माप लेखितों दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ॥ २ ॥
काय नेणों संतां पडेल[4] विसर । कीं नव्हे सादर मायबाप ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥ ४ ॥

॥ १९४६ ॥

परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडों नेदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुकानदृष्टी आइके[5] देखणा । पुरोनियां जना उरलासे ॥ ध्रु ॥
सांगितल्याविणें जाणे अंतरिंचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ॥ २ ॥
बहुमुखें कीर्ती आइकिली कानीं । विश्वास ही मनीं आहे माझ्या[6] ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं जात वांयांविण । पाळितो वचन बोलिलों तें ॥ ४ ॥

---

१ पं. राख.—२ पं. करावा.—३ पं. तैसा.—४ पं. पडिला.—५ त. आईकें.—६ दे. त माझा.

॥ ११४७ ॥

यावरि न कळे संचित आपुलें । कैसें वोडवलें होइल पुढें ॥ १ ॥
॥ धु. ॥ करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ॥ धृ॥
जोंवरी हे डोळां देखें[1] वारकरी । तों हें भरोवरी करी चित्त ॥ २ ॥
आस वाढविते बुद्धीचे[2] तरंग । मनाचे[3] ही वेग वावडती ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥ ४ ॥

॥ ११४८ ॥

होईल निरोप घेतला यावरी । राउळाभीतरीं जाऊनियां ॥ १ ॥
॥ धु. ॥ करूनियां दधिमंगळभोजन । प्रयाण शकुनसुमुहूर्तें[4] ॥ धृ ॥
होतील दाटले सद्गदित कंठीं । भरतें या[5] पोटीं वियोगाचें ॥ २ ॥
येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधानें[6] होतीं संतीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे चाली न साहे मनास । पाहाती कळस परंपरतो[7] ॥ ४ ॥

॥ ११४९ ॥

ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येते[8] वारकरी होते वाटे ॥ १ ॥
॥ धु. ॥ देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ॥ धृ ॥
केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होइल प्रेम ॥ २ ॥
गरुडटके टाळ मृदंग[9] पताका । सांगती[10] ते एकां एक सुख ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां येती लवलाहीं । आलिंगूनि बाहीं देइन क्षेम ॥ ४ ॥

---

१ पं. देखों.—२ त. बुद्धीचा.— ३ पं. चित्ताचे ते वेग वावरती.— ४ पं. शकुनसुमुहूर्तें. —५ पं. त्या.—६ दे. समाधान.—७ पं. परतोनि.—८ दे. येते वारकरी होत वाटे । त. . येते वारकरी होते वाटे.—९ दे. त. पं. मृदांग.—१० सांगताती.

॥ १९५० ॥

क्षेम [1]मायबाप पुसेन हें आधीं । [2]नेघलीं हें मधीं सुख दुःख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न करीं तांतडी आपणांपासूनि । आइकेन कानीं सांगती तें ॥ध्रु.॥
अंतरींचें संत जाणतील गूज । निरोप तो मज सांगतील ॥ २ ॥
पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें [3]आळिंगून ॥ ३ ॥
तुका ह्मणे काया करीन कुरवंडी । ओंवाळून सांडीं त्यांवरून ॥ ४ ॥

॥ १९५१ ॥

[4]होइल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शृंगारूनि माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥ ध्रु. ॥
क्षेम आहे ऐसें होइल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥ २ ॥
अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होइल कृपावंता [5]निरोपिली ॥ ३ ॥
तुका ह्मणे सर्व येईल [6]मुंऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ॥ ४ ॥

॥ १९५२ ॥

दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती [7]निरास निःशेष न घडे । [8]कांहीं तरी ओढे चित्त माये ॥ध्रु.॥
लौकिकाचीं तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥ २ ॥
अथवा कोणाचें घेणें लागे रीण । नाहीं तरी [9]हीनकर्मी कांहीं ॥ ३ ॥
व्यालीचिये अंगीं असती वेधना । तुका ह्मणे मना मन [10]सांक्ष ॥ ४ ॥

---

१ पं. ०मायबापा पुसेन आधीं ।–२ पं. न घालीं०.–३ पं. आलिंगन.–४ पं. होईल.–५ पं. निरूपिली.–६ “ मुळ्हारी ” असावें !–७ पं. निराश.–८ पं. काहीं तरि चि ओढे०.–९ पं. हीन कर्म.–१० पं. साक्षी.

॥ १९५३ ॥

बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवेरे हें मन ते चि सोई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घडी घडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ॥ ध्रु ॥
नो[1] बोलावें ऐसा करितों विचार । प्रेसंगीं[2] तों फार आठवतें ॥ २ ॥
इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली ये चि ठायीं ॥ ३ ॥
एकसरें सोस माहेरासी जावें । तुका ह्मणे जीवें[3] घेतलासे ॥ ४ ॥

॥ १९५४ ॥

नाहीं हाँनि[4] परी न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ॥ ध्रु ॥
आणिक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ॥ २ ॥
बहु कामें केलें बहु कासावीस । बहु जाले दिस भेटी नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याचें न कळे अंतर । अवस्था तों[5] फार होते मज ॥ ४ ॥

॥ १९५५ ॥

तोंवरी म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणाचिया मुखें तँट[6] नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ॥ ध्रु ॥
दिसे हानि परी निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ॥ २ ॥
आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरि कां धीर केला नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठाँयीं[7] आहे ॥ ४ ॥

---

१ त. पं. न.–२ पं. पडतो विसर प्रसंगीं °तो.–३ पं. जीव.–४ त. पं. हाणी. दे. "हानि" असतां मागून "हाति" केलें आहे.–५ पं. ते फार होत मज.–६ पं. तंट.–७ पं. ठायी.

॥ १९५६ ॥

माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करिन त्यासी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पायांवरी माथा आलिंगीन बाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ॥ ध्रु ॥

सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पैर्वकाळ आहे त्यैास ॥ २ ॥

आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन अघवें आहे तैसें ॥ ३ ॥

तुका ह्मणे वीट नेघें आवडीचा । बोलिली च वाचा बोलवीन ॥ ४ ॥

॥ १९५७ ॥

वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ विसरु न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥ ध्रु ॥

कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणे फिकें ॥ २ ॥

निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ॥ ३ ॥

तुका ह्मणे हित चित्तें ओढियेलें । जेथें तें उगलें जावें यणें ॥ ४ ॥

॥ १९५८ ॥

आतां माझे सखे येती वौरकरी । जीवा आस थोरी लौगली ते ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥ ध्रु ॥

काय लाभ जाला काय होतें केणें । काय काय कोणें सांटविलें ॥ २ ॥

मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ॥ ३ ॥

तुका ह्मणे काय सांगती ते कानीं । ऐकोनियां मनीं धरूनी राहें ॥ ४ ॥

॥ १९५९ ॥

काय करावें म्यां केले ते विचार । घडेल साचार काय पाहों ॥ १ ॥

---

१ पं. पूर्वकाळ.--२ त. ऐसा.--३ हे. त. वारेकरी.--४ पं. लागलीसे.

॥ ध्रु. ॥ काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं[1] जोडी ते चि खरी ॥ ध्रु ॥
काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनि । तें हें करीं मनीं विवंचना ॥ २ ॥
आणीक ही त्यासी बहुत कारण । बहु असे जिर्ण ओढीचें ही ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ॥ ४ ॥

॥ १९६० ॥

आह्मां अराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजिवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुत्रदाराधन होतो[2] मनी धंदा । गोविं[3]येलों सदा होतों कामें ॥ ध्रु ॥
वोडवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनि ॥ २ ॥
मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनियां चिंता उपजली ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाट पाह्याचें कारण । येथोचियां[4] हिंणें जालें भाग्य ॥ ४ ॥

॥ १९६१ ॥

बहु दिस नाहीं माहेरिंची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलाल्या होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें ॥ ध्रु ॥
तोडि[6]लें तुटतें जडती जडलें । आहे तें आपुलें आपणावें ॥ २ ॥
बहु[7] निरोपाचें पावलें उत्तर । जवळी च पर एक तें ही ॥ ३ ॥
काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका ह्मणे ॥ ४ ॥

---

१ त. परारब्धीं. पं. प्रारब्धें.—२ पं. होतीं.—३ पं. गोवियेलें सदा होतें कामें ।—४ पं. येथींचिया.—५ त. हीन.—६ त. तोडितां तुदाते०. दे. तुटातें. पं. तोडिलें तुटतें जोडिलें जड लें ।—७ प. नाहीं.

॥ १९६२ ॥

होतीं नेणों जालीं कठिणें कठीण । जवळी च मन मनें ग्वाही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी होतों सोई सांडिला मारग । घडिलें तें मग तिकून हीं ॥ ध्रु. ॥
निश्चिंतीनें होते पुढिलांची सांडी । न चाली ते कोंडी मायबापा ॥ २ ॥
आह्मां नाहीं त्यांचा घडिला आठव । त्यांचा बहु जीव विसुरला ॥३॥
तुका ह्मणे जालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आह्मांकूनि ॥ ४ ॥

॥ १९६३ ॥

आतां करावा कां सोंस वांयांविण । लटिका चि सीण मनासी हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असेल तें कळों येईल लौकरी । आतां वारकरी आल्यापाठीं ॥ ध्रु. ॥
बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥ २ ॥
चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥ ३ ॥
तुका ह्मणे आसे लागलासे जीव । ह्मणऊनि कींव भाकीतसें ॥ ४ ॥
॥ १९ ॥

॥ १९६४ ॥

भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥ ध्रु. ॥
मार्गी चालतां । श्रमलेती येतां जातां ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ॥ ३ ॥

---

१ पं. नेणें. त. जाली नेणों.—२ पं निश्चितीनें.—३ पं. "कां" नाहीं.

॥ १९६५ ॥

घालूनियां ज्योती । वाट पाहें दिवसराती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बहु उताविळ मन । तुमचें व्हावें दरुषण ॥ ध्रु ॥

आलों बोळवीत । तैसें या चि पंथें चित्त ॥ २ ॥

तुका ह्मणे पेणी । येतां जातां दिवस गणीं ॥ ३ ॥

॥ १९६६ ॥

आजि दिवस धन्य । तुमचें जालें दरुषण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ॥ ध्रु ॥

आइकतों मनें[1] । करूनि सादर श्रवण ॥ २ ॥

तुका ह्मणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥ ३ ॥

॥ १९६७ ॥

बोलिलीं तीं काय । माझा बाप आणि माय ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें सांगा जी झडकरी । तुह्मी सखे वारकरी ॥ ध्रु ॥

पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥ २ ॥

तुका ह्मणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥ ३ ॥

॥ १९६८ ॥

काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ॥ ध्रु ॥

फेडिलें मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥ २ ॥

तुका ह्मणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १९६९ ॥

आजिचिया लाभें ब्रह्मांड ठेंगणें । सुखी जालें मन कल्पवेना ॥ १ ॥

---

१ त. पं. मनें.

॥ ध्रु. ॥ आर्तभूत माझा जीव जयांसाटीं । त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें ॥ ध्रु ॥

वाटुली पाहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ॥ २ ॥
माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होइल समाचार सांगती तो ॥ ३ ॥
तुका ह्मणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ॥ ४ ॥

॥ १९७० ॥

आजि बरवें जालें । माझें माहेर भेटलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥ ध्रु ॥
धन्य जालों आतां । क्षेम देऊनियां संतां ॥ २ ॥
इच्छेचें पावलों । तुका ह्मणे धन्य जालों ॥ ३ ॥

॥ १९७१ ॥

वोरसोनि येती । वत्सें धेनुवेच्या चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझा केराया सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ॥ ध्रु ॥
स्नेहें भूक तान । विसरती जाले सीण ॥ २ ॥
तुका ह्मणे कौतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥ ३ ॥

॥ १९७२ ॥

आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओव्या ॥ १ ॥
सांगितला आधीं आइकों निरोप । होइल माझा बाप पुसे तो तें ॥२॥
तुका ह्मणे माझे सखे वारकरी । आले हे माहेराहून आजि ॥ ३ ॥

---

१ त. निरसला पं. मिवालें.—२ दे. त. फळलें.—३ पं. देखिला—४ पं वत्स.—५ पं. कराया.—६ पं. पुसे तो ; चि. दे. पुसें तों.वें.

॥ १९७३ ॥

आमुप जोडल्या सुखाचिया रासी।पार त्या भाग्यासी नाहीं आतां ॥१॥

काय सांगों सुख जालें आलिंगनें[1] । निवाली दर्शनें कांति माझी ॥ २ ॥

तुका ह्मणे योंच्या[2] उपकारासाटीं । नाहीं माझे गांठी कांहीं एक ॥३॥

॥ १९७४ ॥

पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हें ॥ १ ॥

जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेइन पायवणी धोवोनियां ॥ २ ॥

तुका ह्मणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ॥ ३ ॥

*पत्राचे अभंग समाप्त । ३६ । १९ । ११ ॥ ६६ ॥

॥ १९७५ ॥

मना एक करीं । ह्मणें[3] जाईन पंढरी ।

उभा विटेवरी । तो पाहेन[4] सांवळा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ करीन सांगसी[5] तें काम । जरी जपसी हें नाम ।

नित्य वाचे राम । हरि कृष्ण गोविंदा[6] ॥ ध्रु ॥

लागें[7] संतांचिया पायां । कथे उल्हास गावया ।

आलों मागावया । शरण देईं उचित ॥ २ ॥

नाचे रंगीं[8] वाहें टाळी । होय सादर ते काळीं ।

तुका ह्मणे मळी । सांडूनियां अंतरीं[9] ॥ ३ ॥

॥ १९७६ ॥

न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागरीं[10] त्रिपुटी ।

---

१ दे. आलिंगन.—२ पं. त्याच्या.—३ दे. त. ह्मणे. पं. ह्मणे मी जाईन०.—४ पं. पाहिन.—५ दे. सांगती.—६ पं. गोविंद.—७ पं. लागन.—८ पं. रंगें.—९ पं. अंतरींची.—१० पं. क्षीरसागरा.—* संतांबरोबर पाठविल्या पत्राचे अ० ३६; या पत्राच्या उत्तराच्या मार्गप्रतीक्षेचे अ० १९; व संत परत आले त्यांची भेट झाली ते अभंग ११; एकंदर अभंग ६६.

जाय तेथें[1] दाटी । वैष्णवांची आंवोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाविक गे माये भोळें[2] गुणाचें । आवडे तयाचें नाम घेतां तयासी ॥ ध्रु ॥
जो नातुडे कवणिये परी । तपें दानें व्रतें थोरी ।
ह्मणतां[3] वाचे हरि । राम कृष्ण गोविंदा[4] ॥ २ ॥
चौदा भुवनें जया पोटीं । तो राहे भक्तांचिये कंठीं ।
करूनियां साटी । चित्त प्रेम दोहींची[5] ॥ ३ ॥
जया रूप ना आकार । धरी नाना अवतार ।
घेतलीं हजार । नांवें ठेवूनि आपणां ॥ ४ ॥
ऐसा भक्तांचा ऋणी । पाहातां आगमीं पुराणीं ।
नाहीं तुका ह्मणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ॥ ५ ॥

॥ १९७७ ॥

स्वल्प वाट[6] चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ॥ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी आह्मी खेळीमेळीं । गदा रोळी आनंदें ॥ ध्रु ॥
ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे हे चि नीट । जवळी वाट[7] वैकुंठा ॥ ३ ॥

॥ १९७८ ॥

आनंदाच्या कोटी । सांटवल्या आह्मां पोटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम[8] चालिला प्रवाहो । नामओघ लवलाहो ॥ ध्रु ॥
अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥ २ ॥
थडी आहिक्य परत्र । तुका ह्मणे सम तीर ॥ ३ ॥

---

१ त. जेथें.–२ पं. भोळ्या.–३ पं. वाचे ह्मणतां हरि०. त० ह्मणतां वाचे हरि०.–४ पं. गोविंद.–५ पं. राहिची.–६ पं. वाटे.–७ पं. वाटे वैकुंठ.–८ पं. प्रेमा.

॥ १९७९ ॥

चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्त्वता ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ॥ ध्रु ॥

जे गी त्याच्या वाचें । कांहीं सोडिलें गाठीचें ॥ २ ॥

तुका ह्मणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ॥ ३ ॥

॥ १९८० ॥

सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंकी जन ॥ ध्रु ॥

विंचु हाणी नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥ २ ॥

तुका ह्मणे जाती । नरका पाउलीं चालती ॥ ३ ॥ ॥ ६ ॥

॥ स्वामींनीं स्त्रीस उपदेश केला ते अभंग ॥ ११ ॥

॥ १९८१ ॥

पिंकल्या[3] सेताचा आह्मां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सत्तर टके बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजिवरी ॥ ध्रु ॥

हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज । माजघरीं बाजे[4] बैसलासे ॥ २ ॥

मज यासी भांडतां जाब नेदी बळें । ह्मणे एका[5] वेळे घ्याल वांटा ॥ ३ ॥

तुका ह्मणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावें काय कोठें ॥ ४ ॥

॥ १९८२ ॥

कारितां विचार अवघें एक राज्य[6] । दुजा कोण मज पाठी घाली ॥ १ ॥

---

१ दे. "जेर्णो" (जणों!).—२ दे. हाणें.—३ पं. केल्या.—४ त. बाज.—५ पं. एक वेळें.—
६ त. राज.

॥ ध्रु. ॥ कोण्या रीती जावें आली वो पळोनि । मोकळे अंगणीं मार्गे पुढें ॥ ध्रु ॥

काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती योचे पाठी ॥ २ ॥

कोठें याची करूं गेलों[3] कुळवाडी । आतां हा न सोडी जीवें आह्मां ॥ ३ ॥

होऊनि बेबाख[4] येथें चि राहावें । देईल तें खावें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १९८३ ॥

नागवूनि एकें नागवीं च केलीं । फिरोनियां आलीं नाहीं येथें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भेणें सुती कोणी न घेती पालवीं । करूनियां गोवी निसंतान ॥ ध्रु ॥

एकें तीं गोविलीं घेऊनि जमान । हांसतील जन लोक तयां ॥ २ ॥

सरले तयांसी घाली वैकुंठीं । न सोडी हे साटी जीवें[6] जाली ॥ ३ ॥

तुका ह्मणे जालों जाणोनि नेणतीं । सांपडलों हातीं याचे आह्मी ॥ ४ ॥

॥ १९८४ ॥

आतां तूं तयास होईं वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जरूर हें जालें मँज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ॥ ध्रु ॥

बरें र्म्या तुझिया जीवाचें तें काय । व्हावें तें हें पाहें विचारूनि ॥ २ ॥

तुज मज तुटी नव्हे या विचारें । साहित लेंकुरें राहों सुखें ॥ ३ ॥

तुका ह्मणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ॥ ४ ॥

॥ १९८५ ॥

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीववित्ता साटी केली ॥ १ ॥

---

१ त. मोकळा. दे. मोकळ.—२ दे. याच.—३ दे केलों—४ पं. बोख.—५ पं. घालितो —६ पं. जाली जीवें.—७ पं. तुज.—८ तं. पं. मा.—९ दे. हें तें.—१० पं. लेकुरें.

॥ ध्रु. ॥ न ह्मणावें कोणी माझें हें करणें । हुकुम तो येणें देवें केला ॥ ध्रु ॥
करूनि मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥ २ ॥
पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आह्मां ॥ ३ ॥
तुका ह्मणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥ ४ ॥

॥ १९८६ ॥

नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें [1]त्यांस त्यांचें आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुला तूं[2] गळा घेई उगवूनि । चुकवीं जाचणी गर्भवास ॥ ध्रु ॥
[3]ऐवेंज देखोनि बांधितील गळा । ह्मणोनि निराळा पळें[4]तसें ॥ २ ॥
देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ॥ ४ ॥

॥ १९८७ ॥

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें जालीं मज ॥ ध्रु ॥
आस निरसूनि कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥ २ ॥
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनि । पावसील धनी परमानंद ॥ ३ ॥
तुका ह्मणे थोर चुंकती[5] सायास । भव[6]बंधपाश तुटोनियां ॥ ४ ॥

॥ १९८८ ॥

ऐक हें सुख होईल दोघांसी । सोहळा[7] हे ऋषि करिती देव ॥ १ ॥

---

१ पं. त्यांचें त्यांस.–२ पं. तो.–३ दे. त. अवेज.–४ दे. त. पं. पळतुसें: ५ पं. चुकती वो सत्यास ।.–६ दे. त. भवबंद पाश. ७ पं. सोहळे.

॥ ध्रु. ॥ जडितविमानें बैसविती मानें । गंधर्वांचें गाणें नामघोष ॥ ध्रु. ॥
संत महंत सिद्ध येतील सामोरे । सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥ २ ॥
आलिंगूनि लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तया सुखा वर्णूं काय । जेव्हां बापमाय देखें डोळां ॥ ४ ॥

॥ १९८९ ॥

देव पाहावया करीं वो सायास । न धरीं हे आस नाशिवंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दिन शुद्धे सोम सकाळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥ ध्रु. ॥
द्विजां पाचारूनि शुद्ध करीं मन । देई वो हें दान यथाविध ॥ २ ॥
नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी अहि आह्मां ॥ ४ ॥

॥ १९९० ॥

सुख हें नावडे आह्मां कोणी बळें ॥ नेणसी अंधळे जालीशी तूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥ ध्रु. ॥
द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आह्मांसी पाषाणाहूनि हीन ॥ २ ॥
सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां जवळी च अहि । सुख दुःख सहि पांडुरंग ॥ ४ ॥

॥ १९९१ ॥

गुरुरूपे मज बोलविलें देवें । होईल हें ध्यावें हित कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं अंतां ॥ ध्रु. ॥

---

१ पं. लोळें.–२ पं., मायबाप.–३ पं. देखों.–४ पं. नाशिवंत.–५ पं. सोम शुद्ध.–६ पं. कोण्पा.–७ दे. अंधळें.–८ पं. आहे.–९ पं. तें.–१० पं. हुजा.

होईं बळकट घालूनियां कास । हा चि उपदेश तुज आतां ॥ २ ॥
सडा संमार्जन तुळसीवृंदावन । अतीतपूजन ब्राह्मणाचें ॥ ३ ॥
वैष्णवांची दासी होईं सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥ ४ ॥
पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥ ५ ॥
तुका ह्मणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ॥ ६ ॥
॥ ११ ॥

॥ १९९२ ॥

खडा रवाळी साकर जाला नामाचा चि फेर ।
न दिसे अंतर । गोडी ठायीं निवडितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी आह्मी पांडुरंगा । भिन्न ऐसें काय सांगा ।
चाळविलें जगा । मी हें माझें यासाटीं ॥ ध्रु ॥
पायीं हातीं नाकीं शिरीं । हेम राहे अळंकारीं ।
मुसे आल्यावरी । काय निवडे वेगळें ॥ २ ॥
निजलिया लाभ हानी । तों च खरी ते स्वप्नीं ।
तुका ह्मणे दोन्ही । निवारलीं जागतां ॥ ३ ॥

॥ १९९३ ॥

आह्मी जाणों तुझा भाव । कैंचा भक्त कैंचा देव ।
बीजा नाहीं ठाव । कैंचें फळ शेवटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संपादिलें बहु रूप । कैंचें पुण्य कैंचें पाप ।
नव्हतों आह्मी आप । आपणासी देखिलें ॥ ध्रु ॥
एके ठायीं घरिच्याघरीं । न कळतां जाली चोरी ।

---

१ दे. गाळविलें.—२ त. लाजे.

तेथें[1] तें चि दुरी । जाणें येणें खुंटलें ॥ २ ॥
तुका ह्मणे धरूनि हातीं । उेर ठेविली मागुती ।
एकांतीं लोकांतीं । देवै[3]भक्तिसोहळा ॥ ३ ॥

॥ १९९४ ॥

कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुह्मांपुढें ।
सलगी लाडें कोडें । मज क्षमा करावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा ॥
आवडीनें सीमा । सांडविली मज हातीं ॥ ध्रु. ॥
घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें[4] बापासी न भ्यावें ।
काय म्यां सांगावें । आहे ठावें तुह्मासी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । प्रेम लोभ न संडावा ।
पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ॥ ३ ॥

॥ १९९५. ॥

बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा ।
घेइन प्रेमपान्हा । भक्तिसुख निवाडें ॥ १ ॥
यासी तुळे ऐसें कांहीं । दुजें त्रिभुवनीं नाहीं ।
काला भात दहीं । ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ ध्रु. ॥
निमिषार्ध[5] संतसंगति । वास वैकुंठीं कल्पांतीं ।
मोक्षपदें होती[6] । ते विश्रांति बापुडी ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि देई । मीतूंपणा खंड नाहीं ।

---

१ पं. तेथें चि दुसरी ।। जाणें०.–२ पं. उरी.–३ त. देवभक्त सोहळा.–४ त. बापें बाळासी निभावें. दे. "बाळें बापासी न भ्यावें" असें असतां मानून त. प्रमाणें केलें आहे.–५ त. पं. निमिष्यार्ध. दे. निमिशा अर्ध.–६ पं. येती । त्या विश्रांति०.

बोलिलों त्या नाहीं । अभेदाची आवडी ॥ ३ ॥

॥ ४ ॥

॥ १९९६ ॥

देवा आतां ऐसा करीं उपकार । देहाचा[1] विसर पाडीं मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरीं च हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ॥ ध्रु. ॥
ठाव देईं चित्ता राखें[2] पायांपाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ॥ २ ॥
आस[3] भय चिंता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा[4] ॥ ३ ॥
मागणें तें एक हें चि आहे आतां । नाम मुखीं संतसंग[5] देईं ॥ ४ ॥
तुका ह्मणे नको वरपंग देवा । घेईं[6] माझी सेवा भावशुद्ध ॥ ५ ॥

॥ १९९७ ॥

तुज न करितां काय नव्हे एक । हे तों सकळिक संतवाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेईं माझा भार करीं कइवार । उतरीं हा पार भवसिंधु ॥ ध्रु. ॥
उचित अनुचित पापपुण्यकाला । हों तों नये मला निवडितां ॥ २ ॥
कुंटित राहिली बोलतां बोलतां । पार न पवतां वाणी पुढें ॥ ३ ॥
पुसतां ही कोणां न कळे हें गुज । राखें आतां लाज पांडुरंगा ॥ ४ ॥
तुका ह्मणे बहु पाहिलें या जीवें । वर्म जालें जी ठावें नाम तुझें ॥ ५ ॥

॥ १९९८ ॥

मज त्याची भीड नुलंघवे देवा । जो ह्मणे केशवा दास तुझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज आवडती बहु तैसे जन । करिती कीर्तन कथा तुझी ॥ ध्रु. ॥
सांडूनियां लाज नाचेन त्यांपुढें । आइकतीं कोडें नाम तुझें ॥ २ ॥

---

१ दे. त. देहेचा.–२ दे. त. राख.–३ दे. असे भय आतां लाज०. त. आशाभय०.–४ पं. मज.–५ पं. तं. संतासंग. (संतां संग?).–६ पं. घ्यावी.–७ पं. हें.

न लगे उपचार होईन भिकारी । वैष्णवांच्या घरीं उष्टावळी ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाणों उचित अनुचित । विचारूनि हित तें चि करूं ॥४॥

॥ १९९९ ॥

तुझे पाय माझे राहियेले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालवितां ॥ ध्रु ॥
मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥ २ ॥
पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुण[2] शरीर सांडियेलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥ ४ ॥

॥ २००० ॥

जेथें जातों तेथें[3] तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥१॥
॥ध्रु.॥ चालों वाटे आह्मी तुझा चि आधार। चालविसी भार सर्व माझा ॥ध्रु॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों[4] देवा ॥२॥
अवघे[5] जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ४ ॥

॥ २००१ ॥

जालें पीक आह्मां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाली अराणुक अवघियांपासून । अवघा गेला सीण भाग आतां ॥ ध्रु ॥
अवघा जाला आह्मां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ॥२॥

---

१ दे. त. चाळविसां.–२ त. पं. त्रिगुणें.–३ त. ०तेथें तुझा च सांगाती.–४ पं. केलें.–
५ दे. अवघें.

अवघे चि आह्मी त्याला अळंकार । शोभलों हि फार अवघ्यांवरी ॥३॥
तुका ह्मणे आह्मी संदेवांचें दास । करणें न लगे आस आणिकांची ॥४॥
॥ ६ ॥

॥ २००२ ॥

साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्मरसें अलिप्त त्या ॥ध्रु॥
सांगणें तें नाहीं करणें आपण । मोलही वचन बाध जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां भांडवल हातीं । येरझारा खाती केवढ्रियें ॥ ३ ॥

॥ २००३ ॥

शुभ जाल्या दिशा अवघा चि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे ते ही ॥ध्रु॥
सुख दुःखाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आह्मांसी हें भलें । अवघे चि जाले जीव जंत ॥ ३ ॥

॥ २००४ ॥

पाप पुण्य दोन्ही वाहाती मारग । स्वर्गनर्कभोग यांचीं पेणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका आड एक न लगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ॥ ध्रु ॥
वाहाटीं पडिलें भरोनियां रितीं । होतील मागुतीं येतीं जातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी खेळतियांमधीं । नाहीं केली बुद्धि स्थिर पाहीं ॥ ३ ॥
॥ ३ ॥

---

१ पं. देवाचे. दे. सदेवांचे.–२ पं. प्रधान सेवकें.–३ दे. सांगणें तें तें नाहीं०.–४ पं. जाली.–५ पं. पांची खाणी.–६ पं. एका.

॥ २००५ ॥

हित तें हें एक राम कंठीं राहे । नाठविती देहभाव देहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा चि एक धर्म निज बीजवर्म । हें चि जाळी कर्मे केलीं मळ ॥ ध्रु. ॥
चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ॥ २ ॥
अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका ह्मणे गंगे मिळणी सिंधु ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २००६ ॥

माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियांचें मनीं आर्त माझें ॥ ध्रु. ॥
तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥ २ ॥
सुफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तो चि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरि ॥ ४ ॥

॥ २००७ ॥

आमुचें जीवन हें कथाअमृत । आणिक ही संतसमागम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वादरसें गोडी पदोपदीं ॥ ध्रु. ॥
धालिया ढेंकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥ २ ॥
पिकलें स्वरूप आलिया घुमरी । रासी तें अंबरीं न समाये ॥ ३ ॥
मोजितां तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ २००८ ॥

जोडिलें तें आतां न सरे सारितां । जीव बळी देतां हाता आलें ॥ १ ॥

---

१ त. पं नाठवती.—२ त. देहभाव देहीं.—३ त. दे. ऐसियाचे मनीं आर्त माझें.—४ त. सफळ.—५ पं. येथून.—६ दे. घुंमरि.

॥ ध्रु. ॥ संचित सारूनि बांधिलें धरणें । तुंबिलें जीवन साक्षेपें[1] हें ॥ ध्रु ॥
शीत उष्ण तेथें सुखदुःख नाहीं । अंतर सबाही एक जालें ॥ २ ॥
बीज तो अंकुर पत्र[2] शाखा फळें । प्राप्तबीज मुळें[3] अवघें नासे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नामीं राहिलीसे गोडी । बीजांच्या[4] परवडी होती जाती ॥ ४ ॥

॥ २००९ ॥

भक्तिभाव आह्मी बांधिलासे गांठी । सोदावितां[5] हाटीं घ्या रे कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखाचिया पेठे घातला दुकान । मांडियेले वान रामनाम ॥ ध्रु ॥
सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भवसिंधु ॥ २ ॥
मागें भाग्यवंत जाले थोर थोर । तिहीं केला फार हा चि सांटा ॥ ३ ॥
खोटें कुडें तेथें नाहीं घातपात । तुका ह्मणे चित्त शुद्ध करीं ॥ ४ ॥

॥ २०१० ॥

पर्जन्यें[6] पडावें आपुल्या स्वभावें । आपुलाल्या दैवें पिके भूमि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बीज तें चि फळ येईल शेवटीं । लाभहानितुटी ज्याची तया ॥ ध्रु ॥
दीपाचिये अंगीं नाहीं[7] दुजाभाव । धणी[8] चोर साव सारिखे चि ॥ २ ॥
काउळें ढोंपरा कंकर[9] तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जयां तैसा ॥ ४ ॥

॥ २०११ ॥

धीर तो कारण एकविधभाव । पतिव्रते नोंहो[10] सर्वभावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चातक हे जळ न पाहाती दृष्टी । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ ध्रु ॥

---

१ त. आक्षेप हें. दे. आक्षप हें.—२ त. आच्छा॥दिलें फळ । प्राप्तबीजें मूळ अवघें०.—३ पं. मूळ. ४ पं—बीजाची.—५ दे. त. साधावितां.—६ दे. त. पं. प्रजन्यें.—७ दे. "नाहीं" शब्द नाहीं.—८ पं. चोर आणि साव सारिखाची ।.—९ पं. कफकर तीतरा. त. कंकर तित्तरा. दे. कंकर तितरा. —१० त. नाव्हो.

सूर्यविकासिनी नेत्रे चंद्रामृत । वाट पाहे अस्तउदयाची ॥ २ ॥
धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेम प्राणेंसवेंसाटी । तैंरी च या गोष्टी विठोबाची ॥ ४ ॥
॥ ६ ॥

॥ २०१२ ॥

नामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणिकें दुरावलीं करितां खटपट । वांउगे बोभाट वर्माविण ॥ ध्रु. ॥
रामनामीं जिहीं धरिला विश्वास । तिंहीं भवपाश तोडियेले ॥ २ ॥
तुका ह्मणे केलें कळिंकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ॥ ३ ॥

॥ २०१३ ॥

वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साही अठरांजणीं चहूं वेदीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे कोणी दावा ग्रंथांचे वाचक । कँर्मठ धार्मिक पुण्यशील ॥ ध्रु. ॥
आदिनाथ शंकर नारद मुँनीश्वर । शुका ऐसा थोर आणिक नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे मुगुटमणी हे भक्ति । आणीक विश्रांति ओंरतिया ॥ ३ ॥

॥ २०१४ ॥

बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरि ॥ ध्रु. ॥
वाचेचा चाळक जाला दावी वेंर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥ २ ॥
तुका म्हणे घडे अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥ ३ ॥

॥ २०१५ ॥

संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परोवेंरीं लोळतसें ॥ १ ॥

---

१ दे. सूर्यविकाशनी .त.० विकासनी. पं. विकाशिनी.—२ पं. प्राणासंबसाटी.—३ पं. तरि च माझ्या गोष्टी.—४ दे. त. रामें.—५ पं. वाउगा.—६ त. कळिकाळा.—७ पं. कर्मिष्ठ.—८ दे. त. पं. मुनेश्वर.—९ दे. अरातिया.—१० पं. कर्मे.—११ त. परवरी.

॥ ध्रु. ॥ चरणींचे रज लागती अंगांस । तेणें बेत्ताळीस उद्धरती ॥ ध्रु ॥
उच्छिष्ट हें जमा करूनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ॥ २ ॥
तुका म्हणे मी[1] आणीक विचार । नेणें हें चि सार मानीतसें ॥ ३ ॥
॥ ४ ॥

॥ २०१६ ॥

एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे तृष्णा[2] वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥ ध्रु ॥
औटें[3] हात तुझा जागा । येर सिणसी वाउगा ॥ २ ॥
तुका म्हणे श्रम । एक विसरतां राम ॥ ३ ॥

॥ २०१७ ॥

आलें धरायेच[4] पेंठे । पुढें मागुतें[5] न भेटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होसी फजीती वरपडा । लक्ष चौऱ्यासीचे वेढां ॥ ध्रु ॥
नाहीं कोणांचा सांगात[6] । दुःख भोगितां आघात ॥ २ ॥
एका पाउलाची वाट । कोणां सांगावा बोभाट ॥ ३ ॥
जुंतिजेसी[7] घाणां । नाहीं मारित्या करुणा ॥ ४ ॥
तुका म्हणे हित पाहें । जोंवरि हें हातीं आहे ॥ ५ ॥

॥ २०१८ ॥

लाभ जाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी ।
मनुष्यदेहा ऐसी । उत्तमजोडी जोडिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेई हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें ।
जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥ ध्रु ॥

---

१ त. मज.—२ पं. काय तृष्णा.— ३ दे॰ ओठ.— ४ पं. भरायेचि. दे. धरायच पेंट.— ५ पं. मागुती.—६ पं. सांगत.—७ पं. जुतिजेसी.

घेउनि माप हातीं । काळ मोवी दिवस रातीं ।
चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥ २ ॥
हित सांवकारसें । ह्मणे करीन तें पिसें ।
हातीं काय ऐसें । तुका ह्मणे नेणसी ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०१९ ॥

सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनें धरिला अभिळास । मिठी घातली पायांस ॥ ध्रु ॥
होतां दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला । लाभें लाभ दुणावला ॥ ३ ॥

॥ २०२० ॥

झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जो हें माप तोंडें धरी । सळे जाली ते आवरी ॥ ध्रु ॥
जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ॥ २ ॥
तुका ह्मणे तळ । नाहीं पाहिसा सकळ ॥ ३ ॥

॥ २०२१ ॥

आह्मी बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय परिहाराचें काम । जाणे अंतरींचें राम ॥ ध्रु ॥
कळेंत्रियां काय चाड । माझी लोकांसी बडबड ॥ २ ॥
कारण सर्व एका । अवघें आहे ह्मणे तुका ॥ ३ ॥

---

१ त. पं. सावकारी.–२ पं. अभिलाष.

॥ २०२२ ॥

उमटे तें ठायीं । तुझे निरोपावें पायीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ॥ ध्रु ॥

भोजन भोजनाच्या काळीं । मागों करूनियां आळी ॥ २ ॥

तुका ह्मणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा ॥ ३ ॥

॥ २०२३ ॥

केला पण सांडी । ऐसियासी ह्मणती लंडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां पाहा विचारून । समर्थासी बोले कोण ॥ ध्रु ॥

आपला निवाड । आपण चि करितां गोड ॥ २ ॥

तुह्मीं आह्मीं देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ॥ ३ ॥

ऐसे धुरे उणें । मागें सरे तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ २०२४ ॥

न व्हावें तें जालें । तुह्मां आह्मांसी लागलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां हालमाकलमें । भांडोनियां काढूं वर्में ॥ ध्रु ॥

पाटोळ्यासर्वेसाटी । दिली रेंगटयाची गांठी ॥ २ ॥

तुका ह्मणे हरी । आणूनियां करिन सरी ॥ ३ ॥

॥ २०२५ ॥

पतितमिरासी । ते म्यां धरिली जीवेंसी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ॥ ध्रु ॥

पावनाचा ठसा । दावीं मज तुझा कैसा ॥ २ ॥

---

१ दे. आपणें.–२ त. ऐसें. दे. पं. आसे.–३ पं. आह्मा तुह्मासी.–४ पं. पाटोळ्यासंबसाटी.–५ पं. रकटयाची.–६ दे. पावणांचा. त. पावणाचा.

वीव तुका ह्मणे जालें । रोख पाहिजे दाविलें ॥ ३ ॥

॥ २०२६ ॥

करितां वेरझारा । उभा न राहासी वेव्हारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे तों झोंडाईचे चाळे । काय पोटीं तें न कळे ॥ ध्रु ॥
ओरोगुनी मुग । बैसलासी जैसा बग ॥ २ ॥
तुका ह्मणे किती । बुडविलीं आळवितीं ॥ ३ ॥

॥ २०२७ ॥

नाहीं देणें घेणें । गोंवी केली अभिमानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कां हो निवडूं नेदां । पांडुरंगा येवढा धंदा ॥ ध्रु ॥
पांचांमधीं जावें । थोड्यासाटीं फजित व्हावें ॥ २ ॥
तुज ऐसीं नाहीं । पांडुरंगा आह्मी कांहीं ॥ ३ ॥
टाकूं तो वेव्हार । तुज बहु करकर ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां । निवडूं संतां हें देखतां ॥ ५ ॥ ॥ ९ ॥

॥ २०२८ ॥

सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको पृथकाचे भरी । पडों एक मूळ धरीं ॥ ध्रु ॥
पाणचोऱ्याचें दार । वरिल दाटावें तें थोर ॥ २ ॥
वशें जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ॥ ३ ॥
एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ॥ ४ ॥
तुका ह्मणे धांवा । आहे पंढरी विसांवा ॥ ५ ॥

---

१ प. "वाम" नाहीं.–२ दे. त. आरगुगी.–३ पं. गोंवा केला अभिमाने.–४ दे. त. पं. वोल्हावे.–५ पं. पृथुकाचे.–६ पं. पानचोऱ्याचें तें द्वार ।.–७ दे. त. पं. वश्य.– ८ दे. पं. फिटे

॥ २०२९ ॥

करूं याची कथा नामाचा गजर । आह्मां संवसार काय करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तयाभेणें कळिकाळ ॥ ध्रु ॥
आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥ २ ॥
तुका ह्मणे करूं ऐसियांचा[1] संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥ ३ ॥
॥ २ ॥

॥ २०३० ॥

काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ॥ ध्रु ॥
काय उंदीर नाहीं[2] धांवीं । राख लावी गाढव ॥ २ ॥
तुका ह्मणे सुसर जळीं । काउळीं कां न न्हाती ॥ ३ ॥

॥ २०३१ ॥

मदें मातलें नागवें नाचे । अनुचित वाचे बडबडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट ॥ ध्रु ॥
आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ॥ २ ॥
तुका ह्मणे कळों येईल तो भाव । अंगा[3]वरि घाव उमटतां ॥ ३ ॥
॥ २ ॥

॥ २०३२ ॥

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥ ध्रु ॥
अमृतें सागर भरवती[4] गंगा । ह्मणवेळ उगा राहें काळा ॥ २ ॥

---

१ त. पं. ऐसियाचा.—२ पं नाहिंडवी ।.—३ दे. त. अंगावरिल.—४ दे. भरवे ती.

भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धिसिद्धी ॥ ३ ॥
स्छान मान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रह्मांडासी ॥ ४ ॥
तुका ह्मणे मोक्ष राहे ओलीकडे[1] । इतर बापुडें काय तेथें ॥ ५ ॥
॥ १ ॥

॥ २०३३ ॥

भाविकां हें वर्म सांपडलें निकें । सेविती[2] कवतुकें धणीवरि ॥ १ ॥
॥ धु. ॥ इच्छितील तैसा नाचे त्यांचे छंदें । वंदिती तीं[3] पदें सकुमारें ॥ धृ. ॥
विसरले मुक्ती भक्ति[4]अभिळासें । ओढत सारिसें सुख[5] आलें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं मागायाची आस । पांडुरंग त्यांस विसंबेना ॥ ३ ॥

॥ २०३४ ॥

भक्तां समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न सांगतां[6] ॥ १ ॥
॥ धु. ॥ सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ धृ. ॥
मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि[7] ते कांहीं न मागती[8] ॥ ३ ॥

॥ २०३५ ॥

प्रेमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ सकळ ही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ धृ. ॥
सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप माजी तया ॥ २ ॥
तुका ह्मणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥ ३ ॥
॥ ३ ॥

---

१ पं. ऐलीकडे.—२ दे. त. सेवितु.—३ पं. ते पदें सकुमार.—४ पं. अभिळाष.—५ दे. त. सुखा.—६ दे. संगतां.—७ पं. ठेवूनियां कांहीं.—८ दे. मगती.

॥ २०३६ ॥

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥ छ ॥
नष्टदुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥ २ ॥
कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये ॥३॥
तुका ह्मणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरिनाथा लावियेलें ॥ ४ ॥
॥ १ ॥

॥ २०३७ ॥

काळ जवळि च उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कैसा हुशार सावध्र राहीं । आपुला तूं अपुलेठायीं ॥ छ ॥
काळ जवळिच उभा पाहीं । नेदि कोणासि देऊं कांही ॥ २ ॥
काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ॥ ३ ॥
काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हे ॥ ४ ॥
तुका ह्मणे काळा । कर्म मिळेतें तें जाळा ॥ ५ ॥ ॥ १ ॥

॥ २०३८ ॥

दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्यलाभ पुण्य त्याचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकांवारि ॥ छ ॥
मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचा । प्रीती आदर करा साचा ॥ ३ ॥

॥ २०३९ ॥

साहोनियां टांकीघाये । पाषाण देव चि जाला पाहें ॥ १ ॥

---

१ दे. आनु. पं. अनु.—२ पं. तुज.—३ पं. मिळत.

॥ ध्रु. ॥ तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ॥ ध्रु ॥
बाण शस्त्र साहे गोळी । [1]शूरां ठाव उंच स्थळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सती । [2]अग्न न देखे ज्या रीती ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २०४० ॥

तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग [3]आत्मैपणें ।
नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ।
भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एक चि [4]पैणें ।
विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिलीं । भागलीं नुठित तेणें ॥ १ ॥
॥ ध्रु. आतां त्यांसीं काय चाले माझें बळ । जालोंसें दुर्बळ सत्त्वहीन ।
दग्ध पट दिसे संगीति बरवंट । काय त्याचें कारण ॥ ध्रु ॥
आळसें दृष्टी न पाहे आपुलें । एक चि देखिलें सर्वरूप ।
मानामान तेथें [5]खुंटोनि राहिलें । [6]पिशुन तो कोण बाप ।
ज्योति ना अंधार अवघा एकंकार । तेथें काय पुण्यपाप ।
विठ्ठलावांचुनि कांहीं च नावडे । वेगळाल्या भावें रूप ॥ २ ॥
बळबडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ।
सुखदुःखाची वार्ता नाइके । अंतरलों दुरी तया ।
मीतूंपण[7]निष्काम होऊनि । राहिलों आपुलिया ठायां ।
तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका ह्मणे देवराया ॥ ३ ॥ ॥ १ ॥

॥ २०४१ ॥

कथा [8]पुराण ऐकतां । [9]झोपें नाथिलें तत्त्वता ।

---

१ दे. सुरा. त. पं. शुरा.—२ त. "अगन" असें मागून केलें आहे.—३ त. आत्मैपणें. दे. "आत्मैपणें" असता मागून "आत्मपणें" केलें आहे. पं. आपणें.—४ प. पेणं.—५ पं. दुरोनि.—६ दे. त. पिसुन. पं. पिसुण.—७ दे. पं. निःकाम.—८ पं. पुराणें.—९ दे. "झोंप नाथिलि" असता मागून "झोपें नाथिलें" असें केलें आहे. त. झोपें नाथिला.

खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती ।
जाले जाणते जो चित्तीं । कांहीं नेघे आपुला ॥ ध्रु ॥
उदक लावितां न धरे । चिंता करी केव्हां सरे ।
जाऊं नका धीरें । ह्मणे करितां टेवाळ्या ॥ २ ॥
जवळी गोंचिड क्षीरा । जैसी कमळणी दर्दुरा ।
तुका ह्मणे दुरा । देशत्यागें तयासी ॥ ३ ॥

॥ २०४२ ॥

संदेह बाधक आपआपणयांतें । रज्जुसर्पवत भासतसे ।
भेऊनियां काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपण चि तारी आपण चि मारी । आपण उद्धरी आपणयां ।
शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाहें मोकळिया ॥ ध्रु ॥
पापपुण्य कैसे भांजिले अंक । दशकाचा एक उरविला
जाणोनियां काय होतोसी नेणता । शून्यां ठाव रिता नाहीं नाहीं ॥ २ ॥
दुरा दृष्टी पाहें न्याहाळूनि । मृगजळा पाणी न ह्मणें चाडा ।
धांवतां चि फुटे नव्हे समाधान । तुका ह्मणे जाण पावे पीडा ॥ ३ ॥
॥ २ ॥

॥ २०४३ ॥

कथे उभा अंग राखेल जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें तो पातकी न येतां च भला । रणीं कुचराला काय चाले ॥ध्रु॥

---

१ पं. तळमळी.—२ पं. टवाळ्या.—३ त. विण घायें कैसें लोळतसें. दे. असेंच असतां मागून "मारें घायें विण लोळतसे" असें केलें आहे. पं. घायें विण कैसें०.—४ दे. आपणें. पं. "आपण उद्धरी" याबद्दल "आपण चि उद्धरी"—५ पं. भाजिले.—६ दे. त. अख. पं. अंख. —७ त. शून्याचा ठाव नाहीं जाला।. पं. शून्याचा ठाव रिता नाहीं।.—८ त. सावधान.—९ दे. राखे.—१० त. पं. येता.—११ पं. जालें.

कथे बैसोनी आणीक चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐलपैल ते थडीचे । बुडतील साच मध्यभागीं ॥ ३ ॥

॥ २०४४ ॥

नावडे ज्या कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो असे जवळी गोचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरी ॥ ध्रु. ॥
नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥ २ ॥
तुका ह्मणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥ ३ ॥

॥ २०४५ ॥

जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसा पाहे चर्मदृष्टि । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥ ध्रु. ॥
कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥ २ ॥
त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २०४६ ॥

दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ ॥ ध्रु. ॥
तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥ ३ ॥
॥ ४ ॥

॥ २०४७ ॥

परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणिक नांवांचीं थोडीं ।

१ पं. कथे बैसोनिया आणिक करी चर्चा ।—२ पं. "ते" नाहीं—३ पं. बऱ्या.—४ दे. ठायें.—५ त. चुद्रीदाटी. पं. चद्रीदष्टी दे. "चद्रिदाष्टी" असतां "चर्मद्रिष्टि" केलें आहे.—६ पं दाहीं. दिशा०.—७ पं, नावडे. चि.

एक तीं कांतिवें उभविलीं ढवळारें । एकाचिया कुड मेडी ।
एक दीनरूप आणिती मोळिया । एक ते बांधोनि माडी ।
अवघियां बाजार एक चि जाला । मांविकलीं आपुल्या पाडीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडीतसे ॥ ध्रु ॥
एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवांचे खडे ।
एक समर्थ दुबळा घरीं । फार मोलाचे थोडे ।
एक झगझग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे ।
सभाग्य संपन्न आपुलाले घेरीं । मायेक दैन्य बापुडें ॥ २ ॥
एक नामें रूपें सारिख्या असतीं । अनेकप्रकार याती ।
ज्याचिया संचितें[3] जैसें आलें पुढें । तयाची तैसी चं[4] गति ।
एक उंचपदीं बैसोनि[5] सुखें । दास्य करवी[6] एका हातीं ।
तुका ह्मणे कां मानिती सुख । चुकलिया वांयां खंती ॥ ३ ॥ ॥ १ ॥

॥ २०४८ ॥

नाहीं आह्मां शत्रु सासुरें[7] पिशुन[8] । दाटलें हें घन माहियेर ॥ १ ॥
॥ धु. ॥ पाहें तेथें पांडुरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया ॥ ध्रु ॥
लज्जा भय कांहीं आह्मां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळगनी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी सदैवाचीं बाळें । जालों लडिवाळें सकळांचीं ॥ ३ ॥

॥ २०४९ ॥

गर्भी असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा ॥ १ ॥
॥ धु. ॥ कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥ ध्रु ॥
सर्प पिलीं वितां चिं[9] खाय । वांचलिंयां[10] कोण माय ॥ २ ॥

---

१ दे. एक तें कातिवें पं. एक तें कितीची.—२ पं. परी । मायेक दैन्यवाणें बापुडें.—३ पं. संचितीं.—४ पं. " च " नाहीं.—५ दे त. पं. बैसउनी.—६ पं. कराविती.—७ पं. सोइरें.—८ दे. त. पं. पिसुन.—९पं. " चि" नाहीं.—१० पं. वांचवित.

गगनीं लागला कोसेरा[1] । कोण पुरवी तेथें[2] चारा ॥ ३ ॥
पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥ ४ ॥
तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥ ५ ॥

॥ २०५० ॥

न म्हणे कवणां सिद्ध साधक गंव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ॥ १ ॥
॥ धु. ॥ ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावीं तुझें ध्यान पांडुरंगा ॥ध्रु॥
गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावी ॥ २ ॥
देईं चरणसेवा भूतांचें भजन । वर्णा अभिमान सांडवूनि ॥ ३ ॥
आशापाश माझी तोडीं माया चिंता । तुजविण व्यथा नको कांहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सर्व भाव[3] तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ॥ ५ ॥

॥ २०५१ ॥

अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तें च[4] ठेलें ॥ १ ॥
॥ धु. ॥ काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ॥ ध्रु ॥
लोह लागे परिसा अंगीं । तो ही भूषण जाला जगीं ॥ २ ॥
सरिता ओहळा[5] ओघा । गंगे[6] मिळोनि जाल्या गंगा ॥ ३ ॥
चंदनाच्या वासें । तरु[7] चंदन जाले स्पर्शें ॥ ४ ॥
तुका जडला[8] संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥ ५ ॥ ॥ ४ ॥

॥ २०५२ ॥

ऐशा भाग्यें जालों । तरी धन्य जन्मा आलों ॥ १ ॥
॥ धु. ॥ रुळें तळीले[9] पायरी । संत पाय देती वरी ॥ ध्रु ॥

१ दे. कोसरा –२ दे. त. वेथा.–३ पं. भावें –४ पं. "च" नाही.–५ पं. वोहळ. दे. वोहळा त. वोहोळा.–६ पं. मिळोनियां जाल्या गंगा.–७ पं. तरुवर.–८ पं. जवळा. दे. जळा.–९ पं. तळील.

प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखें । तया हरतील दुःखें ॥ ३ ॥

॥ २०५३ ॥

करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ॥ ध्रु ॥
ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे गोड । तेथें पुरे माझें कोड ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २०५४ ॥

वेद जया गाती । आह्मां तयाची संगति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाम धरियेलें कंठीं । अवघा सांटविला पोटीं ॥ ध्रु ॥
ॐकाराचें बीज । हातीं आमुचे तें निज ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु मोटें । अंगुरणियां धाकुटें ॥ ३ ॥

॥ २०५५ ॥

तूं[२] श्रीयेचा पति । माझी बहु हीनें[३] याती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ॥ ध्रु ॥
मांझ्या[४] दीनपणां पार । नाहीं बहु तूं उदार ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ॥ ३ ॥

॥ २०५६ ॥

मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ म्या तों पसरिला हात । करीं आपुलें उचित ॥ ध्रु ॥

---

१ पं. आणुरेणुयां.—२ पं. तुझी तरी हो श्रीपति. । दे. मूळांतल्याप्रमाणेंच होतें तें बागून पं. प्रतीप्रमाणें केलें आहे.—३ पं. दीन.—४ पं. माझा दीनपणा फार ।.

आम्ही घ्यावें नाम । तुम्हां समाधान काम ॥ २ ॥
तुका म्हणे देवराजा । वाद खंडीं तुझा माझा ॥ ३ ॥

॥ २०५७ ॥

तुझे पोटीं वाव । व्हावा ऐसा माझा भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं वासनेसारिखें । प्राण फुटे येणें दुःखें ॥ ध्रु ॥
अहंकार खोटे । वाटे श्वापदांचे थाटे ॥ २ ॥
तुका म्हणे आई । हातीं धरूनि संग देई ॥ ३ ॥

॥ २०५८ ॥

दारीं परोवरी । कुडीं कवाडीं मी घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमच्या लागलों पोषणा । अवघे ठायीं नारायणा ॥ ध्रु ॥
नेदीं खाऊं जेवूं । हातींतोंडींचें ही घेऊं ॥ २ ॥
तुका म्हणे अंगीं । जडलों ठायींचा सलगी ॥ ३ ॥

॥ २०५९ ॥

मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ व्याला वाढविलें ह्मूण । मज सुख तुज सीण ॥ ध्रु ॥
माझें पोट धालें । तुझे अंगीं उमटलें ॥ २ ॥
तुका ह्मणे खेळें । तेथें[4] तुमचिया बळें ॥ ३ ॥

॥ २०६० ॥

जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ॥ ध्रु ॥
भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥ २ ॥

---

१ दे. ठाव.–२ दे. श्वापदांचीं थाटें. पं. श्वापदांची थाटे.–३ पं. कुटि.–४ पं. येथें.

तुका ह्मणे डोई । ठेवीं वेळोवेळां पायीं ॥ ३ ॥

॥ २०६१ ॥

आह्मी घ्यावें तुझें नाम । तुह्मी आह्मां द्यावें प्रेम ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ॥ ध्रु ॥

माझी डोई पायांवरी । तुह्मी न धरावी दुरी ॥ २ ॥

तुका ह्मणे केला । खंड दोघांचा विठ्ठला ॥ ३ ॥

॥ २०६२ ॥

वारिलें लिगाड । बहुदिसांचें हें जाड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ न बोलावें ऐसें केलें । कांहीं वाउगें तितुलें ॥ ध्रु ॥

जाला चौवांचार । गेला खंडोनि वेव्हार ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । करीन ते घ्यावी सेवा ॥ ३ ॥

॥ २०६३ ॥

पायरवे अन्न । मग करी क्षीदक्षीण[3] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसे होती घातपात । लाभे विण संगें थीत ॥ ध्रु ॥

जन्माची जोडी । वाताहात एके घडी ॥ २ ॥

तुका ह्मणे शंका । हित आड या लौकिका ॥ ३ ॥

॥ २०६४ ॥

आह्मां वैष्णवांचा । नेम काया मनें[1] वाचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ धीर धरूं जिवासाटीं । येऊं नेदूं लाभा तुटी ॥ ध्रु ॥

उचित समय । लाज निवारावें[2] भय ॥ २ ॥

---

१ पं. असों.–२ पं. धरावे.–३ त. क्षेदक्षीण.

तुका ह्मणे कळा । जाणों नेम नाहीं बाळा ॥ ३ ॥

॥ २०६५ ॥

उलंघिली लाज । तेणें साधियेलें काज ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सुखें नाचे पैलतीरीं । गेलों भवाचे सागरीं ॥ ध्रु ॥

नामाची सांगडी । सुखें बांधली आवडी ॥ २ ॥

तुका ह्मणे लोकां । उरली वाचा मारीं हाका ॥ ३ ॥

॥ २०६६ ॥

बैसलोंसें दारीं । धरणें कोंडोनि भिकारी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां कोठें हालों नेदीं । बरी सांपडली संदी ॥ ध्रु ॥

किती वेरझारा । मागें घातलिया घरा ॥ २ ॥

माझें मज नारायणा । देतां कां रे नये मना ॥ ३ ॥

भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ॥ ४ ॥

तुका ह्मणे नाहीं । लाज तुझे अंगीं कांहीं ॥ ५ ॥

॥ २०६७ ॥

जालों द्वारपाळ । तुझें राखिलें सकळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं लागों दिलें अंगा । आड ठाकलों मी जगा ॥ ध्रु ॥

करूनियां नीती । दिल्याप्रमाणें चालती ॥ २ ॥

हातीं दंड काठी । उभा जिवाचिये साटीं ॥ ३ ॥

बळ बुद्धी युक्ती । तुज दिल्या सर्व शक्ती ॥ ४ ॥

तुका ह्मणे खरा । आतां घेईन मुशारा ॥ ५ ॥

---

१ त. पुढीं.–२ पं. संधी.

॥ २०६८ ॥

फळाची तों पोटीं । घडे वियोगें ही भेटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावें चिंतन । सार तें चि आठवण ॥ ध्रु ॥
चित्त चित्ता ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । पावे अंतरींची सेवा ॥ ३ ॥

॥ १५ ॥

॥ २०६९ ॥

दुर्बळाचें कोण । ऐके घालूनियां मन ।
राहिलें कारण । तयावांचूनि काय तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें ।
न[1] संगतां ठावें । पडे चर्या देखोनि ॥ ध्रु ॥
काम क्रोध माझा देहीं । भेदाभेद गेले नाहीं ।
होतें तेथें कांहीं । तुज कृपा करितां ॥ २ ॥
हें तों नव्हे उचित । नुपेक्षावें शरणागत ।
तुका ह्मणे रीत । तुमची आह्मां न कळे ॥ ३ ॥

॥ २०७० ॥

आह्मी भाव जाणों देवा । न कळती तुझिया मावा ।
गणिकेचा[2] कुढावा । पतना न्यावा दशरथ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी म्यां काय गा करावें ॥ कोण्या रीती तुज पावें ।
न संगतां ठावें । तुह्मांविण न पडे ॥ ध्रु ॥
दोन्ही[3] फाकलिया वाटा । गोवी केली[4] घटापटा ।

---

१ पं. नसतां हें ठावें.।—२ पं. गणिकेचा करिशी कुडावा.।—३ पं. दोही.—४ दे. केला.

नव्हे धीर फांटा । आड रानें भरती ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे[1] डोळे । तुझे देखती हे चाळे ।
आतां येणें वेळे[2] । चरण जीवें न सोडीं ॥ ३ ॥

॥ २०७१ ॥

वेरझारीं जाला सीण । बहु केलें खेदक्षीण[3] ।
भांडणासी दिन । आजी येथें फावला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय भीड भार । धरूनियां लोकाचार[4] ।
बुडवूनि वेव्हार[5] । सरोबरी करावी ॥ ध्रु. ॥
आलें बहुतांच्या मना । कां रे न होसी शाहाणा ।
मुळींच्या वचना । आह्मी जागों आपुल्या ॥ २ ॥
तुका ह्मणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं ।
आं[6]तां नाहीं मधीं । उरी कांहीं राहिली ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०७२ ॥

कल्पतरूखालीं । फळें येती मागीतलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोलें ठाव ॥ ध्रु. ॥
द्यावें तें उत्तर । येतो प्रतित्[7]याचा फेर ॥ २ ॥
तुका ह्मणे मनीं । आपुल्या च लाभहानि ॥ ३ ॥

॥ २०७३ ॥

रंगलें या रंगें पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सावळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें[8] कैसे शोभा देती ॥ ध्रु. ॥

---

१ पं. " माझे " नाही.–२ पं. काळें. त. वेळें.–३ दे. क्षीदक्षीण. त. खेदक्षीण.–४ दे. त. लोकचार.–५ पं. व्यवहार.–६ दे. त. आतां नामधीं ।–७ पं. प्रीतीचा चि. त. प्रतीत्याचाची.–८ पं. अंगसंग.

पवित्र जालें तें न लिंपे विटाळा । नेदी बैसों[1] मेळा आडवरी ॥ २ ॥

तुका ह्मणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनियां ॥ ३ ॥

॥ २०७४ ॥

जगा काळ खाय । आह्मी माथां दिले पाय ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंगें[2] करी साहे ॥ ध्रु ॥

हरिच्या गुणें धाला । होता खात चि भुकेला ॥ २ ॥

तुका ह्मणे हळु । जाला कढत शीतळु ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०७५ ॥

ब्रह्मरस घेई काढा । जेणें[3] पीडा वारेल ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पथ्य नाम विठोबाचें । अणीक वाचे न सेवीं ॥ ध्रु ॥

भवरोगाऐसें जाय । आणीक काय क्षुल्लकें ॥ २ ॥

तुका ह्मणे नव्हे बाधा । अणीक[4] कदा भूतांची ॥ ३ ॥

॥ २०७६ ॥

अंगीं अनुभव जाला मज । संतरजचरणांचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥ ध्रु ॥

निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ॥ २ ॥

तुका ह्मणे भावसार[5] । करूनि फार मिश्रित ॥ ३ ॥

॥ २०७७ ॥

वैद्य एक पंढरिराव । अंतर्भाव तो जाणे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ रोगाऐशा द्याव्या वल्ली । लाणे जाली बाधा ते ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. मळा.—२ त. वेगें.—३ पं. तेणें.—४ पं. आणि कदा.०—५ पं. भवसार.

नेदी रुका वेचों मोल । पाहे बोल प्रीतीचे ॥ २ ॥
तुका ह्मणे दयावंता । सदा चिंता दीनांची ॥ ३ ॥

॥ २०७८ ॥

करितां कोणाचें ही काज । नाहीं लाज देवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरें करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधु ॥ ध्रु ॥
करूनि अराणूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ॥ २ ॥
बोले तैसी करणी करी । तुका ह्मणे एक हरि ॥ ३ ॥ ॥ ४ ॥

॥ २०७९ ॥

उभें चंद्रभागे तीरीं । कट धरोनियां करीं ।
पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा ।
संचिताचा ठेवा । जोडी हातीं लागली ॥ ध्रु ॥
रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे ।
मस्तक नावडे । उठों पायांवरोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम । ज्याचें नासी क्रोध काम ।
हरी भवश्रम । उच्चारितां वाचेसी ॥ ३ ॥

॥ २०८० ॥

आह्मां हें चि भांडवल । ह्मणों विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें तरों भवनदी । संगें वैष्णवांची मांदी ॥ ध्रु ॥
बाखराचें वाण । सांडूं हें जेवूं जेवण ॥ २ ॥

---

१ पं. नुठों.—२ दे. संग.

न लगे वारंवार । तुका ह्मणे वेरझार ॥ ३ ॥

॥ २०८१ ॥

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥ १ ॥
॥ धु. ॥ आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ ध्रु ॥
दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥ २ ॥
तुका ह्मणे वाटे । नको फुटों देऊं फांटे ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०८२ ॥

काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें[1] ॥ १ ॥
॥ धु. ॥ करी अक्षरांची आटी । एके कवडीच साटीं ॥ ध्रु ॥
निंदी कोणां स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भांड । जळो जळो त्याचें तोंड ॥ ३ ॥

॥ २०८३ ॥

मागणें तें मागों देवा । करूं भक्ती त्याची सेवा ॥ १ ॥
॥ धु. ॥ काय उणें तयापाशीं । रिद्धिसिद्धी ज्याच्या[2] दासी ॥ ध्रु ॥
कायावाचामन । करूं देवां[3] हें अर्पण ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभर । ज्यांच्यानें[4] हें चराचर ॥ ३ ॥

॥ २०८४ ॥

चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥ १ ॥
॥ धु. ॥ असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां[5] करी ॥ ध्रु ॥
अनाथाचा बंधु । असे[6] अंगीं हा संबंधु ॥ २ ॥

---

१ पं. सुणें.–२ पं. त्याच्या.–३ पं. देवासीअर्पण.–४ पं. त्याच्यानें.–५ दे. संगतां.–६ पं. अंगीं असे.

तुका ह्मणे भावें । देवा सत्ता राबवावें ॥ ३ ॥

॥ २०८५ ॥

कर्कशसंगति । दुःख उदंड फजिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं इह ना परलोक । मजुर दिसे[1] जैसें रंक ॥ ध्रु ॥
वचन सेंटा[2]वरी । त्याचें ठेवूनि धिक्का[3]री ॥ २ ॥
तुका ह्मणे पायीं बेडी । पडिली कपाळीं कुऱ्हाडी ॥ ३ ॥ ॥ ४ ॥

॥ २०८६ ॥

बीज पेरे[4] सेतीं । मग गाडेवरी वाहाती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांयां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥ ध्रु ॥
पाल्याची जतन । तरि प्रांतीं येती कण ॥ २ ॥
तुका ह्मणे आळा । उदक देतां लाभे फळा ॥ ३ ॥

॥ २०८७ ॥

जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळे झांकिलिया रवि । नाहीं ऐसा होय जेवीं[5] ॥ ध्रु ।
बहुथोड्या आड । निवारितां लाभे जाड ॥ २ ॥
तुका ह्मणे खरें । नेलें हातींचें अंधारें ॥ ३ ॥

॥ २०८८ ॥

मुळीं नेणपण । जाला तरी अभिमान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांयां जावें हें चि खरें । केलें तेणें चि प्रकारें ॥ ध्रु ॥
अराणूक नाहीं कधीं । जाली तरि भेदबुद्धि ॥ २ ॥

---

१ त. जालें.—२ पं. सेटावारी.—३ दे. त. धीकारी. पं. धी.कारी.—४ पं. परी.—५ पं. जीवीं.

अंतरली नाव । तुका ह्मणे नाहीं ठाव ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०८९ ॥

संवेसारसांते आले हो आइका । तुटीचें तें नका केणें भरूं ॥ १ ॥
॥ धृ. ॥ लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ॥ ध्रु ॥
शृंगारिलें दिसे न कळे अंतर । गोविला पदर उगवेना ॥ २ ॥
तुका ह्मणे खोटें गुंपतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ॥ ३ ॥

॥ २०९० ॥

सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळूहळू ॥ १ ॥
॥ धु. ॥ पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥ ध्रु ॥
वेचल्याचा पाहे वरावरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भरोनी शेवट तों ॥ ३ ॥

॥ २०९१ ॥

बुद्धिमंदा शिरीं । भार फजिती पदरीं ॥ १ ॥
॥ धृ. ॥ जाय तेथें अपमान । पावे हानि थुंकी जन ॥ ध्रु ॥
खरियाचा पाड । मार्गे लावावें लिगाड ॥ २ ॥
तुका ह्मणे करी । वर्म नेणें भरोवरी ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २०९२ ॥

पूर्वजांसी नर्का । जाणें तें एक आइका ॥ १ ॥
॥ धु. ॥ निंदा करावी चाहाडी । मनीं धरूनि आवडी ॥ ध्रु ॥
मात्रागमना ऐसी । जोडी पातकांची रासी ॥ २ ॥

१ पं. संसारसांते.–२ प. मोविला.–३ दे. बुद्धिमंद.–४ दे. त. पं. ह्मणी.

तुका ह्मणे वाट । कुंभपाकाची ते नीट ॥ ३ ॥

॥ २०९३ ॥

देहा लावी वात । पालव घाली जाली रात ॥ १ ॥

॥ धु. ॥ वेडी ते वेडी बहुत च वेडी । चाखतां गोडी चवी नेणे ॥ ध्रु ॥

कडिये मूल भोंवतें भोंये । मोकलुनि रडे धाये ॥ २ ॥

लेंकरें वित्त पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥ ३ ॥

आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे काई ॥ ४ ॥

तुका ह्मणे ऐसे जन । नर्का जातां राखे कोण ॥ ५ ॥

॥ २०९४ ॥

आवडीचें दान देतो नारायण । बांहे उभारोन राहिलासे ॥ १ ॥

॥ धु. ॥ जें जयासी रुचे तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ॥ ध्रु ॥

ठायीं पडिलिया तें चि लागे खावें । ठायींचें चि घ्यावें विचारूनि ॥२॥

बीज पेरूनियां तें चि घ्यावें फळ । डोरलीस केळें कैंचें लागे ॥ ३ ॥

तुका ह्मणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूं चि पाहीं शत्रु सखा ॥ ४ ॥

॥ २०९५ ॥

अडचणीचें दार । बाहेर माजी पैस फार ॥ १ ॥

॥ धु. ॥ काय करावें तें मौन्य । दाही दिशा हिंडे मन ॥ ध्रु ॥

बांहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ॥ २ ॥

नाहीं इंद्रियां दमन । काय मांडिला दुकान ॥ ३ ॥

सारविलें निकें । वरि माजी अवघें फिकें ॥ ४ ॥

---

१ दे. पं. "देहा लावी०" हें कडवें "वेडी ते वेडी०" या ध्रुवपदाच्या पुढें आहे.–२ दे. वेडी ते वेडी बहुत चि वेडी ।–३ पं. पुढत.–४ पं. जया.–५ दे. कैंचें.–६ पं. वारीर.

तुका ह्मणे अंतीं । कांहीं न लगे चि हातीं ॥ ५ ॥

॥ २०९६ ॥

लय लक्षूनियां जालों ह्मणती देव । तो ही नव्हे भाव सत्य जाणा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं । नको राहूं ते ही निश्चितीनें ॥ ध्रु ॥

तपें दानें काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥ २ ॥

कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥ ३ ॥

तुका ह्मणे जरी होईल निष्काम । तरि च होय राम देखे डोळां ॥ ४ ॥

॥ २०९७ ॥ ॥ ५* ॥

पुरली धांव कडिये घेई । पुढें पायीं न चलवीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंगे जिवलगे ॥ ध्रु ॥

अवघी निवारावी भूक । अवघ्या दुःख जन्माचें ॥ २ ॥

तुका ह्मणे बोलवेना । लावीं स्तनां ईश्वेरे[2] ॥ ३ ॥

॥ २०९८ ॥

जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां तूं चि बाह्यात्कारीं । अवघ्यापरी जालासी ॥ ध्रु ॥

नाहीं स्रमयासाचें काम । घेतां नाम आवडी ॥ २ ॥

तुका ह्मणे सर्वसांगे[3] । पांडुरंगे दयाळे ॥ ३ ॥

॥ २०९९ ॥

जेथें माझी दृष्टि जाय । तेथें पाय भावीन ॥ १ ॥

---

१ त. काई.–२ दे. त. पं. विश्वरें.–३ अं. सर्वसंगे. * दे. त. " ४ " हा अंक आहे, पण तो चुकला असावा.

॥ ध्रु. ॥ [1]असेन या समाधानें । पूजा मनें करीन ॥ ध्रु ॥

अवघा च अवघे देसी । [2]सुखरासी संपन्न ॥ २ ॥

तुका ह्मणे बंधन नाहीं । ऐसें काहीं तें करूं ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २१०० ॥

नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भला भला पुंडलिका । मानलासी जनलोकां ॥ ध्रु ॥

कोण्या काळें सुखा । [3]ऐशा कोण पावता ॥ २ ॥

अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥ ३ ॥

तुका ह्मणे धन्य जालें । भूमी वैकुंठ आणिलें ॥ ४ ॥

॥ २१०१ ॥

अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जीव देऊनियां बळी । अवघीं तारिलीं दुर्बळीं ।

केला भूमंडळीं । माजी थोर पवाडा ॥ ध्रु ॥

काहीं न [4]मगे यांची गती । [5]लुटविती जगा हातीं ॥ २ ॥

तुका ह्मणे भक्तराजा । कोण [6]वर्णी पार तुझा ॥ ३ ॥

॥ २१०२ ॥

प्रमाण हें त्याच्या बोला । देव भक्तांचा अंकिला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ न पुसतां जातां नये । खालीं बैसतां ही भिये ॥ ध्रु ॥

अवघा त्याचा [7]होतें । जीव भावा ही सहित ॥ २ ॥

वदे [8]उपचाराची वाणी । काहीं माग ह्मणऊनि ॥ ३ ॥

---

१ पं. असें तया समाधानें.–२ दे. सुख घेवविसी संपन्य. । त. अवघ्याविसीं संपन्न. ।–३ पं. ऐसा.–४ ब. मग.–५ तं. लुटविती.–६ पं. पार वर्णी.–७ पं होय ।. जीवभाव सहित.–८ पं. उपचारवाणी

उदासीनाच्या लागें । तुका ह्मणे धांवे मार्गें ॥ ४ ॥

॥ २१०३ ॥

कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धांवे सेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हळूहळू फेडी ऋण । होऊनियां रूपें दीन ॥ ध्रु ॥
होऊं न सके वेगळा । क्षण एक त्यां निराळा ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तिभाव । हा चि देवाचा ही देव ॥ ३ ॥

॥ २१०४ ॥

जाणे अंतरिंचा भाव । तो चि करितो उपाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे सांगावें मागावें । जीवें भावें अनुसरावें ।
अविनाश घ्यावें । फळ धीर धरोनि ॥ ध्रु ॥
बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी । एकीं लंघियेले गिरी ॥ ३ ॥

॥ २१०५ ॥

आह्मी नाचों तेणें सुखें । वाऊं टाळी गातों मुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ॥ ध्रु ॥
आह्मां जाला हा निर्धार । मागें तारिले अपार ॥ २ ॥
तुका ह्मणे संतीं । वर्म दिलें आह्मां हातीं ॥ ३ ॥

॥ २१०६ ॥

जाली निर्भर मानसीं । ह्मणऊनि कळलासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझे ह्मणविती त्यांस । भय चिंता नाहीं आस ॥ ध्रु ॥

---

१ पं. भगवी.—२ पं. रूप धरोनियां दीना. ।—३ पं. तो.—४ पं. बाळ.—५ पं. लंघियेली.

चुकविसी पाश । गर्भवासयातना ॥ २ ॥
तुझें जाणोनियां वर्म । कंठीं धरियेलें नाम ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेणें[1] सुखें । विसरलों जन्मदुःखें[2] ॥ ४ ॥ ॥ ७ ॥

॥ २१०७ ॥

नको दुष्टसंग[3] । पडे भजनामधीं भंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय विचार देखिला । सांग माझा तो विठला ॥ ध्रु ॥
तुज निषेधितां । मज न सोहे[4] सर्वथा ॥ २ ॥
एका माझ्या[5] जीवें । वाद करूं कोणासवें ॥ ३ ॥
तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्टजन ॥ ४ ॥
काय करूं एका । मुखें सांग ह्मणे तुका ॥ ५ ॥

॥ २१०८ ॥

विठल माझी माय । आह्मां सुखा[6] उणें काय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेतों अमृताची धनी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥ ध्रु ॥
क्रीडों वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंत । ठेवीं आह्मांपाशीं चित्त ॥ ३ ॥

॥ २१०९ ॥

भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर जाले ॥ १ ॥
॥ धु. ॥ हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठलाचे ॥ ध्रु ॥
महा दोषां आला त्रास । जन्ममरणां केला नास ॥ २ ॥
सहस्रनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ॥ ३ ॥

---

१ पं. " तेणें " नाहीं.—२ दे. जन्मदुःख.—३ दे. दुष्टसंग. त. दुष्टसंग.—४ पं. साह-वे.—५ त. माझा.—६ त. सुखें.

नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यावांचून ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥ ५ ॥ ॥ ३ ॥

॥ २११० ॥

पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥ १ ॥
॥ धृ. ॥ काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥ ध्रु ॥
स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा पूजन वैष्णवांचें ॥ २ ॥
थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी[1] जातां ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां रे सकुमार जालासी । काय जाब देसी यमदूतां ॥ ४ ॥

॥ २१११ ॥

कथा हें भूषण जनामध्यें सार । तेरले[2] अपार बहुत येणें ॥ १ ॥
॥ धृ. ॥ नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद ॥ ध्रु ॥
देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप जाला कुळीं वंशाचिये ॥ २ ॥
त्याची निंदा करी त्याची कुष्ठ वाणी । मुख संवदणी रजकाची ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम ध्यावें ॥ ४ ॥

॥ २११२ ॥

टाळघोळ सुख नामाचा गजर । घोषें जयजयकार[3] ब्रह्मानंदु ॥ १ ॥
॥ धृ. ॥ गरुडटके दिंडी पताकांचे भार । आनंद अपार ब्रह्मादिकां ॥ ध्रु ॥
आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहूनि भद्रजाति ॥ २ ॥
तेणें सुखें सुटे पाषाणां पाझर । नष्ट खळ नर शुद्ध होती ॥ ३ ॥
तुका ह्मणे सोपें वैकुंठासी जातां । रामकृष्ण कथा हे चि वाट ॥ ४ ॥
॥ ३ ॥

---

१ पं. जातां मरसी.—२ पं. उवरले अपार बहु येणें.।—३ दे. त. जेजेकार.

॥ २९१३ ॥

देखोवेखीं करिती गुरु । नाहीं ठाउका विचारु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्म तें न पडे ठायीं । पांडुरंगाविण कांहीं ॥ ध्रु ॥
शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणां हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सार । भक्ति नेणती गव्हार ॥ ३ ॥

॥ २११४ ॥

भाग्यवंत ह्मणों तयां । शरण गेले पंढरिराया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरले तरले हा भरवसा । नामधारकांचा ठसा ॥ ध्रु ॥
भुक्तिमुक्तीचें तें स्थळ । भोळेभाविकां[1] निर्मळ ॥ २ ॥
गाइलें पुराणीं । तुका ह्मणे वेदवाणी ॥ ३ ॥

॥ २११५ ॥

जैसें चित्त जयावरी । तैसें जवळी तें दुरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नं लगे द्यावा परिहार । या कोरडें उत्तर ।
असे अभ्यंतर । साक्षभूत जवळी ॥ ध्रु ॥
अवघें जाणे सूत्रधारी । कोण नाचे कोणे परी ॥ २ ॥
तुका ह्मणे बुद्धि । ज्योची[2] ते च तया सिद्धि ॥ ३ ॥

॥ २११६ ॥

नाहीं पाइतन भूपतीशीं दावां । धिग त्या कर्तव्या आगी लागो ॥ १ ॥
[3]मुंगियांच्या मुखा गजाचा आहार । न साहावे भार जाय जीवें ॥ २ ॥
तुका ह्मणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा ॥ ३ ॥

---

१ त. दे. भाविकनिर्मळ.—२ पं. ज्याची तया ते चि सिद्धि.।—३ पं. मुंग्यीचिया.

॥ २११७ ॥

तिन्ही लोक ऋणें बांधिले जयानें । सर्वसिद्धि केणें तेये घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचोहोटां घातला दुकान । मांडियेले वान आवडीचे ॥ ध्रु ॥
आषाढी कार्तिकी भरियेले हाट । इनाम हे पेंठ घेतां देतां ॥ २ ॥
मुक्ति कोणी तेथें हातीं नेघे फुका । लुटितील सुखा प्रेमाचिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे संतसज्जन भाग्याचें । अनंतां जन्मींचे सांटेकरी ॥ ४ ॥

॥ २११८ ॥

दुःखाचिये साटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पालवितो ॥ ध्रु ॥
जाणतियाहूनि नेणत्याची गोडी । आलिंगी आवडी करूनियां ॥ २ ॥
शीण घेऊनियां प्रेम देतो साटी । न विचारी तुटी लाभा कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे असों अनाथ दुबळीं । आह्मांसी तो पाळी पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २११९ ॥

आणीक मात माझ्या नावडे जीवासी । काय करूं यासी पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुखा तें चि गोड श्रवणां आवडी । चित्त माझें ओढी तुझे पायीं ॥ ध्रु ॥
जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम । मज होती श्रम आइकतां ॥ २ ॥
आणिकाचें मज ह्मणवितां लाज । वाटे हें सहज न बोलावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज तूं च आवडसी । सर्वभावेंविसीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ २१२० ॥

कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काज काय माझें ॥ १ ॥

---

१ पं, तया.–२ त. पं. पंढरीचोहटा.–३ त. पं. भरियेला.–४ पं. देतां घेतां.–५ पं. जन्माचे.–६ पं. श्रवणीं.–७ पं. बोलवें.–८ दे. त. सर्वभावेंविसीं.–९ पं. नाहीं.

॥ ध्रु. ॥ करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥ ध्रु. ॥
होऊनी निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनियां ॥ २ ॥
काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका[1] ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २१२१ ॥

तयासी नेणतीं बहु आवडती । होय जयां चित्तीं एक भाव ॥ १. ॥
॥ ध्रु. ॥ उपमन्यु धुरु हे[2] काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ॥ ध्रु. ॥
कोळी[3] भिल्ल पशु श्वापदें अपारें[4] । कृपेच्या सागरें तारियेलीं ॥ २ ॥
काय[5] तीं गोपाळें चांगलीं शाहाणीं । तयां चक्रपाणी जेवी सवें ॥ ३ ॥
तुका ह्मणे भोळा भाविक हा देव । आह्मी त्याचे पाव धरूनी ठेलों ॥ ४ ॥

॥ २१२२ ॥

न लगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं[6] वेळ नाहीं पंडितांचा धाक । होत कां वाचक वेदवक्ते ॥ ध्रु. ॥
पुराणीं[7] ही कोठें न मिळे पाहातां । तैशीं या अनंता ठेवूं नामें ॥ २ ॥
आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथाकाळीं[8] ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी आनंदें चि धालों । आनंद चि ल्यालों अळंकार ॥ ४ ॥

॥ २१२३ ॥

दैन्य दुःख आह्मां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ॥ ध्रु. ॥

---

१ पं. सकळिक.—२ दे. त. हे.—३ दे. कोळें भिल्लें. त. काळें भिल्लें.—४ पं. अपार.—५ दे. काय तें गोपाळें०. पं. काय ते गोपाळ०.—६ त. नेणों वेळा नाहीं.० पं. नाहीं वेळकाळ पंडितांचा०.—७ दे. 'पं. वेदीं जें प्रतिपाद्य न कळे पाहातां' हें दे. मागून केलें आहे. पूर्वी मूळावल्याप्रमाणेंच होतें.—८ दे कथेकाळीं.

आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ॥ २ ॥
आमचें मागणें मागों त्याची सेवा । मोक्षाची निर्दैवा कोणा चाड ॥ ३
तुका ह्मणे पोटीं सांटविला देव । न्यून तो हा भाव कोण आह्मां[1] ॥ ४ ॥

॥ २१२४ ॥

काळतोंडा सुना । भलतें चोरुनि करी जना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ॥ ध्रु ॥
मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे थीन । नागवला नव्हे हित ॥ ३ ॥

॥ २१२५ ॥

विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज न साहावें कानीं । विष उत्तर लागे मनीं ॥ ध्रु ॥
हरिकथेतें धिक्कारी[2] । शत्रु माझा तो वैरी ॥ २ ॥
सुना काळतोंडा । जो या देवा ह्मणे धोंडा ॥ ३ ॥
अहं ह्मणे ब्रह्म । नेणे भक्तीचें[3] तें वर्म ॥ ४ ॥
तुका ह्मणे क्षण । नको[4] तयाचें दर्षण ॥ ५ ॥

॥ २१२६ ॥

यमपुरी त्यांणीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधी केला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघड कोणी न करी सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ॥ ध्रु ॥
काय ते नेणते होते मागें ऋषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ॥ २ ॥
द्रव्य दारा कोणें स्थापियेलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ॥ ३ ॥

---

१ त. नुन्य तो हा भाव. पं. नुन्य तो ही भाव — दे. नुन्य तो भाव.—२ दे. त. धीकारी. ष. धीःकारी—३ पं. भक्तिभाव वर्म.—४ त. तयाचें कोंण दर्षण ।.

तुका ह्मणे दोहीं ठायीं हा फजित । पावे यमदूतजना हातीं ॥ ४ ॥

॥ २१२७ ॥

न कळतां कोणी मोडियेलें व्रत । तया प्रायश्चित्त चाले कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणतियां वज्रलेप जाले थोर । तयांस अघोर कुंभपाक ॥ध्रु॥
आतां जरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तें चि पाप ॥२॥
काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबलें काय होतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जना पाहा विचारूनी । सुख वाटे मनीं तें चि करा ॥ ४ ॥

॥ २१२८ ॥

वाचे विठ्ठल नाहीं । तो चि प्रेतरूप पाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ॥ ध्रु ॥
न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥ २ ॥
जातां कांटाळे देउळा[1] । तो चि सुना मुखकाळा ॥ ३ ॥
हरिभक्तीविण । त्याचें[2] जळो शाहाणपण ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥ ५ ॥

॥ २१२९ ॥

तारिलीं[3] बहुतें[4] चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाटीं ॥ ध्रु ॥
जन्म नांव[5] धरी भक्तीच्या पाळणा । आकार कारणा या च साटीं ॥ २ ॥
असुरीं दाटली पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ॥ ३ ॥

---

१ पं. राउळा.—२ पं. जळो त्याचें.—३ पं. तारिलीं—४ "बहुत" हें यमकास जुळतें; पण कोणत्याही प्रतींत तसें आढळत नाहीं.—५ पं. नाम.

तुका ह्मणे देव भक्तपण सार । कौतुकवेव्हार[1] तयासाटीं ॥ ४ ॥

॥ २१३० ॥

याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्त पायीं सुखें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझें सुखदुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥ ध्रु ॥

कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंखिलीं । ह्मणऊनि लागली यास चिंता ॥ २ ॥

मन राखे हातीं घेउनियां काठी । इंद्रियें तोंपटीं[2] फांकों नेदी ॥ ३ ॥

तुका ह्मणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥ ४ ॥

॥ २१३१ ॥

उभाउभी फळ । अंगीं मंत्राचे या बळ ॥ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणा विठ्ठल विठ्ठल । गोड आणि स्वल्प बोल ॥ ध्रु ॥

कळिकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा[3] ॥ २ ॥

तुका ह्मणे रोग । वारे भवाऐसा भोग ॥ ३ ॥

॥ २१३२ ॥

जैसा[4] अधिकार । तैसें बोलावें उत्तर ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय वाउगी घसघस । आह्मी विठोबाचे दास ॥ ध्रु ॥

आह्मी जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ॥ २ ॥

तुका ह्मणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ॥ ३ ॥

॥ २१३३ ॥

न वेजतां घरा । आह्मी कोणाच्या दातारा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कां हे छळूं येती लोक । दाट बळें त्रि कंटक ॥[5] ध्रु ॥

---

१ पं. कौतुकें वेव्हार.—२ पं. थापटी—३ पं. कदा—४ पं. पाहोनियां. दे. मागून 'जैसा' खोडून 'पाहोनी' केलें आहे.—५ दे. त. पं. वजावां.

नाहीं आह्मी खात । कांहीं कोणाचें लागत ॥ २ ॥
कळे तैसी सेवा । तुका ह्मणे करूं देवा ॥ ३ ॥

॥ २१३४ ॥

मोहरोनी चित्ता । आणूं हळू चि वरि हिता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ॥ ध्रु ॥
संवसारा भेणें । कांहीं उसंती तों पेणें ॥ २ ॥
एखादिया भावें । तुका ह्मणे जवळी यावें ॥ ३ ॥

॥ २१३५ ॥

काय जाणों वेद । आह्मी आगमाचे भेद[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनीं ॥ ध्रु ॥
कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ॥ २ ॥
तुका ह्मणे दीना । नुपेक्षावें नारायणा ॥ ३ ॥

॥ २१३६ ॥

धर्माचें पाळण । करणें पाषांड[2] खंडण ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ हें चि आह्मां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥ ध्रु ॥
तीक्षण उत्तरें[3] । हातीं घेउनि बाण फिरें ॥ २ ॥
नाहीं भीड भार । तुका ह्मणे साना थोर ॥ ३ ॥

॥ २१३७ ॥

निवडावे खडे । तरी दळण[4] वोजें घडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरि नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ॥ ध्रु ॥

---

१ पं. आगमींचे.—२ पं. पाषांडा.—३ पं. उत्तर.—४ पं. दळणा वोज घडे ।—

निवडावें तन । सेतीं करावें राखण ॥ २ ॥

तुका ह्मणे नीत । न विचारितां नव्हे हित ॥ ३ ॥

॥ २१३८ ॥

दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ लात हाणोनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ॥ ध्रु ॥

बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ २ ॥

तुका ह्मणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ॥ ३ ॥

॥ २१३९ ॥

नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्त ॥ ध्रु ॥

नाहीं केली निंदा । आह्मीं दूषिलेंसे भेदा ॥ २ ॥

तुका ह्मणे मज । येणें विण काय काज ॥ ३ ॥

॥ २१४० ॥

कांहीं जडभारी । पडतां ते अवसरीं[२] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुज आठवावे पाय । आह्मीं मोकलूनि धाय ॥ ध्रु ॥

तान पीडी भूक । शीत उष्ण वाटे दुःख ॥ २ ॥

तुका ह्मणे लाड । तेथें पुरे माझें कोड ॥ ३ ॥

॥ २१४१ ॥

होउनि कृपाळ । भार घेतला सकळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तूं चि चालविसी माझें । भार सकळ ही ओझें ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. पं. दुसिलेंते.—२ दे. त. अवभरी.

देह तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥ २ ॥
कायावाचामनें । तुका ह्मणे दुजें नेणें ॥ ३ ॥

॥ २१४२ ॥

आतां होईं माझे बुद्धीचा जनिता । अवरावें चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथूनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ ध्रु ॥
अनावर गुण बहुतां जातींचे । न बोलावें वाचे ऐसें करीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥ ३ ॥

॥ २१४३ ॥

नि[1]त्य या मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें[2] जाळें उगवतां ॥ ध्रु ॥
सां[3]पडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥ २ ॥
तुका ह्मणे मी तों अज्ञान चि आहें । परि तुझी पाहें वास देवा ॥ ३ ॥

॥ २१४४ ॥

दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी परी मज झाली नारायणा । योगक्षेम जाणां तुह्मी आतां ॥ ध्रु ॥
खातां लेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जैं[4]नराग ॥ २ ॥
तुका ह्मणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥ ३ ॥

॥ २१४५ ॥

मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें गोही माझें मन मजपाशीं । तुटी मुदलेंसी दिसे पुढें ॥ ध्रु ॥

१ पं. सत्य मनासी. दे. नित्य मनासी.–२ पं. " हें " नाहीं.–३ त. सांपडला –४ पं. जनाराग.

पुढिलांचे मना आणि गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली कोंबडयाची परी । पुढें चि उकरी लाभ नेणें ॥ ३ ॥

॥ २१४६ ॥

किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझें मोझे हातीं देईं हित । करीं माझें चित्त समाधान ॥ ध्रु ॥
राग आला तरी कापूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥ ३ ॥

॥ २१४७ ॥

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चुकलिया काम मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ध्रु॥
पाय सोडूनियां फिरतों वासर । स्वामिसेवे चोर होऊनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ३ ॥

॥ २१४८ ॥

पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥ ध्रु ॥
खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ॥ २ ॥
तुका ह्मणे पोळी तोंडींचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥ ३ ॥

॥ २१४९ ॥

आतां गुण दोष काय विचारिसी । मी तों आहें रासी पातकांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पतितपावनासवें समागम । अपुलाला धर्म चालवीजे ॥ ध्रु ॥

---

१ पं. परिहर.—२ पं. आता माझे हातीं देईं माझें हित.—३ दे. सोडूनिया.—४ पं. बळ.—५ पं. पोळी.

घेनघायें भेटी लोखंडपरिसा । तरी अनारिसा न पालटे ॥ २ ॥
तुका ह्मणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ॥ ३ ॥

॥ २१५० ॥

कृपावंता दुजें नाहीं तुह्मां पोटीं । लाडें बोलें गोठीं सुख मातें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेउनि भातुकें लागसील पाठी । लाविसील ओंठीं ब्रह्मरस ॥ ध्रु ॥
आपुलिये पांख घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मांकारणें गोविंदा । वागाविसी गैदा सुदर्शन ॥ ३ ॥

॥ २१५१ ॥

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय माझा घडेल अव्हेर । मार्गं बहु दूर वागविलें ॥ ध्रु ॥
नेदी वांरा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥२ ॥
तुका ह्मणे बोल करितों आवडी । अविट ते चिं गोडी अंतरींची ॥ ३ ॥

॥ २१५२ ॥

पांडुरंगा कांहीं आइकावी मात । न करावें मुक्त आतां मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जन्मांतरें मज ऐसीं देई देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ॥ ध्रु॥
वाखाणीन कीर्ति आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुजपुढें ॥ २ ॥
करुनि कामारी दास दीनाहुनी । आंपुला अंगणीं ठाव मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी मृत्युलोकीं भले । तुझे चि अंकिले पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ २१५३ ॥

माझे अंतरींचें तों चि जाणे एंक । वैकुंठनायक पांडुरंग ॥ १ ॥

---

१ पं. घणें घायीं भेटी लोखंडा परीसा ।.–२ पं. गोष्टी.–३ पं. कदा.–४ पं. अंगीं वारा.–५ पं. "चि" नाहीं.–६ हे. तैसीं.–७ पं. आपलें.–८ हे. त. अंकिले.

॥ ध्रु. ॥ जीव भाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशीं ॥ ध्रु ॥

सुखसमारंभें संतसमागमें । गाऊं वाचे नाम विठोबाचें ॥ २ ॥

गातां पुण्य होय आइकतां लाभ । संसारबंद तुटतील ॥ ३ ॥

तुका ह्मणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ॥ ४ ॥

॥ २१५४ ॥

कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा यों चि बरी विठोबाची ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ॥ ध्रु ॥

कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥ २ ॥

कथा मंत्रजप कथा हरी ताप । कथाकाळीं कांप कळिकाळासी ॥ ३ ॥

तुका ह्मणे कथा देवाचें हीं[3] ध्यान । समाधि लागोन उभा तेथें[4] ॥ ४ ॥ ॥ १३ ॥

॥ २१५५ ॥

काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुझे पायीं पावें ऐसा । जेणें उगवे हा फांसा ॥ ध्रु ॥

करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । माझें ह्रदय वसवा ॥ ३ ॥

॥ २१५६ ॥

भला ह्मणे जन । परि नाहीं समाधान ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझें तळमळी चित्त । अंतरलें दिसे हित ॥ ध्रु ॥

कृपेचा आधार । नाहीं दंभ जाला भार ॥ २ ॥

---

१ दे. त. पायीं.—२ पं. कळि कांपे कळिकाळासी.—३ पं. हें.—४ पं. कथे.—५ पं. फार.

तुका ह्मणे कृपे । अंतराय कोण्या भावें ॥ ३ ॥

॥ २१५७ ॥

शिकविले बोल । बोलें तैसी नाहीं ओल ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां देवा संदेह नाहीं । वांयां गेलों यासी कांहीं ॥ ध्रु ॥

एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ॥ २ ॥

बुद्धि नाहीं स्थिर । तुका ह्मणे शब्दा धीर ॥ ३ ॥

॥ २१५८ ॥

उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कां रे न घलिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ॥ ध्रु ॥

काय बळयुक्ति । नाहीं तुझे अंगीं शक्ति ॥ २ ॥

तुका ह्मणे तूं विश्वंभर । ओस माझें कां अंतर ॥ ३ ॥

॥ २१५९ ॥

वांहावतों पुरीं । आतां उचित तें करीं ॥ १ ॥

॥ ध्रु. माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ॥ ध्रु ॥

आह्मां ओढी काळ । तुझें क्षीण झालें बळ ॥ २ ॥

तुका ह्मणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ॥ ३ ॥

॥ २१६० ॥

आतां घेई माझें । भार सकळ ही ओझें ॥ १ ॥

॥ ध्रु. काय करिसी होई वाड । आलों पोटासीं दगड ॥ ध्रु ॥

तूं चि डोळे वाती । होई दीपक सांगातीं ॥ २ ॥

तुका ह्मणे कांहीं । विचाराया चाड नाहीं ॥ ३ ॥

---

१ तं. पं. रूपें.—२ पं शिकलों ते बोल । बोल तैसी. ०—३ पं. उच्चारिलें.—४ दे. [illegible].

॥ २१६१ ॥

असोत हे बोल । अवघें तूं चि भांडवल ॥ १ ॥
॥ धु. ॥ माझा मायबाप देवा । सज्जन सोयरा केशवा ॥ ध्रु ॥
गाळियेले[1] भेद । सारियेले वादावाद ॥ २ ॥
तुका ह्मणे मधीं । आतां न पडे उपाधि ॥ ३ ॥

॥ २१६२ ॥

करीन कोल्हाळ । आतां हा चि सर्वकाळ ॥ १ ॥
॥ धु. ॥ आतां ये वो माझे आई । देईं भातुकें विठाई ॥ ध्रु ॥
उपायासी नाम । दिलें याचें पुढें क्षेम ॥ २ ॥
बीज आणि फळ । हें चि तुका ह्मणे मूळ ॥ ३ ॥

॥ २१६३ ॥

धनासीं च धन । करी आपेण[2] जतन ॥ १ ॥
॥ धु. ॥ तुज आळवितां गोडी । पांडुरंगा खरी जोडी ॥ ध्रु ॥
जेविल्याचें खरें । वरी उमटे ढेंकरें ॥ २ ॥
तुका ह्मणे धाय । तेथें कोठें उरे हाय ॥ ३ ॥

॥ २१६४ ॥

अनुभवा आलें । माझे चित्तींचें क्षरलें ॥ १ ॥
॥ धु. ॥ असे जवळी अंतरे[3] । फिरे आवडीच्या फेरें ॥ ध्रु ॥
खादलें चि वाटे । खावें भेटलें चि भेटे ॥ २ ॥
तुका ह्मणे उभें । आह्मी राखियेलें लोभें ॥ ३ ॥

॥ १० ॥

१ पं. गाळियेला.—२ पं. आपणा.—३ दे. त. अंतर.

॥ २१६५ ॥

पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें मज कांगा केलें पंढरिराया । लौकिक हा वांयां वाढविला ॥ ध्रु. ॥
ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची ॥ २ ॥
तुका ह्मणे मढें शृंगारिलें वरी । ते चि जाली परी मज देवा ॥ ३ ॥

॥ २१६६ ॥

बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें चित्त मज जवळीच गोहीं । तुझी मज नाहीं भेटी ऐसें ॥ ध्रु. ॥
दासीसुतां नाहीं पितियाचा ठाव । अवघें चि वाव सोंग त्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी केली विटंबना । अनुभवें जना येईल कळों ॥ ३ ॥

॥ २१६७ ॥

मजपुढें नाहीं आणीक बोलता । ऐसें कांहीं चित्ता वाटतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याचा कांहीं तुह्मीं देखावा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥ ध्रु. ॥
कामक्रोधें नाहीं सांडिलें आसन । राहिले वसोन देहामध्यें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां जालों उतराई । कळों यावें पायीं निरोपिलें ॥ ३ ॥

॥ २१६८ ॥

सावित्रीचें विटंबण । रांडपण करीतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥ ध्रु. ॥
कुबेर नांव मोळी वाहे । कैसी पाहें फजिती ॥ २ ॥
तुका ह्मणे ठुणगुण देखें । उभें मूर्ख फुंदतां ॥ ३ ॥

---

१ त. ऱ्हावयां वाढविला.—२ पं. वाढिलें मिष्टान्न.—३ दे. त. पं. त्याची.—४ त. आग.—५ त. ग्वाही दे. 'गोही' याचें 'गोही' केलें आहे—६ दे. त. देखा.—७ दे. त. काम कोप.—८ दे. त. साबित्रीची.—९ दे. त. कुबिर.—१० पं. ठुणगुण देख—११ पं. उभेच. त. उभे मुखें०:

॥ २१६९ ॥

न[1] गमेसी जाली दिवसरजनी । राहिलों लाजोनी नो[2] बोलावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें[3] कोप येत असे ॥ ध्रु ॥
आपुलिया रडे आपुलें चि मन । दाटे समाधान पावतसें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी असा जी जाणते । काय करूं रिते वादावाद ॥ ३ ॥

॥ २१७० ॥

मेल्यावरि मोक्ष संसारसंबंध[4] । आरालिया बद्ध[5] ठेवा आह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वागवीत संदेह राहों कोठवरी । मग काय थोरी सेवकाची ॥ ध्रु ॥
गाणें गीत आह्मां नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ॥ २ ॥
तुका ह्मणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानुकूळ[6] ॥ ३ ॥

॥ २१७१ ॥

एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरि च हे खोटे चाळे केले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाजवूनि तोंड घातलों[7] बाहेरी । कुलुप[8] करूनी दारीं माजी वसा ॥ ध्रु ॥
उजेडाचा केला दाटोनि अंधार । सर्वे हुद्देदार चेष्टाविला[9] ॥ २ ॥
तुका ह्मणे भय होतें तों चि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ॥ ३ ॥

॥ २१७२ ॥

काय नव्हेसी तूं एक । देखों कासया पृथक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुंग्या कैंचें[10] मुंगळे । नटनाटय तुझे चाळे ॥ ध्रु ॥
जाली तरी मर्यादा । किंवा त्रासावें गोविंदा ॥ २ ॥

---

१ दे. नमगेसी.–२ पं. न.–३ पं. आदरें.–४ दे. त. संसारसंबंधें.–५ दे. बधें.–६ दे. त. पं. सानकुळ.–७ प. घातलें.–८ पं. कल्पें.–९ पं. चेष्टविला.–१० पं. कैंचे ते मुंगळे.

तुका ह्मणे साचा । कोठें जासी त्वदयींचा ॥ ३ ॥

॥ २१७३ ॥

कां जी वाढविलें । न लगतां हें उगलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां मानितां कांटाळा । भोवतीं मिळालिया बाळा ॥ ध्रु ॥

लावूनियां सेवे । पळतां दिसाल बरवे. ॥ २ ॥

तुका ह्मणे बापा । येतां न कळा चि रूपा ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

॥ २१७४ ॥

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र नें विचारून ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ ध्रु ॥

द्रव्य आणि कन्या । येथें कुळ कर्म सोधण्या ॥ २ ॥

तुका ह्मणे पुण्य गांठीं । तरि च उंचितासी भेटी ॥ ३ ॥

॥ २१७५ ॥

वेचावें तें जीवें । पूजा घडे ऐशा नावें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बिगारीची ते विगारी । साक्षी अंतरींचा हरि ॥ ध्रु ॥

फळ बीजाऐसें । कार्यकारणासेरिसें ॥ २ ॥

तुका ह्मणे मान । लवणासारिखें लवण ॥ ३ ॥

॥ २१७६ ॥

मज नाहीं धीर । तुह्मी न करा अंगीकार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें पडिलें विषम । बळी देवाहूनि कर्म ॥ ध्रु ॥

चालों नेणें वाट । केल्या न पवे बोभाट ॥ २ ॥

---

१ पं. सेवे.—२ मं. " न " नाहीं.—३ पं. उचिताची.—४ पं. साक्ष.—५ पं. " सारिसें " याबद्दल " सारिखें."—६ दे. त. पवा.

वेचों नेणे जीवें । तुका उदास धरिला देवें ॥ ३ ॥

॥ २१७७ ॥

तळमळी चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ॥ १ ॥

॥ धु. ॥ वचनीं च संत पावले स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ॥ ध्रु ॥

वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवे चि जीव समाधान ॥ २ ॥

तुका ह्मणे कई देसील विसांवा । पांडुरंगे धांवा घेतें मन ॥ ३ ॥

॥ ४ ॥

॥ २१७८ ॥

हागतां ही खोडी । चैळण मोडवितें काडी ॥ १ ॥

॥ धु. ॥ ऐसे अनावर गुण । आवरावे काय ह्मैण ॥ ध्रु ॥

नाहीं जरी संग । तरी बडबडविती रंग ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । तुमची न घडे चि सेवा ॥ ३ ॥ ॥ १ ॥

॥ २१७९ ॥

देह निरसे तरी । बोलावया नुरे उरी ॥ १ ॥

॥ धु. ॥ येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ॥ ध्रु ॥

काचें तरी कढे । जाती ऐसें चित्त ओढे ॥ २ ॥

विष्णुदास तुका । पूर्ण धनी जाणे चुका ॥ ३ ॥

॥ २१८० ॥

खोटयाचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ॥ १ ॥

॥ धु. ॥ काय दावायाचें काम । उगा च वाढवावा श्रम ॥ ध्रु ॥

परीक्षकाविण । मिरवों जैाणां तें तें हीण ॥ २ ॥

---

१ पं. चरण.–२ पं. ह्मण–३ पं. जाणे.

तुका पायां पडे । वाद पुरे हे झगडे ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २१८१ ॥

पंढरीस घडे [1]अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अधःपाता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ [2]दुराचारें मोक्ष सुखाचे वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ॥ ध्रु ॥
केला न [3]सहावे तीर्थउपवास । कथेविण दोषसाधन तें ॥ २ ॥
कालियापें भेद मानितां [4]निवडे । श्रोत्रियांसी जोडे [5]अंत्यजता ॥ ३ ॥
माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पावविते ॥ ४ ॥
तुका ह्मणे [6]तेथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ॥ ५ ॥
॥ १ ॥

॥ २१८२ ॥

चातुर्याच्या अनंतकळा । [7]सत्या विरळा [8]जाणता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ॥ ध्रु ॥
जळो ऐसे वांजट बोल । गुणां मोल भूस मिथ्या ॥ २ ॥
तुका ह्मणे अंधळ्याऐसें । वोंगळ पिसें कौतुक ॥ ३ ॥

॥ २१८३ ॥

नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ॥ ध्रु ॥
कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ॥ २ ॥
तुका ह्मणे नानाछंदें । या विनोदें न पडावें ॥ ३ ॥

॥ २१८४ ॥

माझिया देहाची मज नाहीं चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥ १ ॥

---

१ पं. अतित्याई.—२ पं. दुराचाऱ्या मोक्षसुखाची वसति ।—३ त. साहे.—४ पै. निवडे.—५ दे अंतेजेता.—६ पं. येथें.—७ पं. सत्य.—८ दे. त. जाणत. पै. तया.

॥ ध्रु. ॥ इच्छितां ते मान मागा देवापाशीं । असा[1] संचितासी गुंपेले[2] हो ॥ध्रु॥
देह आह्मी केला भोगाचे सांभाळीं । राहिलों निराळीं मानांमानां[3] ॥२॥
तुका ह्मणे कोणें[4] वेचावें वचन । नेंसतां[5] तो सीण वाढवावा ॥ ३ ॥

॥ २१८५ ॥

धरितां इच्छा दुरी पळे । पाठीं सोहळे उदासा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ म्हणऊनि असट मन । नका खुण सांगतों ॥ ध्रु ॥
आमिषापाशीं[6] अवघें वर्म । सोस श्रम पाववी ॥ २ ॥
तुका म्हणे बीज न्यावें । तेथें यावें फळानें ॥ ३ ॥ ॥ ४ ॥

॥ २१८६ ॥

वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नाँवलोका[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तार्कियाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखें वाईचाळे[8] ॥ध्रु॥
माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खापर यांचे नावें[9] ॥ २ ॥
तुका म्हणे आडराणें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ॥ ३॥

॥ २१८७ ॥

कस्तुरीचे अंगीं मीनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तयापरि भेद नाहीं देवभक्तीं । संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ॥ध्रु॥
इंधनें[10] तें आगी संयोगाच्या गुणें । सागरा दर्षणें[11] वाहाळ तों चि ॥ २ ॥
तुका म्हणे माझें साक्षीचें वचन । येथें तों कारण शुद्ध भाव ॥ ३ ॥

॥ २१८८ ॥

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥

---

१ दे. आसा.–२ पं. गुंफले.–३ पं. मानामान –४ पं. नलगे.–५ त. ह. नसता.–६ दे. त. पं. आविसापासीं.–७ पं. नावलोकावें.–८ तं. वाईचळ.–९ त. याचें नांव. पं. याची नावें.–१० पं इंधन.–११ पं. दर्शन वोहळ तो चि.

॥ ध्रु. ॥ देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ ध्रु. ॥

उदक अग्नि धान्य जाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥ २ ॥

तुका ह्मणे मज कळे ते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ३ ॥ ॥ ३॥

॥ २१८९ ॥

श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हें करीं दंडवत ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ विश्रांती पावलों सांभाळउत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥ ध्रु. ॥

डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरेलों ॥ २ ॥

तुका ह्मणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोडवला ॥ ३ ॥

॥ २१९० ॥

नेणों काय नाड । आला उचित काळा आड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं जाली संतभेटी । येवढी हानी काय मोठी ॥ ध्रु. ॥

सहज पायांपासीं । जंवळी[3] पावलिया ऐसी ॥ २ ॥

चुकी जाली आतां काय । तुका ह्मणे उरली हाय ॥ ३ ॥

॥ २१९१ ॥

आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ॥ ध्रु. ॥

भांडवल सेवा । हा चि ठेवियेला ठेवा ॥ २ ॥

करीं मानभावा । तुका विनंती करी देवा ॥ ३ ॥

---

१ दे. केले ते.–२ पं. उद्धरले.–३ पं. तुज जवळी पावली ऐसी.

॥ २१९२ ॥

ओरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें ।
केली ते लेंकुरें सलगी पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावें कवतुक संतीं मायबापीं ।
जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ॥ ध्रु ॥
आधारें वदली प्रसादाची वाणी ।
उच्छिष्टसेवेनीं तुमचिया ॥ २ ॥
तुका ह्मणे हे चि करितों विनंती ।
माँगेन पुढती सेवादान ॥ ३ ॥ ॥ ४ ॥

॥ २१९३ ॥

पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्तिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली ॥ ध्रु ॥
जळो ऐसी ब्रिदावळी । भाटवोळीपणाची ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहों डोळां । अवकळा नये हे ॥ ३ ॥

॥ २१९४ ॥

वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥ ध्रु ॥
अभिमाना सिरीं भार । जाले खर तृष्णेचे ॥ २ ॥
तुका ह्मणे नरका जावें । हा चि जीवें व्यापार ॥ ३ ॥

---

१ दे. आरुश.–२ दे. त. • सेवणी.–३ दे. त. मागोनि.–४ पं. पुरुषहातीं०.–५ पं. वेव्हडा.–६ पं. त्याची.

॥ २१९५ ॥

सेवटासी जरी आलें । तरी जालें आंधळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वहिताचा लेश नाहीं । दगडा[1] कांहीं अंतरीं ॥ ध्रु ॥
काय परिसासवें भेटी । खापरखुंटी जालिया ॥ २ ॥
तुका ह्मणे अधम जन । अवगुण[2] चि[3] वाढवी ॥ ३ ॥

॥ २१९६ ॥

प्रायश्चित्तें देतो तुका । जातो लोकां मकळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरितील ते तरती मनीं । जाती घाणी वांयां त्या ॥ ध्रु ॥
निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनि ॥ २ ॥
तुका जाला नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ॥ ३ ॥ ॥ ४ ॥

॥ २१९७ ॥

दुर्जनाचें अंग अवघें चि[3] सरळ । नर्काचा कोथळ सांटवण[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्टणें ॥ध्रु॥
सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळ[5] चि ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखटयाची[6] ॥ ३ ॥

॥ २१९८ ॥

ऐका जी संतजन । सादर मन करूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकळांचें सार एक । कंटक ते त्यजावे[7] ॥ ध्रु ॥
विशेषता कांद्याहूनि । सेवित्या घाणी आगळी ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याची जोडी । ते[8] परवडी बैसीजे ॥ ३ ॥

---

१ पं. दगड.—२ दे. अवगुणें.—३ पं. "चि" नाहीं—४ पं. सांटवला.—५ दे. निखळे.—६ पं. वोखटयासी.—७ दे. त. तजावे.—८ पं. त्याची.

॥ २१९९ ॥

आज्ञा पाळुनियां असें एकसरें । तुमचीं उत्तरें संतांचीं हीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भागवूनि देह ठेवियेला पायीं । चरणावरि डोई येथून चि ॥ ध्रु ॥

येणें जाणें हें तों उपाधीचें मूळ । पूजा ते सकळ अकर्तव्य ॥ २ ॥

तुका ह्मणे असें चरणींचा रज । पदीं च सहज जेथें तेथें ॥ ३ ॥

॥ ३ ॥

॥ २२०० ॥

न संडावा ठाव । ऐसा निश्चयाचा भाव ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां पुरे पुन्हा यात्रा । हें चि सारूनि सर्वत्रा ॥ ध्रु ॥

संनिध चि सेवा । असों करुनियां देवा ॥ २ ॥

आज्ञेच्या पाळणें । असें तुका संतां ह्मणे ॥ ३ ॥

॥ २२०१ ॥

उपाधीचें बीज । जळोनि राहिलें सहज ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मां राहिली ते आतां । चाली देवाचिया सत्ता ॥ ध्रु ॥

पेराधनि तें जिणें । केलें सत्ता नारायणें ॥ २ ॥

तुका ह्मणे जोणें पाय । खुंटले आणीक उपाय ॥ ३ ॥

॥ २२०२ ॥

गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी ।
हगवण घाणी पिटपिट ते ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मस्तक सांडूनि सिसफुल गुडघां ।
चार तो अवघा बावळ्यांचा ॥ ध्रु ॥

---

१ दे. येथुनें.–२ दे. त. प्राधीन.–३ पं. बावळाचा.

अंगभूत ह्मण पूजितो वाह्मणा ।
ह्मणतां शाह्मणा येइल कैसा ॥ २ ॥
तुका ह्मणे वेश्या सांगे संवासिणी[१] ।
इतर पूजनीं भाव तैसा ॥ ३ ॥

॥ २२०३ ॥

कुतर्‍याऐसें ज्याचें जिणें । संग कोणी[२] न करीजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाय तिकडे हाडहाडी । गोन्हवाडी[३] च सोइरीं ॥ ध्रु ॥
अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें[४] ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंची लवी । ठेंग्या[५] केवीं अंकुर ॥ ३ ॥

॥ २२०४ ॥

सर्वथा ही खोटा संग । उपजे भंग मनासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु रंगें भरलें जन । संपन्न चि अवगुणी ॥ ध्रु ॥
सेविलिया निष्कामबुद्धी[६] । मदें शुद्धी सांडवी[७] ॥ २ ॥
त्रासोनियां बोले तुका । आतां लोकां दंडवत ॥ ३ ॥

॥ २२०५ ॥ ॥ ५ ॥

उपचारासी वाज जालों । नको[८] बोलों यावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ॥ ध्रु ॥
दुसर्‍यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहु मतें ॥ २ ॥
एकाएकीं आतां तुका । लौकिका या बाहेरी ॥ ३ ॥

---

१ पं. सुवासिनी.—२ पं. कोणें—३ पं. गोन्हेवाडी.—४ पं. उपदेश.—५ [illegible] ठेंग्या.—६ दे. निःकामबद्धी.—७ पं. सांडावी.—८ पं. नको.

॥ २२०६ ॥

मी तें मी तूं तें तूं । कुंकुड हें लाडसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेंचनाची पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ॥ ध्रु ॥
तेथील तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथे कोण भारें ॥ २ ॥
याचें यास त्याचें त्यास । तुक्यानें कास घातली ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २२०७ ॥

लाडाच्या उत्तरीं वाढविती केळ्हे । हा तो अमंगळ जातिगुण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तमाचे शरीरीं विटाळ चि वसे । विचाराचा नसे लेश तो ही ॥ ध्रु ॥
कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे काय उपदेश खळा । न्हाउनि काउळा क्षेतें धुंडी ॥ ३ ॥

॥ २२०८ ॥

आतां मज देवा । इचे हातींचें सोडवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठी लागलीसे लांसी । इच्छा जिते जैसी तैसी ॥ ध्रु ॥
फेडा आतां पांग । अंगीं लपवुनी अंग ॥ २ ॥
दुजें नेणे तुका । कांहीं तुह्मासी ठाउका ॥ ३ ॥

॥ २२०९ ॥

बहु वाटे भये । माझे उडी घाला दये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फांसा गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडी ॥ ध्रु ॥
कुंटित चि युक्ति । माझ्या जाल्या सर्व शक्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । काममोहें केला गोवा ॥ ३ ॥ ॥ ३ ॥

---

१ पं. कुंकड.—२ प. वचनासी पडे तुटी ।—३ पं. येथील तेथें तेथील येथें ।—४ पं. तुकानें.—५ "कळ" (भांडण) असतें तर यमकास जुळतें.—६ हे. खतें.

॥ २२१० ॥

विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळ चि सखें वोंगळाचें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नये पाहों कांहीं गोऱ्हवाडीचा अंत । ह्मणी ठांका संत दुर्जनापें ॥ ध्रु ॥

भैसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ॥ २ ॥

तुका ह्मणे छी थूं जया वरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ॥ ३ ॥ ॥ १ ॥

॥ २२११ ॥

चोंवळलें काय न करी बडबड । न ह्मणे फिकें गोड भुकेलें तें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ॥ ध्रु ॥

गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोणा काई ॥ २ ॥

तुका ह्मणे भोग भोगितलि भोगें । संचित तें जोगें आंहे कोणा ॥ ३ ॥

॥ २२१२ ॥

आपुला तो देह आह्मां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कोण नाहीं दक्ष करितां संसार । आह्मीं हा विचार वमन केला ॥ ध्रु ॥

नाहीं या धरीत जीवित्वाची चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥ २ ॥

तुका ह्मणे असों चिंतोनियां देवा । मी माझें हा हेवा सारूनियां ॥ ३ ॥

॥ २ ॥

॥ २२१३ ॥

चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ धणी काढोनियां निजा । करील ये कामाची पूजा ॥ ध्रु ॥

उचितावेगळें । अभिलाषें तोंड काळें ॥ २ ॥

सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ॥ ३ ॥

---

१ पं. त. वोंगळासी सखें वोंगळ चि.—२ पं. टाका.—३ त. वीर्या.—४ पं. त. पी-थू०.—५ पं. चंवळलें.—६ पं. नाहीं.—७ पं. असें. ८ पं मी हें माझा हेवा०.—९ [illegible] खावें.—१० पं. कामेची.

॥ २२१४ ॥

बरें सावधन । राहावें समय राखोन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं साराखिया वेळा । अवघ्या पावतां अवकळा ॥ ध्रु ॥

लाभ अथवा हानी । थोड्यामध्यें च भोवनी ॥ २ ॥

तुका ह्मणे राखा । आपणा नाहीं तोंचि वाखा ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ २२१५ ॥

काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जाली माकडाची परि । येतों तळा जातों वरी ॥ ध्रु ॥

घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैस लात ॥ २ ॥

आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ॥ ३ ॥

॥ २२१६ ॥

धर्म तो न कळे । काय झांकितील डोळे ॥ १ ॥

जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्मे ॥ ध्रु ॥

विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥ २ ॥

तुका ह्मणे लांसी । माथा नाचविते कैसी ॥ ३ ॥

॥ २ ॥

॥ २२१७ ॥

दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेंटर तोडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ॥ ध्रु ॥

न ह्मणे रामराम । मनें वाचे हें चि काम ॥ २ ॥

तुका ह्मणे भागा । आली निंदा करी मागा ॥ ३ ॥

---

१ पं. सखा.

॥ २२१८ ॥

शादीचें तें सोंग । संपादितां राजा व्यंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा कैसी विटंबना । मूर्खा अभाग्याची जना ॥ ध्रु ॥
दिसतें तें लोपी । झिज्या वोढुनियां पापी ॥ २ ॥
सिंदळी त्या सती । तुका ह्मणे थुंका घेती ॥ ३ ॥
॥ २ ॥

॥ २२१९ ॥

भक्त म्हणऊनि वंचावें[2] जीवें । तेणें शेण खावें काशासाठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नासिले अडबंद कौपीन ते[3] माळा । अडचण राउळामाजी केली ॥ ध्रु ॥
अंगीकारिले सेवे घडे[4] अंतराय । तया जाला न्याय खापराचा ॥ २ ॥
तुका ह्मणे कोठें तगों येती घाणीं । आहाच हीं मनीं अधीरता ॥ ३ ॥
॥ १ ॥

॥ १२२० ॥

गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चित्तीं न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥ ध्रु ॥
न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥ ३ ॥

॥ २२२१ ॥

बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें बरें जालें ठाकें । अनुभवें आपुल्या ॥ ध्रु ॥
सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ॥ २ ॥
तुका ह्मणे बिंघे अगी । दुजे संगीं आतळतां ॥ ३ ॥ ॥ २ ॥

---

१ दे. वेंग.—२ पं. वंचावें तें जावें.—३ त. हे.—४ दे. "घडे" नाही. त. "घडे" याबद्दल "जरी" —५ पं. गहिल्याचें.

अलकापुरीं स्वामी कीर्तनास उभे राहिले तेव्हां कवित्वाचा निषेध करून लोक बोलिले कीं कवित्व बुडवणें तेव्हां कवित्व बुडवून पांच दिवस होते॥ लोकांनीं फार पीडा केली कीं संसारही नाहीं व परमार्थही बुडविला आणीक कोणी असतें तें जीव देतें मग निद्रा केली ते अभंग ॥ २०॥

॥ २२२२ ॥

भूतबाधा आह्मां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाला भक्तीचा कळस । आले वेसतीसी दोष ॥ ध्रु ॥
जागरणाचें फळ । दिली जोडोनि तळमळ ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आह्मांच कळों आली सेवा ॥ ३ ॥

॥ २२२३ ॥

नाहीं जों वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ॥ १ ॥
॥ध्रु.॥जाणिवलें आतां करीं ये उदेश।जोडी किंवा नाश तुमची जीवें॥ध्रु॥
ठायींचें चि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे मग वेचीन उत्तरें । उद्देशिलें खरें जाल्यावरी ॥ ३ ॥

॥ २२२४ ॥

करूं कवित्व काय नाहीं आतां लाज । मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां आला एका निवाडयाचा दिस । सत्याविण रस विरसला ॥ ध्रु ॥

---

१ पं. अभंगाच्या वह्या उदकांत बुडवून, पांच दिवस उगेच राहिले; तेव्हां छळवादी येऊन फिरोन निषेधाच्या गोष्टी बोलिले. श्रीसन्मुख तेरा दिवस निद्रा केली ते अभंग १९ करून, मग निद्रा केली. अळंकापुरी स्वामी कीर्त० ॥ कवित्वाचा निशेध के०॥ लोका० ते०॥ २ पं. दे. त. वस्तीस.—३ पं. नये.—४ पं. जाणविलें.—५ पं. ठायीं च.—६ दे. त. उद्देसिलें.—७ दे. त. कवि काय आतां नाहीं लाज।—८ पं. विसरला.

भवाविण कोण करी पाप । रिते चि संकल्प लाजलोंवे ॥ २ ॥
ा ह्मणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥ ३ ॥

॥ २२२५ ॥

हीं आइकत तुह्मी माझे बोल । कासया हें फोल उपणूं भूस ॥ १ ॥
धु. ॥ येसी तें करीन बैसलिया ठाया । तूं चि बुझावया जवळी देवा ॥ ध्रु ॥
रावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनि वास ॥ २ ॥
का ह्मणे आला आइसी सेवट । होऊनियां नीट पायां पडों ॥ ३ ॥

॥ २२२६ ॥

नव्हे तुह्मां सरी । येवढें कारण मुरारी ॥ १ ॥
॥ धु. ॥ मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ॥ ध्रु ॥
स्वामीचें तें सांडें । पुत्र होतां काळतोंडें ॥ २ ॥
शब्दा नाहीं रुची । मग कोठें तुका वेची ॥ ३ ॥

॥ २२२७ ॥

केल्यापुरती आळी । कांहीं होते टाळाटाळी ॥ १ ॥
॥ धु. ॥ सत्यसंकल्पाचें फळ । होतां न दिसे चि बळ ॥ ध्रु ॥
दळणांच्या ओंव्या । रित्या खरें मापें घ्याव्या ॥ २ ॥
जातीं उखळें चाटूं । तुका ह्मणे राज्य घाटूं ॥ ३ ॥

॥ २२२८ ॥

आतां नेम झाला । या च कळसीं विठ्ठला ॥ १ ॥

---

१. पं. लाजविलें.–२ पं. तुझी बुझावया०.–३ पं. पडें.–४ पं. काळें तोंड.–५ पं. हे तों.–६ पं. उखळ.

॥ ध्रु. ॥ हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥ ध्रु ॥
जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे घाटी । चाटू कोरडा शेवटीं ॥ ३ ॥

॥ २२२९ ॥

पावावे संतोष । तुह्मीं यासाटीं सायास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं आवडी वचनें । पालटूनि क्षणक्षणें ॥ ध्रु ॥
द्यावें अभयदान । भुमी न पडावें वचन ॥ २ ॥
तुका ह्मणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥ ३ ॥

॥ २२३० ॥

बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागितलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची ॥ ध्रु ॥
समाधानासाटीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां तुमचे चि फंद । वरदळ छंद कळों येती ॥ ३ ॥

॥ २२३१ ॥

काशासाटीं बैसों करूनियां हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उत्त्वारें काय हो तें ॥ ध्रु ॥
नेदी पट परी अन्नें तों न मारी । आपुलिये थोरीसाटीं राजा ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां अव्हेरिलें तरी । मग कोण करी दुकान हा ॥ ३ ॥

---

१ पं. वचन.–२ दे. पं. क्षणक्षण.–३ दे. उधारें पं. उदारें.–४ दे. त. मरी.

॥ २२३१ ॥

माझा मज नाहीं । आला उबग[1] तो कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमच्या[2] नामाची जतन । नव्हतां थोर वाटे सीण ॥ ध्रु ॥
न पडावी निंदा । कानीं स्वामीची गोविंदा ॥ २ ॥
तुका ह्मणे लाज । आह्मां स्वामीचें तें काज ॥ ३ ॥

॥ २२३२ ॥

कांहीं मागणें हें आह्मां अनुचित । वडिलांची रीति जाणतसों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ॥ ध्रु ॥
शब्द तो उपाधि अचळ निश्चय । अनुभव हा[3] काय नाहीं अंगीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला[4] ॥ ३ ॥

॥ २२३३ ॥

मागितल्यास कर[5] पसरी । पळतां भरी वाखती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय आह्मी नेणों वर्म । केला श्रम नेणतां ॥ ध्रु ॥
बोलतां बरें येतां रागा । कठीण लागा मार्गेमार्गे ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें बोली । असे चाली उफराटी ॥ ३ ॥

॥ २२३४ ॥

असो तुझें तुजपाशीं । आह्मां त्यासी काय चाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निरोधें[6] कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥ ध्रु ॥
करावा तो उठे आट । खटपट वाढतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे ये[illegible] रागा । कां मी भांगा मुकेन ॥ ३ ॥

---

१ दे. उबेग.–२ त. तुह्या.–३ पं. "हा" नाहीं.–४ पं. उभविला.–५ त. पं. पसरी कर.–६ पं. विरोधें.–७ पं. विभागा.

अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें ।
योगक्षेम पुढें तुज करणें[1] लागेल ॥ २ ॥
उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद[2] ।
तुका ह्मणे ब्रीद साच केलें आपुलें ॥ ३ ॥

॥ २२४२ ॥

तूं कृपाळू माउली आह्मां दीनांची साउली ।
न [3]संरित आली बाळवेशें जवळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण ।
निववीलें मन आलिंगन देऊनी ॥ ध्रु. ॥
कृपा केली जना हातीं पायीं ठाव दिला संतीं ।
कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मी अन्यायी क्षमा करीं वो माझे आई ।
आतां पुढें काई तुज घालूं सांकडें ॥ ३ ॥

॥ २२४३ ॥

कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन ।
तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चुकी जाली एकवेळा मज पासूनि चांडाळा ।
उभें करोनियां जळा माजी वह्या राखिल्या ॥ ध्रु. ॥
नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ।
समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥ २ ॥

---

१ पं. तुज कारणें लागले.–२ पं. जनापवाद.–३ (संवृत.?) त. संवरीत. पं. स्वरित.

गेलें होऊनियां मार्गें नये बोलों तें वाउगें ।
पुढिलिया प्रसंगें तुका ह्मणे जाणावें ॥ ३ ॥

॥ २२४४ ॥

काय जाणें मी पामर पांडुरंगा तुझा पार ।
धरिलिया धीर काय एक न करिसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उताविळ जालों आधीं मतिमंद हीनबुद्धि ।
परि तूं कृपानिधी नाहीं केला अव्हेर ॥ ध्रु ॥
तूं देवांचा ही देव अवघ्या ब्रह्मांडाचा जीव ।
आह्मां दासां कींव कां भाकणें लागली ॥ २
तुका ह्मणे विश्वंभरा मी तों पतित चि खरा ।
अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ॥ ३ ॥

॥ २२४५ ॥

नव्हतीं आलीसी सासुरी अथवा घाय पाठीवरी ।
तो म्यां केला हरी एवढा तुह्मां आकांत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांटिलासी दोहीं ठायीं मजपाशीं आणि डोहीं ।
लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ॥ ध्रु ॥
जीव घेती मायबापें थोड्या अन्यायाच्या कोपें ।
हें तों नव्हे सोपें साहों तों चि जाणीतलें ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता तुज ऐसा नाहीं दाता ।
काय वानूं आतां वाणी माझी कुंटली ॥ ३ ॥

---

१ पं. सकळ.—२ पं. त्यां.—३ [illegible]—४ पं. खुंटली.

श्रीविठ्ठल.

॥ २२४६ ॥

वर्षाव केला.

तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि शीतळ ।
पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओंवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलें ॥ ध्रु ॥
तुवां केलें रे अमृता गोड त्या ही तूं परता ।
पांचां तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायक ॥ २ ॥
कांहीं न बोलोनि आतां उगा च चरणीं ठेवितों माथा ।
तुका ह्मणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥ ३ ॥

॥ २२४७ ॥

मी अवगुणी अन्यायी किती ह्मणोन सांगों काई ।
आतां मज पायीं ठाव देईं विठ्ठले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरे पुरे हा संसार कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ॥ ध्रु ॥
अनेक बुद्धीचे तरंग क्षणक्षणां पालटती रंग ।
धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां अवघी तोडीं माझी चिंता ।
येऊनि पंढरिनाथा वास करीं ह्रदयीं ॥ ३ ॥

॥ प्रथम भाग समाप्त. ॥

---

१ पं. पाळले.